अनाथांचा नाथ

विश्वनाथ

* संपादक : विजयकुमार मोरे *

विश्लेषा प्रिंटर्स ॲन्ड पब्लिशर्स, कान्हे,मावळ,जि.पुणे

संपादक/लेखक
श्री. विजयकुमार मोरे
इलाईट ग्रीन एकर्स, कान्हे
ता.मावळ,जि.पुणे. संपर्क : ७९७२८१६१८०

मुद्रक :
विश्लेषा प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स प्रा.लि.
गट नं. ४४५ शनिमंदीराजवळ कान्हे
ता.मावळ, जि.पुणे, मो. : ७९७२८१६१८०

प्रकाशक :
विश्लेषा प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स प्रा.लि.
गट नं. ४४५ शनिमंदीराजवळ कान्हे
ता.मावळ, जि.पुणे, मो. : ७९७२८१६१८०

टाईपसेटिंग व डिझाईन :
सचिन ताकतोडे

प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी २०२५

किंमत :
₹ २५०



इंजि. व्ही.बी.नाथ

(महासंचालक वाल्मी)

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

अर्पण पत्रिका



ज्यांनी आपली हयात मुलांच्या कल्याणासाठी
व्यतीत केली ते माता-पिता
शांताबाई आणि बाबुनाथ नाथ त्यांच्या स्मृतिस
विनम्रतापुर्वक हा ग्रंथ अर्पण !

मातृ छत्र



स्व. शांताबाई बाबूनाथ नाथ

* अनुक्रमणिका *

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

प्रस्तावना

नि:स्पृह अधिकारी

डॉ.राजेश पुराणिक
प्राध्यापक व सामाजिक
शास्त्र विभाग प्रमुख,वाल्मी
छत्रपती संभाजी नगर

शासकीय सेवेतील व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे ध्येय म्हणजे सेवेच्या माध्यमातून जनता जनार्दनाच्या इच्छा आणि अपेक्षांची पूर्तता करणे होय. आपण सेवक आहोत या भावनेने सतत कार्य करीत राहणे अशाच काही गुणांनी संपन्न इंजि. श्री. विश्वनाथ नाथ हे महाराष्ट्र शासनाचे मृद संधारण विभागातील कर्मठ मुख्य अभियंता. तसेच देशातील अग्रणी जल व भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी संभाजीनगर या संस्थेच्या महासंचालकपदी आपली सेवा देत असताना त्यांचा आणि माझा परिचय घडून आला. त्यांच्या जीवनावर आधारित एक पुस्तक प्रकाशित होणार आहे ही माहिती मला मिळाली आणि त्या संबंधाने मी या ठिकाणी त्यांच्याविषयीचे विचार मांडत आहे. सर्वप्रथम त्यांनी त्यांचे चरित्र लिहिण्याचा धाडसी निर्णय घेतला याचेच मला कौतुक करावेसे वाटते. कारण चरित्र लिहिण्यासाठी आपण जगलेले आयुष्य कशाप्रकारे वैविध्यपूर्ण आहे आणि त्यातून समाजासाठी, समाजातील घटकांना कशी प्रेरणा प्राप्त होऊ शकते याचा विचार केंद्रस्थानी विराजमान असतो. अनेकांना संपूर्ण आयुष्यभर याचेच आकलन झालेले नसते. त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट काय होते हेही त्यांना समजले नसते. परंतु श्री नाथ हे त्यास अपवाद आहेत. त्यांनी प्राप्त केलेल्या अभियांत्रिकी शिक्षणाचे रूपांतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लाखो कुटुंबांच्या सामाजिक, आर्थिक उत्थानासाठी मृद व जलसंधारणच्या अनेक छोट्या मोठ्या योजनांना प्रत्यक्षात राबविण्यात केले आहे. आपल्या सेवेच्या विविध टप्प्यांवर त्यांनी धडाडीने क्षेत्रीय कामांची अंमलबजावणी तर केलीच परंतु मोठ्या पदावर विराजमान झाल्यानंतर निर्भयतेने समाज उपयोगी निर्णय घेऊन शासनाच्या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरला जाईल याची काळजी घेतली आहे. माझा व त्यांचा परिचय त्यांची वाल्मी या संस्थेत अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर नियुक्ती झाली

त्यावेळेस झाला होता. सध्या ते याच संस्थेचे महासंचालक आहेत. मी प्राध्यापक व प्रमुख सामाजिक विद्या शाखा या नात्याने त्यांच्या अधिनस्त कार्य करीत आहे. म्हणतात ना की जे स्वयंप्रकाशित असतात त्यांना परिचयाची गरज भासत नाही. श्री नाथ हे आपल्या सरळ साध्या स्वभावाने परिपूर्ण व्यक्तिमत्त्व आहेतच, परंतु त्यांच्यात वैचारिक कणखरता प्रचंड मोठी आहे. त्यामुळेच कोणतेही काम हाती घेतल्यावर ते त्यांच्या कर्मण्येतेचा परिचय देणारे ठरते. कठोर परिश्रम हा ध्यास त्यांच्या प्रत्येक कामात दिसून येतो. शासनाच्या सेवेतील दीर्घअनुभवामुळे त्यांच्यात धडाडीने निर्णय घेण्याची योग्यता निर्माण झाली आहे. ही बाब त्यांना निर्भयता आणि निधर्ता या गुणांनी युक्त करते. हाती घेतलेल्या कामांचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची पद्धती संपूर्ण सिस्टमला क्रियाशील ठेवण्यास अत्यंत प्रभावी आहे. अगदी लहानातल्या लहान कर्मचाऱ्यापासून ते मोठ्यात मोठ्या अधिकाऱ्यांपर्यंत तसेच शासनातील वरिष्ठांपर्यंत ते सतत संपर्कात राहून कार्य पूर्णतेचे लक्ष गाठतात. या प्रक्रियेत अनेकांशी त्यांचे सहज कार्य संबंध स्थापित होतात. कर्मचाऱ्यांचे छोटे मोठे प्रश्न, समस्या तुंबलेली कामे इत्यादी त्यांच्यासमोर आल्यावर ते त्यावर शासकीय नियमांच्या चौकटीत राहून परंतु मानवी दृष्टिकोनातून स्वामी विवेकाने निर्णय घेतात. त्यामुळे त्यांनी ज्या ज्या स्थानी विभाग प्रमुख या नात्याने सेवा केली तेथे ते खऱ्या अर्थाने त्या विभागाचे नेतृत्व सक्षमपणे पालन करणारे अधिकारी म्हणून नावलौकिकास आले आहेत. वैचारिक स्पष्टता असल्यामुळे त्यांना प्रकरणांची भूमिका चटकन लक्षात येते. समय भानाचे ध्यान असल्याने योग्य वेळी व योग्य स्थानी नेमके कुठले निर्णय घ्यायचे हे त्यांना सहजसाध्य आहे अशा प्रभावशाली व्यक्तीला त्यांच्या वरिष्ठांकडून आणि सहकाऱ्यांकडून सतत सहयोग प्राप्त होत असल्यास त्यात नवल नाही. त्यांच्या मूळ कामातील कौशलता

त्यांची सर्वात मोठी जमेची बाब आहे. अभियांत्रिकीय कामासोबत आपली अकादमीक हौस ते पूर्ण करून घेतात. नवीन कामे किंवा नाविन्यपूर्ण पद्धती त्यांना सतत आकर्षित करत असतात. याचमुळे शासनातील अधिकारी असो किंवा विद्यापीठातील अध्यापक संवाद साधताना सहजता आणि समर्पकता श्री नाथ यांच्या ठायी दिसून येते. त्यांच्यासोबत घालवलेल्या कार्यावधीमध्ये माझ्या असे लक्षात आले की कोणत्याही कार्यातील यश हे साधनांवर अवलंबून नसते तर ते कार्य करणाऱ्याच्या सत्व आणि मनोबलावर अवलंबून असते. काम किती मोठे असले तरी त्यापासून विमुख व्हायचे नाही, न्याय नैतिकता मूल्ये अनुभव आणि नियमांची अवहेलना न करता कार्यपूर्ती करणे शक्य आहे हे त्यांच्या कार्यपद्धतीने निष्पन्न होते. त्यामुळे श्री नाथ यांची गौरव गाथा त्यांच्या कर्मण्यता शिलतेने, सेवेने आणि समर्थ समर्पणाने इतरांसाठी जलसंपदा आणि नैसर्गिक संपत्ती व्यवस्थापनात मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांचे हे चरित्र त्यांच्या कर्तृत्वांना आयुष्याचे आणि अमित व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावांचे उत्कृष्ट साहित्य असणार आहे. त्यांचे जीवन समाज उपयोगी कामांना प्रोत्साहन देणारे राहिले आहे. त्यांच्या चरित्राच्या प्रत्येक पृष्ठातून वाचक त्यांच्या जीवनातील गरिमामुळे प्रवासाचा आनंद तर प्राप्त करतीलच सोबत त्यांच्यातील खरे सत्व, नेतृत्व आणि दर्शनीयतेचा बोध प्राप्त करतील. त्यांनी त्यांच्या आयुष्यात अनुभवलेल्या अनेक कठीण प्रसंगातून काढलेले मार्ग नैराश्यातून बाहेर येऊन विपरीत परिस्थितीत केलेला सामना दुसऱ्यांच्या अपयशाचे खापर अंगावर आल्यावरही शांत चित्ताने केलेली सेवा अशा विषम वातावरणातही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात कणभर ही गढूळता येऊ न देता सातत्याने लोकहितशी कामांना करीत राहण्याची वृत्ती त्यांनी बाळगली आहे. यावरून स्पष्ट कल्पना संकेत मिळतात की त्यांनी आपल्या कर्तुत्वाने स्वतःची भाग्यरेषा रेखाटली आहे. माझे काही वैयक्तिक अनुभव या

ठिकाणी नमूद करावेसे वाटतात. एप्रिल २०२३ मध्ये त्यांना राज्य शासनाने वाल्मीच्या महासंचालक पदाच्या नियुक्तीचे आदेश जारी केले होते. त्यावेळेस मी पुण्याला काही शासकीय कामाच्या निमित्ताने गेलो होतो. तेथे आमची भेट झाली. त्यांना अजून एका संस्थेचा पदभार ग्रहण करायचा होता. तो त्यांनी पुण्यात ग्रहण केला. त्यानंतर त्यांची आणि माझी विविध विषयावर सार गर्भित चर्चा होत राहिली. वाल्मीच्या विकासाचे विषय त्यांच्या मनात होते. त्यांनी जाणून घ्यायचा प्रयत्न केला की भविष्यातील वाल्मी कशी असावी? यावर मी पण प्रांजळपणे आपले मत व्यक्त केले. वाल्मीच्या जुन्या इमारती, रस्ते आणि सेवा सुविधांना पूर्णपणे आधुनिक व जागतिक मानांकनाचे करता येणे शक्य असल्यास तसे प्रयत्न व्हायला हवेत असे मी त्यांना कळवले. त्यांना देखील अशा परिवर्तनाची वाल्मिची गरज आहे याची खात्री पटली. त्यांनी तसे त्यांचे विचार एका जाहीर कार्यक्रमात व्यक्त केले. त्यानंतर मी वैद्यकीय कारणामुळे कार्यालयापासून दूर राहिलो. या दरम्यान त्यांनी वाल्मीच्या विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचे प्रयत्न सुरू केले. प्रवेशद्वारापासून ते वर्ग खोल्यांपर्यंत सर्व सेवा सुविधांमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्याचे काम सर्वत्र एक साथ सुरू झाले. सुंदर साज सज्जा असलेले संस्थेचे परिक्षेत्र जागतिक मानांकनाच्या सेवा विविधतेने आणि नटलेल्या असाव्या असे त्यांचे विचार त्यांनी अनेक वेळा बोलून दाखवले होते. काही कामांमध्ये त्यांची प्रत्यक्ष कृती दिसायला पण लागली. माझ्या वैद्यकीय रजेच्या दरम्यान दोन-तीन वेळा त्यांच्याशी मोबाईलवर चर्चा पण झाली. त्यांनी मला प्रत्येक वेळी हेच म्हटले की सर तुम्ही तुमची तब्येत ठीक करून ऑफिसला या, तुमच्या नुसत्या उपस्थितीनेच मला भरपूर बळ मिळते. त्यांच्या स्वभावानुरूप त्यांनी मला अस्वस्थ केले होते. मी पूर्णपणे रोगाच्या उपचारावर केंद्रित होऊ शकलो आणि जीवन

मरणाच्या संगमातून समर्थपणे बाहेर येऊन कार्यालयात रुजू झालो. त्यांनी अत्यंत शांत चित्ताने माझी ठराविक कथा ऐकून घेतली आणि मला म्हणाले की तुम्ही आपली तब्येत सांभाळून तुम्हाला जेवढे झेपेल तेवढे काम करा मी सुद्धा त्यांच्या मित्रहोत सल्ल्याचा गंभीर तेने विचार केला आणि हळूहळू आपल्या दायित्वाचे निर्वाहन करण्यास सुरुवात केली. या अवधीमध्ये त्यांच्याशी पुनश्च विविध विषयावर चर्चा होत राहिल्या. एकमेकांचे विचार जुळले तर संस्थेच्या चौफेवर विकासाचे चक्र दृत गतीने नेता येते हे पुनश्च सिद्ध झाले. वाल्मीचे इन्फ्रास्ट्रक्चर आणि कार्य विषयांमध्ये नाविन्यता आणि आधुनिकतेचा संगम साध्य करण्याचे कठीण काम सुरू झाले आहे. त्यांनी अनेकदा माझ्याशी चर्चा करताना अत्यंत मोलाचा असा प्रश्न कथन केला. ते म्हणाले एकदा त्यांची बदली झाल्याचे आदेश शासनाकडून त्यांना प्राप्त झाले होते. दुसऱ्या दिवशी त्यांना नवीन प्रभाराच्या ठिकाणी उपस्थित राहायचे होते. त्यातच त्यांना सायंकाळी मुख्य अभियंता कडा यांचे कडून नवीन आदेश प्राप्त झाले. लोअर दुधना प्रकल्पासाठी एका गावातील भूमीचे अधिग्रहण तातडीने करण्याबाबत निर्देश होते. त्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात येणार होते. त्यांनी थोडाही वेळ न घालवता दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी, पोलीस दल इत्यादींना सोबत घेऊन गावातील पुढाऱ्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. त्यांनी दुपारपर्यंत गावातील लोकांना जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याच्या सूचना केल्या. सुरुवातीला पुढाऱ्यांनी त्यांच्यावर दबाव आणला. धमक्या दिल्या. परंतु त्या सर्वांना बळी न पडता ते आपल्या निश्चयावर ठाम राहिले. गावात घोषणा केली की शासनाने दिलेल्या अवधीत भूमि अधिग्रहित न झाल्यास त्यांना कठोर कारवाई करावी लागेल. लोकांशी व गावातील पुढाऱ्यांशी त्यांनी सातत्याने व शांतपणाने वार्ता केली. हळूहळू गावातील लोकांचे मत परिवर्तन

करण्यात ते यशस्वी झाले. संध्याकाळी सूर्यास्त व्हायच्या आत शासनाने त्यांना दिलेली जबाबदारी पूर्ण कर्तव्यनिष्ठतेने पूर्ण करून ते आपल्या नवीन पदस्थापनेच्या जागी कामावर रुजू होण्यासाठी रवाना झाले. आपण केलेल्या उत्कृष्ट कामाच्या मोबदल्याची अपेक्षा न बाळगता किंवा शासनाचे कुठलेही प्रशस्तीपत्र किंवा प्रशंसा बोलाची अपेक्षा न करता हा अधिकारी अगदी नि:ष्पृह पणे यशाचे सर्व मान सोडून आपल्या नवीन कामावर रुजू होण्यासाठी चालता झाला. ही अशी अनेक उदाहरणे त्यांच्या कारकिर्दीत घडली आहेत. त्यांच्या चरित्रात त्यांचे यथायोग्य वर्णन नक्कीच येणार आहे. श्री नाथ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श घ्यावा असे त्यांचे कार्य आहे. शासनातील अनुभवाचे त्यांचे विचार नक्कीच अभियंत्यांना नवीन अभियंतांना मार्गदर्शक ठरतील. शासनात असताना अनेक चांगल्या वाईट गोष्टींचा पाठपुरावा करणारी डोकी समाजात असतात. त्यातूनच उच्चपदस्थ अधिकारी सुटत नाहीत. श्री नाथ यांच्या कार्यशैलीतून समाजास उपयोगी अनेक कार्यक्रम राज्यात उभे राहिले आहेत. ही जमेची बाब आहे. या व्यतिरिक्त त्यांना भारतीय परंपरा आणि संस्कृतीचे विशेष ज्ञान आहे. आपल्या आराध्याचे ध्यान करणे, पूजा पाठ करणे आणि भक्ती भावाने कुटुंबातील वातावरण सुसंस्कृत ठेवणे हे त्यांनी सातत्याने पाळले आहे. त्यांच्या आयुष्यात प्रत्येक पावलागणिक त्यांना समर्थपणे साथ देणारी त्यांची भार्या स्वप्नजा यांच्या कणखर व्यक्तिमत्त्वाचा कणा आहे. भगवंताच्या कृपेने त्यांच्या मुलांवर त्यांनी केलेल्या संस्कारामुळे समाजाला उत्कृष्ट असे नागरिक प्राप्त झाले आहेत. त्यामुळे त्यांनी पारिवारिक आणि गृहस्थी धर्माचे पालन यशस्वीपणे करून आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडली आहे. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी श्री वि बा. नाथ यांचे मनापासून अभिष्टचिंतन करतो ईश्वर आणि गुरूंच्या चरणी त्यांच्या उज्वल व मंगलमय आयुष्याची प्रार्थना करतो

त्यांचे चरित्र युवा पिढीला मार्गदर्शन करणारे असावे अशी मंगल कामना करतो आणि थांबतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

संपादकीय

अनाथांचा नाथ विश्वनाथ

विजयकुमार मोरे
संपादक/लेखक

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले असले तरी मराठवाड्याला एक वर्ष उशिरा स्वातंत्र्य मिळाले आहे. जरी स्वातंत्र्य मिळाले असले तरी खऱ्या स्वातंत्र्याची गंगा गोरगरिबांच्या दारात आजही पोहोचलीच नाही. गोरगरीब, शोषित भटका समाज आजही शोषणाची शिकार होत आहे. फरक एवढाच पडला आहे की पूर्वी थेट अत्याचार आणि शोषण होत असे. अलिकडे मात्र अप्रत्यक्षरीत्या ते होत असते. स्वातंत्र्यानंतरची पहिली दहा वर्षे सुधारणा करण्यात गेली. सुधारणा म्हणजे ज्यांच्याकडे मोटार सायकल होती त्यांच्याकडे चार चाकी आली, ज्यांच्याकडे एक चार चाकी होती त्यांच्याकडे दोन चार चाकी आल्या. परंतु गाव कुसाबाहेर राहाणारा दलित, भटका समाज मात्र ८० च्या दशकापर्यंत दारोदारी भिक्षा मागूनच आपला उदरनिर्वाह चालवत असे. शिक्षणाची दारे संविधानामुळे सर्वांना खुली झाली असली तरी उच्च शिक्षण घेऊन आपणही अधिकारी होऊ शकतो ही मानसिकताच रुजू दिली गेली नाही. त्यामुळे स्वातंत्र्याचा खरा फायदा समजून घ्यायला गावकुसाबाहेरच्या समाजाला ४० ते ५० वर्षे वाट बघायला लागली. तरी देखील पूर्णपणे स्वातंत्र्य उपभोक्ता आले नाही. एखादा शोषित समाजातील मुलगा शिकून मोठा साहेब झाला तरी प्रस्थापित समाज त्याला स्वीकारायला तयार होत नाही. शोषित पीडित वर्गातला एखादा मुलगा कलेक्टर झाला किंवा तहसीलदार झाला तरी प्रस्थापित समाज त्याला सन्मानपूर्वक वागणूक न देता कुठे अडचणीत आणून त्याची नोकरी कशी घालवता येईल याचाच विचार सतत करीत असतो. यामुळे राज्याच्या किंवा देशाच्या प्रशासनात अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच मोठे प्रशासकीय अधिकारी शोषितांमध्ये होऊन गेलेत. त्यातल्या त्यात भटक्या विमुक्त समाजातील लोकांना तर जाणीवपूर्वक स्वातंत्र्याच्या लाभापासून दूर ठेवले गेले आहे. काही भटक्या समाजांना आजही

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही चोर ठरवून समान संधी दिली जात नाही. त्यांना शिक्षण आणि नोकरीपासून दूर ठेवले जाते. जीवन जगताना अनेक अडथळ्यांच्या नद्या पार कराव्या लागतात. त्यातून एखादा अधिकारी झाला किंवा कोणी राजकारणात आला तर त्याला वेगळे पाडण्यासाठी किंवा संधी मिळू नये यासाठी प्रस्थापित समाजातील लोक आपसातील सर्व मतभेद विसरून एकत्र येतात आणि त्यांची संधी हिसकावून घेतात. आजही परिस्थिती काही अंशी तशीच आहे असे म्हणावे लागेल. परंतु जी मुले शिक्षण घेऊन आपल्या मेंदूचा वापर करायला शिकली ती हजारो संकटे आली आणि अडथळे आले तरी ती पार करून यशाच्या शिखरावर पोचली. शिखरावर पोहोचली असली तरी त्यांचा वनवास मात्र संपलेला नाही. परंतु तो त्यांनी आपल्या कर्तव्यात कधीच दिसू दिला नाही. आपल्या समाजातील अनेकांना प्रेरणा मिळेल असे वर्तन त्यांनी ठेवले आणि आम्ही बुद्धीचा वापर करणारी माणसेच आहोत हे सिद्ध करून दाखवले. अशा सर्व परिस्थितीचा सामना करीत करीत सरकारी खात्यातील आपल्या सेवेतील सर्वोच्च पदापर्यंत पोहोचणारी अगदी दुर्मिळ आणि हाताच्या बोटावर मोजता येणारी माणसे प्रशासनात यशस्वी झाली आहेत. त्यापैकी एक म्हणजे महाराष्ट्र राज्याची स्वायत्त संस्था असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील वाल्मी या संस्थेचे महासंचालक इंजि. विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे होत. जन्मापासून ते आतापर्यंत केवळ संघर्षाचे जीवन जगत आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणारे हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. आजही त्यांना विचारले की तुमच्या या यशाचे रहस्य काय आहे तर ते सांगतात जर तुमचे ध्येय सुस्पष्ट असेल आणि विचारांची दिशा योग्य असेल तर तुम्हाला तुमची जात, तुमची गरिबी, तुमचा धर्म तुमचा समाज व्यवस्था आड येऊ शकत नाही आणि अडथळे निर्माण करू शकत नाहीत. फक्त हार न मानता सतत प्रयत्नशील राहायला

हवे आणि आलेल्या संकटांना सतत सामोरे जात राहिले पाहिजे. आलेल्या संकटाकडे एक संधी म्हणून पाहिले पाहिजे. त्यातून काही शिकले पाहिजे ही इंजिनियर विश्वनाथ नाथ यांची विचारसरणी आहे. इतके कणखर हे व्यक्तिमत्व कसे झाले याविषयी जाणून घ्यायचे असेल तर त्याच्या आयुष्याचा आलेख पाहावा लागेल. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात परभणी शहरापासून जवळच असलेले शिंगणापूर हे गाव इंजि. विश्वनाथ नाथ यांचे मूळ गाव! कुसाबाहेर नाथपंथी समाजाच्या कुटुंबाच्या दोनच झोपड्या होत्या. शेती नाही, नोकरी नाही, उत्पन्नाचे दुसरे कुठलेही साधन नाही, पारंपारिक व्यवसाय म्हणजे भगवान शंकराचे भक्त म्हणून पूजाअर्चा करायची आणि गळ्यात झोळी अडकवून दिवसभर फिरून धान्याचे पीठ मागायचे आणि त्या पिठाच्या भाकरी बनवून जीवन जगायचे हाच नाथपंथी समाजातील लोकांचा व्यवसाय होता. परंतु जे एकाच गावात स्थिरावलेले आहेत त्यांना रोज रोज कोण पीठ देणार आहे? जे लोक दररोज गावे बदलतात त्यांना ते शक्य होते. परंतु एकाच गावात स्थिरावलेले लोक आहेत त्यांना रोज कोणीही पीठ देत नसत. मोलमजुरी करून खावा अशी बोलणी खावी लागायची. माणूस म्हटलं की कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात स्वाभिमान नावाची एक गोष्ट लपलेली असते. ती माणसाला या लाचारीच्या जगण्यातून बाहेर करीत असते. शिंगणापूरच्या गाव कुसाबाहेर नाथपंथी समाजाच्या दोनच झोपड्या होत्या. त्यामध्ये बाबुनाथ नाथ आणि त्यांच्या भावाची अशी दोन कुटुंबे त्या झोपड्यांमध्ये राहत असत. बाबुनाथ यांच्या पत्नी शांताबाई यांचे माहेर परभणी जिल्ह्यात असलेले मानवत हे होय. त्यांच्या घरचीही परिस्थिती बिकटच होती. त्यावेळी सर्वांचीच परिस्थिती बिकट असायची. त्यामुळे लग्न जमवण्यासाठी फारसे अडथळे येत नसायचे. सासरी देखील अठरा विश्व दारिद्र्य आणि मातापित्यांची माया मात्र मुलांना पालन पोषणात कमी कशी

पडेल ? भिक्षा मागून आपल्या पोरांची पोटांची खळगी भरणार नाहीत तर ते आपले कष्टच आपल्याला आयुष्य जगण्याचा मार्ग सुकर करतील याची आंतरिक जाणीव झाल्यामुळे बाबुनाथ आणि शांताबाई नाथ यांनी पारंपारिक पद्धतीचे पीठ मागण्याचे काम सोडून दिले आणि कष्ट करून स्वाभिमानाचे जगणे सुरू केले. तो काळ अतिशय दुष्काळाचा आणि सर्वांचीच परिस्थिती गरिबीची असणारा होता. बाबुनाथ यांची प्रकृती किरकोळ अशीच असल्यामुळे आपल्याला झेपेल असेच काम त्यांनी स्वीकारले होते. शिंगणापुरातील एका शेतकऱ्याने पिठाची गिरणी विकत घेतली होती. या पिठाच्या गिरणीमध्ये काम करायला कोणी तयार होत नसे. कारण बारा तास पिठाच्या धुरळ्यात राहून पीठ नाकात, तोंडात आणि डोळ्यात जाऊन वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागायचे. त्यामुळे सहसा कोणी पिठाच्या गिरणीत काम करायला तयार होत नसत. परंतु बाबुनाथ यांनी आपल्या चिमुकल्यांसाठी स्वतःच्या जीवाची परवा न करता ते काम स्वीकारले. शांताबाई यांनी देखील दुसऱ्यांच्या शेतात शेतमजूर म्हणून काम करायला सुरुवात केली. कधी कधी अशी शेतातली कामे नसली तर मग कुणाची धुणीभांडी करणे, कोणाचे घर सारवून देणे, कुणाच्या गुरांच्या गोठ्यातील शेण काढणे अशा प्रकारची पडेल ती कामे करून आपला संसार शांताबाईंनी उभा केला. बाबुनाथ आणि शांताबाई यांना तीन मुले. त्यापैकी मोठी मुलगी तिचे कमी वयातच लग्न झालेले, दुसरे अपत्य विश्वनाथ आणि तिसरे व शेवटचे अपत्य काशिनाथ. तिन्ही मुले आणि हे दोघे पती-पत्नी असे पाच जणांच्या कुटुंबाचा गाडा चालवता चालवता नाकी नऊ यायचे. दिवसभर मरेपर्यंत कष्ट करूनही संध्याकाळी पोटभर अन्न मिळेल याची खात्री नव्हती. कारण १९७० ते ७२ या काळामध्ये देशभरात दुष्काळाची दुष्ट छाया पसरली होती. त्या १९७२ च्या दुष्काळात पाण्याची फारशी टंचाई नव्हती,

परंतु अन्नधान्याची मात्र तीव्र टंचाई होती. त्यामुळे लोकांना एक वेळचे देखील पोटभर अन्न खायला मिळत नसायचे. शांताबाई दिवसभर दुसऱ्याच्या शेतात भांगलण, खुरपण करायला म्हणजे गवत काढायला जायच्या. त्यावेळी कामावरुन येताना गवत काढताना भाजीची देठे वेगळी काढून ठेवायच्या आणि संध्याकाळी घरी येताना ही भाजी म्हणजे खरं तर ते एक प्रकारचे गवतच होते घरी घेऊन येत असत आणि ती भाजी शिजवून त्यावरच रात्र काढली जायची. परंतु नुसत्या भाजीने मुलांची पोटे भरायची नाहीत. मग शांताबाई वाडगाभर पीठ कुणाकडून शेजारून किंवा मैत्रिणीकडून उसने आणायची आणि त्या वाडगांवर पिठात शेतातून आणलेली भाजी शिजवून मिसळायची आणि त्याच्या चार पाच भाकरी बनवून प्रत्येकाला एक एक खाऊन आपल्या दिवसाची सुरुवात करावी लागायची. कधी कधी बाबुनाथ हे देखील पिठाच्या गिरणीतील काम संपवून घरी परतताना मालकाच्या परवानगीने पसाभर पीठ घेऊन यायचे. गिरणी मालकही रोज पीठ कसे देतील? जेवढे मिळेल तेवढ्यावर त्यांना उदरनिर्वाह करावा लागायचा. अशाप्रकारे जगण्याची धडपड चालू होती. मुलांचा सांभाळ सुरू होता. जगण्याची धडपड चालू असताना शांताबाई दुसऱ्याच्या शेतात कामाला जाताना बघायच्या काही लोकांची मुले शाळेत जायची. चांगले कपडे घालायचे. ते बघून त्यांनाही मनात वाटायचे की आपल्याही मुलांनी असेच शाळेत जायला हवे. परंतु तो काळ असा होता की शिक्षणाचे महत्व खेड्यापाड्यात पोहोचलं नव्हतं. पारंपारिक पद्धतीने सुरू असलेला व्यवसाय करावा लागायचा. असा संकेतच होता. त्यामुळे आपली मुले शिकून काय करणार आहेत असे त्यांना कधी कधी वाटायचे. एक दिवस गावातल्या शाळेतले मास्तर सहज रस्त्याने जाता जाता शांताबाईच्या झोपडी जवळ आले आणि म्हणाले, शांताबाई तुमच्या मुलाला शाळेत पाठवा. चार बुके

शिकला तर कुठेतरी शिपाई म्हणून चिटकेल. शांताबाईना या मास्तरांचे बोलणे पटले. त्यांनी विश्वनाथला शाळेत पाठवण्यास सुरुवात केली. विश्वनाथला देखील शिक्षणाची आवड होती. तो न चुकता दररोज शाळेत जात असे.गणवेषाची बोंबाबोंब असायची. खाण्या पिण्याची आबळ असायची. परंतु शाळा त्यांनी कधीही चुकवली नाही. घरात अठरा विश्व दारिद्र्य असले तरी शाळेला जाण्यात कुठलाही अडथळा निर्माण झाला नाही. गावातल्या हनुमान मंदिरात त्यावेळी शिंगणापुरात शाळा भरायची. गावातील दहा-बारा मुले त्या शाळेत पायी चालत जात असत. सर्व मुलांमध्ये विश्वनाथ सर्वात हुशार मुलगा होता. वर्गात गुरुजींनी एकदा शिकवले की ते सर्व त्याच्या लक्षात राहायचे. त्यामुळे त्याला बालवयातच शिक्षणाची मोठी गोडी निर्माण झाली होती. त्यांचा लहान भाऊ काशीनाथ मात्र शिक्षणापासून वंचित राहिला. कारण तो अगदी लहान असतानाच गावातून खेळण्यासाठी फिरत जात असताना एका लोहाराच्या घरासमोरून समोर जात असताना बैलगाड्याच्या चाकाची धाव म्हणजे रिंग उभी करून ठेवली होती. चुकून त्याला भावाचा धक्का लागला आणि ती लोखंडी धाव भावाच्या डोक्यावर कानाच्या बाजूला पडली आणि कानातून रक्त वाहू लागले. त्यावेळी आजच्या सारख्या वैद्यकीय सुविधा नव्हत्या आणि शहरातल्या दवाखान्यात घेऊन जाण्यासारखी परिस्थिती देखील नव्हती. घरगुती उपचार करुन शांताबाईनी मुलाची जखम बरी केली. परंतु किाशीनाथला कायमचे बहिरेपण आले. या परिणामी त्याचे शिक्षण नाही झाले. नोकरी नाही. आयुष्यभरावर त्या अपघाताचा परिणाम झाला. विश्वनाथ यांनी आपल्या भावाला अगदी लहानपणापासूनच तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले आहे. शालेय जीवनात अगदी शेवटपर्यंत विश्वनाथ यांची अभ्यासातील प्रगती आणि शिक्षणाची आवड बघून शांताबाई यांनी त्याला मानवतला आपल्या भावाकडे पाठवायचा निर्णय

घेतला. कारण त्यांचा लहान भाऊ देखील मानवतच्या शाळेत शिक्षण घेत होता. दोघे एकमेकांच्या संगतीने शाळेत जातील असे त्यांना वाटायचे. शिंगणापूरात कधी कधी घरच्या अडचणीमुळे शाळा बुडवावी लागायची. कधी कधी आईबरोबर शेतीची कामे करायला जावे लागायचे. त्यामुळे शाळेत जाता येत नसायचे. म्हणून आईने आईनेच मुद्दाम निर्णय घेतला की विश्वनाथला मानवतला पाठवायचे. त्यावेळी रेल्वेचे तिकीट देखील रुपया किंवा दीड रुपया असावे. तेवढे पैसे देखील त्यांच्याजवळ त्यावेळी नसायचे. शेवटी पैशाची जमवाजमव करून माय लेकरांनी मानवत गाठले आणि विश्वनाथ यांचे नाव मानवतच्या नेताजी सुभाषचंद्र बोस या शाळेत दुसरीच्या वर्गात दाखल केले. त्यावेळी विश्वनाथचा मामा गोपीनाथ जाधव हा देखील चौथीच्या वर्गात त्याच शाळेत शिकत होता. तेव्हापासून दोघे मामा भाचे दररोज शाळेत जाऊ लागले. मानवत मधील मामाचे घर देखील फार मोठे नव्हते. जेमतेम चार-पाच माणसं राहू शकतील इतके मोठे होते. त्यात दोन मामा विश्वनाथ आणि त्यांची आजी अशी चौघेजण तिथे राहात असत. आजी या मुलांचा संभाळ करीत असे. जेवण खावण तयार करणे, घर सांभाळणे ही कामे आजीच करायची. मोठा मामा आदिनाथ जाधव हा उपजीविकेसाठी शाळेच्या बाहेर किंवा सार्वजनिक ठिकाणी गोळ्या आणि बिस्किटे विकायचा व्यवसाय करीत असे. गोपीनाथ जाधव शिक्षण घेत असे. अतिशय कमी वयामध्ये या मामांना कष्टाची सवय लागली होती. परिस्थिती सर्व काही शिकवते असे म्हणतात ते हेच! घरात १८ विश्व दारिद्र्य असल्यामुळे उत्पन्नाचे साधन काहीच नसल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी हा व्यवसाय त्यांना करावा लागायचा. मोठा मामा शाळेच्या बाहेर मुले आली की तिथे तो गोळ्या बिस्किटे विकायचा. कुटुंबाचा उदरनिर्वाह व त्यामध्ये भागत नव्हता म्हणून लहान मामा शाळेतील मुख्याध्यापकांची परवानगी घेऊन मधल्या सुट्टीत शाळेत

देखील गोळ्या बिस्किटे विकायचा. त्यातून चार पैसे मिळायचे. त्याचे बघून विश्वनाथलाही वाटायला लागले की आपणही मामासारखे गोळ्या बिस्किट विकून चार पैसे कमावले पाहिजेत. मामाकडून प्रेरणा घेऊन त्यांनेही गोळ्या बिस्किटे विकण्यास सुरुवात केली. सुरुवातीला लाज वाटायची. मुले चिडवायची. परंतु कष्ट करून कमवायला काय हरकत आहे. मात्र या मामा भाच्यांनी कुठल्याही प्रकारची लाज किंवा भीती न बाळगता गोळ्या बिस्किटे चॉकलेट विकून चार पैसे कमवायला सुरुवात केली. तेवढाच मोठ्या मामाला हातभार लागत होता. या व्यवसायात इतके सातत्य होते की छोट्या मामाने गोळ्या बिस्किटांचे पैसे साठवून एक शेळी म्हणजे बकरी विकत घेतली होती. बकरी विकत घेण्याचे कारण एक तर ती कमी जागेत बांधता येते. त्यापासून दूध मिळते आणि सर्वात म्हणजे वर्षातून दोन वेळा ती पिल्लांना जन्म देते. कधीकधी एका वेळेस दोन बोकडांना जन्म देते. जनावरांच्या बाजारात बोकडांना मोठी किंमत मिळते. त्यामुळे शेळी हा अतिशय कमी त्रास देणारा आणि भरपूर उत्पन्न देणारा प्राणी आहे. मामाची बघून विश्वनाथ यांने देखील एक शेळी विकत घेतली. त्यापूर्वी मामाकडे एक गाय देखील होती. गाय बांधण्यासाठी मोठी जागा लागायची. मग दोन शेळ्या आल्यानंतर मामा भाच्याने निर्णय घेतला की गायला शिंगणापूरला बहिणीकडे पाठवावे. तिची देखभाल चांगल्या प्रकारे होईल आणि बहिणीलाही आर्थिक हातभार लागेल हा त्या मागचा उद्देश होता. परंतु गाय पोहच कशी करणार असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी विश्वनाथ आणि मोठे मामा आदिनाथ यांनी मानवत येथून चालत शिंगणापूरला जाण्याचा निर्णय घेतला. मानवत ते शिंगणापूर ४५ किलोमीटर अंतर चालत गेले आणि गाय घरी पोहोच केली. आपल्या लहानग्या मुलाने ४५ किलोमीटर अंतर पायी चालत आल्याने शांताबाईला वाईट वाटले आणि त्याचे कौतुक हे वाटले. विश्वनाथ यांचा एकीकडे अभ्यास सुरू

होता तर दुसरीकडे गोळ्या बिस्कीट आणि चॉकलेटची विक्री वाढली होती. शाळेत स्पर्धा असल्या किंवा विशेष काही कार्यक्रम असले तर गोळ्यांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असे. चांगले पैसे मिळत असत. एक दिवस गोळ्या विकत असताना त्यांच्या पुढे उभे असलेल्या मुलांनी त्याच्या पुढच्या मुलाच्या डोक्यावर टपली मारली आणि सटकन सटकून बाजूला झाला. ज्या मुलाला मारले त्याने मागे वळून पाहिले तर टपली मारणारा सटकून गेल्यामुळे मागे विश्वनाथ दिसला. त्यांनी मुख्याध्यापकाकडे विश्वनाथची तक्रार केली. त्यावेळी विश्वनाथ यांनी जीव तोडून मुख्याध्यापकांना सांगितले की मी टपली मारली नाही. परंतु मुख्याध्यापकांनी अजिबात ऐकले नाही. विश्वनाथला विनाकारण शिक्षा केली म्हणून दोन दिवसानंतर त्या टपली मारलेल्या मुलाला सत्य उमगले. त्याने विश्वनाथ यांना जवळ बोलून सांगितले सॉरी बरं का! मला टपली दुसऱ्याच मुलाने मारली होती. परंतु मी तुझी तक्रार केल्यामुळे तुला शिक्षा सहन करावी लागली. मुख्याध्यापक यांनी देखील तुझी काही चूक नव्हती. परंतु शिक्षा दिल्याबद्दल बद्दल खंत व्यक्त केली. तू मेहनती आहेस, हुशार आहेस खूप अभ्यास कर, कुणाच्या खोड्या काढायच्या भानगडीत पडायचे नाही असे बोलून विषयावर पडदा टाकला गेला.

मानवतच्या नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयात शिकणारी जवळपास सर्वच मुले ग्रामीण पार्श्वभूमी असणारी होते. त्यांना मेहनतीची सवय होती. शाळेची जुनी इमारत सोडून गावाबाहेर नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेतला गेला होता. कमी खर्चात इमारत बांधण्यासाठी विद्यार्थ्यांनी श्रमदान करायचे ठरवले. सर्व विद्यार्थी शाळेच्या बांधकामात अनेकदा पडेल ती कामे करून श्रमदान करीत होते. शाळेबरोबरच शिक्षक कॉलनीचे काम देखील त्याच वेळी सुरू केलेले होते. तिथे देखील ही सर्व विद्यार्थी सेना जाऊन श्रमदान करीत होती. सुट्टीच्या दिवशी विश्वनाथ आणि त्यांचे मामा शेळ्या घेऊन

त्यांच्या मित्राच्या शेतावर चारण्यासाठी जात असत. विश्वनाथ याची शाळेची वेळ सकाळी सात ते दुपारी बारा अशी असल्यामुळे दुपारी ते शेतावर शेळ्या चारण्यासाठी जात असत. त्यामुळे या मुक्या प्राण्यांशीही त्यांचा खूप लळा लागला होता. गोपीनाथ मामाचा तर इतका लळा होता की त्या मामाने बोटाने शिट्टी वाजवली की जिथे असेल तिथून शेळी पळत त्यांच्याजवळ येत असे.

एकदा तर दुसऱ्या एका घरात गोपीनाथ मामा बसले आणि दरवाजा लावला आणि आतून शिटी वाजवली तर ती शेळी त्या मामाच्या दरवाजाजवळ जाऊन उभी राहिली. प्राणी असो की माणूस प्रत्येकाशी प्रेमाने वागणे, लळा लावणे या गोष्टी विश्वनाथ यांनी मामाकडून शिकल्या आहेत. त्याचा पुढे त्यांना आयुष्यात खूप उपयोग झाला. उन्हाळी सुट्ट्या किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये विश्वनाथ नेहमी आईकडे शिंगणापूरला जात असे. शरीराला कष्टाची सवय झाली होती. त्यामुळे खेळण्या बागडण्यापेक्षा आईला कशी मदत होईल यासाठी त्यांचा जीव धडपडायचा. त्यासाठी ते आईबरोबर शेतात काम करायला जायचे. आठवड्याला साठ रुपये पगार मिळायचा. तो पगार जसाच्या तसा आईच्या हातावर देताना त्यांना कोण आनंद व्हायचा! अगदी बालपणापासून विश्वनाथ हे मातृभक्त आहेत. आईच्या हाताला गवत कापले तर वेदना विश्वनाथ यांच्या हृदयाला व्हायच्या आणि विश्वनाथला काही लागले तर आईच्या काळजाचं पाणी व्हायचे. या माय लेकरांचे नाते होते असे होते.शेवटपर्यंत आई विश्वनाथ यांच्या सोबतच राहिली. लहान भाऊ आणि त्याचे कुटुंब हे त्यांच्या सोबतच एकत्र कुटुंबात राहतात. त्याच दरम्यान बहिणीचे लग्न देखील झाले. एकंदरीत जीवनसंघर्ष चालूच होता. दिवसा मागून दिवस जात होते. विश्वनाथ त्याच्या शिक्षणाची गाडी वेगात चालत होती. अभ्यासातील प्रगती देखील चांगली होती. शिक्षकांचा आवडता विद्यार्थी म्हणून विश्वनाथ यांनी सर्वांच्या मनात

घर केले होते.

शेवटी दहावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन शाळेच्या आणि स्वतःचा, स्वतःच्या कुटुंबाचा नावलौकिक त्यांनी वाढविला. सन १९८४– ८५ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर विश्वनाथ यांचा औरंगाबाद म्हणजे आत्ताच्या छत्रपती संभाजी नगरच्या पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये नंबर लागला. त्याच वेळी संत तुकाराम या शासकीय वस्तीगृहामध्ये देखील प्रवेश मिळाला. पहिले वर्ष ते अधून मधून सुट्टी असल्या की गावी शिंगणापूरला आईकडे जात असत. एकदा तर त्यांनी आई काम करीत असलेल्या रोजगार हमी योजनेच्या सडक बनवायच्या बांधकामावरही काम केले आहे. आज लोकांना ते खरे वाटणार नाही. परंतु ते वास्तव आहे. विश्वनाथने आयुष्यात कधीच कुठल्या कामाची लाज बाळगली नाही. त्यांच्यावर जबाबदारी पडली किंवा टाकली गेली तर ते कधी त्यापासून मागे हटले नाहीत. कोणतीही कारणे न देता रिझल्ट देणे हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य आहे. विश्वनाथ हे जिथे जातील तिथे आपल्या हुशारीने शिक्षकांची मने जिंकून घेत असत.

नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयात असताना श्री नेवरेकर, श्री यलमटे, श्री बंडे, या शिक्षकांचे ते आवडते पट्ट शिष्य होते. अनेकदा त्यांनी म्हणजे या शिक्षकांनी विश्वनाथ यांना आर्थिक मदतीचा हात दिला होता तर अनेकदा अभ्यासात देखील मदत करायची. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच विश्वनाथ यांनी आयुष्यात इंजिनियर होण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी परिस्थिती कितीही बिकट असली तरी मनाचा निर्धार कायम असेल तर त्याला कोणीही अडवू शकत नाही. यश त्यांच्यापासून दूर जाऊ शकत नाही. यशापासून त्यांना कोणीही रोखू शकत नाही हा शिक्षकाने दिलेला कानमंत्र विश्वनाथ यांनी आपल्या आयुष्याचा जीवन मंत्र बनवला

म्हणूनच ते आज यशस्वीपणे या उच्च पदावर पोहोचले आहेत. औरंगाबादला पॉलिटेक्निकला असताना दुसऱ्या वर्षी होस्टेलला प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांना भाड्याची खोली घेऊन राहावे लागले. अर्थात खर्च वाढला. त्यावेळी प्राध्यापक देशपांडे नावाच्या शिक्षकांची त्यांना भरपूर मदत झाली. दुसरे एक प्राध्यापक श्री नाईक ते स्ट्रक्चर हा विषय शिकवायचे आणि बाहेर खाजगी कामे देखील करायचे. त्यासाठी त्यांना सहाय्यक म्हणून विद्यार्थ्यांची गरज लागायची. त्यांनी काम देऊन विश्वनाथ यांना खूप मदत केली होती. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती म्हणून त्यांना मदत व्हावी म्हणून ते यांना काम देत असत. कधी कधी गावी आईला देखील ते पैसे पाठवून देत असत.

या प्राध्यापकांशिवाय प्राध्यापक मोगरे, प्राध्यापक कुलकर्णी यांनी देखील विश्वनाथ यांना अनेकदा आर्थिक मदत केली होती. सचोटी आणि आपले काम प्रामाणिकपणे करणे या दोन गुणांमुळे त्यांचे पॉलिटेक्निकल मधील शिक्षण व्यवस्थितरित्या पार पडले. पॉलिटेक्निकचा निकाल अद्याप बाकी होता त्या आधीच पॉलिटेक्निकचे प्राचार्य यांनी विश्वनाथ यांना व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून शिकवण्याची संधी दिली. त्यातूनच त्यांना दर तासाला पंधरा रुपये मिळायचे आणि प्रॅक्टिकल चे ३० रुपये मिळायचे. त्यातून बहुतांशी खर्च भागायचा. पॉलिटेक्निकला असताना स्ट्रक्चर हा विषय विश्वनाथ यांचा आवडता विषय होता. त्यामुळे तो इतका पक्का विषय झाला होता की ते एखाद्या सिनियर प्राध्यापकापेक्षा अधिक चांगले शिकवायचे. सुरुवातीला एक दोन विद्यार्थी त्यांच्याकडे शिकवणीसाठी आले. त्यांना कॉलेजमध्ये शिक्षकांनी शिकवलेले स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग समजत नव्हते. परंतु विश्वनाथ यांनी शिकवलेले चांगले समजत होते. ती मुले वर्गात हुशार झाली. परिणामी इतर मुलांनीही विश्वनाथ यांच्याकडे शिकवणी सुरू केली.

त्यातून चार पैसे चांगले मिळू लागले. त्यातून घराकडे आईलाही काही पैसे नियमितपणे पाठवू शकले. अशा परिस्थितीत त्यांनी पॉलिटेक्निक आणि बी.ई. अशा दोन्ही पदव्या संपादन केल्या. कोर्स पूर्ण केले आणि चांगल्या गुणांनी उत्तीर्ण देखील झाले.

सन १९९६ मध्ये एका वृत्तपत्रात मुंबईतील एका नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक पाहिजे अशी जाहिरात आली. ते कॉलेज होते व्हीजेटीआय. त्यासाठी विश्वनाथ यांनी अर्ज केला. इंजीनियरिंगचे संपूर्ण ज्ञान तर विश्वनाथ यांना होतेच याशिवाय इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा सोप्या भाषेत शिकवण्याचा देखील भरपूर अनुभव होता. त्यामुळे त्यांचे तिथे त्वरित सिलेक्शन झाले. त्यांची पहिली नोकरी व्हीजेटीआय सारख्या नामांकित संस्थेत सुरू झाली. त्यावेळी ते पनवेल येथे राहत असत आणि मुंबईला नोकरीसाठी जात असत. त्या ठिकाणी दोन वर्षे काम केल्यानंतर त्यांची ओळख नाथपंथीय समाजाचे नेते आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर जयाजी नाथ यांच्याशी झाली. त्यांनी अशा गुणी माणसाला आपल्या सोबत ठेवण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी स्वतःची जागा नवी मुंबईत होती. त्या ठिकाणी राहायला विश्वनाथ यांना सांगितले आणि तेव्हापासून ते नवी मुंबई बेलापूर येथे राहू लागले. त्याच वेळी डॉक्टरांनी त्यांच्यासाठी एक मुलीचे स्थळ सुचवले. दोन्ही बाजूची पसंती झाल्यानंतर डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच विश्वनाथ यांचा विवाह पार पडला आणि त्यांच्या जीवनात प्रवेश केला. एकीकडे नवा संसार दुसरीकडे नोकरी आणि तिसरीकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्यासाठी अभ्यास अर्थात एमपीएससीची तयारी करणे चालू होते. त्यांच्या अभ्यासाची पद्धत त्यांनी स्वतः डेव्हलप केली होती. त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात ते एमपीएससी उत्तीर्ण झाले. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा खात्यात सहाय्यक कार्यकारी अभियंता वर्ग एक अधिकारी म्हणून त्यांना

नियुक्ती मिळाली. पहिली पोस्टिंग भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्प येथे झाली. त्यांचे कार्यालय पवनी येथे होते. या विभागांतर्गत ब्रह्मपुरी विभागात साडेतीन वर्षे सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून काम केल्यानंतर कार्यकारी अभियंता म्हणून नांदेड येथील विष्णू प्रकल्पावर त्यांची नियुक्ती झाली.

खरे तर कार्यकारी अभियंता झाल्यानंतरच त्यांच्या खऱ्या सेवेला सुरुवात झाली. नांदेड जिल्ह्याची संजीवनी ठरलेल्या विष्णुपुरी प्रकल्पाचे काम काही अंशी अर्धवट राहिले होते. विश्वनाथ यांनी रुजू होताच उरली सुरली सर्व कामे अतिशय वेगाने आणि दर्जेदार रीतीने पूर्ण करून नांदेड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमचा सोडवला. त्यामुळे जेव्हा नांदेड शहराचा इतिहास लिहिला जाईल त्यात इंजिनिअर विश्वनाथ नाथ यांचे नाव अग्रक्रमाने लिहिले जाईल. इंजिनिअर विश्वनाथ नाथ यांनी प्रसिद्धीपासून दूर राहून अतिशय महत्त्वपूर्ण अशी कामे केलेली आहेत. त्यातील महत्त्वाचे आणखी एक कार्य म्हणजे मराठवाड्याची भाग्यरेषा ठरलेली गोदावरी नदी आणि त्या नदीवरचे ११ उच्च पातळी बॅरेजेस यांच्या सुधारित मान्यता घेण्याचे महत्त्वाचे काम श्री विश्वनाथ नाथ यांनी केले आहे. जवळपास सात वर्षे या ठिकाणी त्यांनी कार्यकारी अभियंता म्हणून कार्य केले आहे. गोदावरी नदीवरील अकरापैकी चार उच्च पातळी बंधारे बांधकामाचे काम देखील नाथ यांच्याकडे होते. त्यातील बाभळीचा सर्वात मोठा बंधारा अत्यंत वादग्रस्त ठरला होता. आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर हा बंधारा असल्यामुळे दोन राज्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. हा बंधारा होऊ नये यासाठी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा वाद अगदी सर्वोच्च न्यायापर्यंत नेला होता. हा बंधारा होऊ नये यासाठी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी जंग जंग पछाडले होते. त्यात महाराष्ट्र सरकारची बाजू

तांत्रिक दृष्ट्या मांडण्याचे काम इंजिनिअर विश्वनाथ नाथ यांच्याकडे होते आणि ते त्यांनी अतिशय मेहनत घेऊन पार पाडले. हा बंधारा अनेक अडचणीवर मात करून पूर्ण केल्यानंतर तात्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी खास प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला आणि सत्कार देखील केला. त्यामुळे बाभळी बंधाऱ्याचे शिल्पकार असे इंजिनिअर विश्वनाथ नाथ यांचे वेगळे वर्णन केले जाते. बाभळी बंधारा हा तत्कालीन आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर आहे. त्याच्या खाली काही अंतरावर आंध्र प्रदेशमधील पोचमपाड धरण आहे. या धरणाचे बॅकवॉटर महाराष्ट्राच्या हद्दीत येते. हे पाणी जानेवारीनंतर आटून ते आंध्राच्या हद्दीत सरकते. त्यामुळे पोचमपाडच्या धरणाच्या पाण्याचा महाराष्ट्राला काहीच उपयोग होत नव्हता. त्यामुळे राज्याच्या सीमेवर बाभळी येथे उच्चस्तरीय बंधारा बांधण्याचे नियोजन करण्यात आले होते. परंतु पोचमपाड धरणाचे पाणी महाराष्ट्राच्या हद्दीत अडवले जाईल म्हणून आंध्र प्रदेश सरकारने विरोध केला. स्वतः चंद्राबाबू नायडू आणि त्यांचे चाळीस आमदार घेऊन ते साइटवर येऊन उपोषणाला बसले. या कठीण प्रसंगातून इंजिनियर विश्वनाथ नाथ यांनी मार्ग काढून स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेऊन त्यांचे संघटन करून बाभळीच्या कामास पूर्णत्वास नेण्यास मदत केली. हा सर्व कौशल्याचा भाग आहे. या बंधाऱ्याच्या निमित्ताने इंजिनीयर विश्वनाथ नाथ यांना दोन वेळा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यासमोर तांत्रिक प्रेझेंटेशन देण्याची संधी मिळाली होती. नांदेडचे खासदार भास्करराव खतगावकर आणि तात्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सर्वपक्षीय कमिटी स्थापन करून पंतप्रधानांची भेट घेतली आणि या भेटीत तांत्रिक प्रेझेंटेशन श्री विश्वनाथ नाथ यांनी केले होते. त्यानंतर केंद्रीय जलसंपदा मंत्री सैफुद्दीन शेफ यांनी पुढील आदेश येईपर्यंत काम बंद ठेवण्यास सांगितले होते आणि मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी

देखील त्याला मान्यता दिली होती. परंतु तोपर्यंत बऱ्यापैकी काम झाले होते. फाउंडेशनचे काम बऱ्यापैकी झाले होते. एकदा पाऊस सुरू झाला की तिथे काम करता येत नव्हते. त्यामुळे मार्च एप्रिल आणि मे पर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु इकडे तर काम बंद ठेवण्याचे आश्वासन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिले होते. हे काम होणे अत्यंत गरजेचे होते. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची मनातील इच्छा काय आहे हे विश्वनाथ नाथांनी ओळखले होते. त्यांनी रात्रीच्या वेळी काम करण्याचा निर्णय घेतला. ते काम कोणाच्या लक्षात येत नव्हते. परंतु एक दिवस काय झाले आंध्र प्रदेशातील एक माजी खासदार बिलोली धर्माबाद मार्गे रस्त्याने रात्रीच्या वेळी चालले होते. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की बाभळीचे काम बंद ठेवण्याचे आदेश असताना देखील बाभळी बंधाऱ्याचे काम सुरू आहे. त्यांनी दुसऱ्या दिवशी संपूर्ण आंध्र प्रदेशात खबर पोचवली आणि एकच गोंधळ उडाला. चंद्रबाबू नायडू संतापले. परंतु विलासरावांचे वाक्चातुर्य सर्वज्ञात आहे. गोड बोलून त्यांनी कुठेही मोठ्या प्रमाणात काम सुरू नसल्याचे सांगितले किरकोळ काही दुरुस्ती चालू असल्याचे सांगून वेळ मारून नेली. परंतु आंध्राच्या नेत्यांनी गोंधळ करून दिल्लीत बैठक बोलावली. त्या बैठकीत हा प्रश्न मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी अतिशय व्यवस्थितरित्या हाताळला. वर्षातले केवळ तीन महिनेच काम करण्यासाठी मिळायचे. त्यात कोर्टबाजी आणि राजकीय आंदोलने यामुळे कामाला असंख्य वेळा अडथळा निर्माण व्हायचा. शेवटी या प्रकल्पाचा मुख्य अधिकारी म्हणून स्थानिक लोकांना देखील यामध्ये विश्वनाथ यांनी आणले. त्यांनी लोकांना समजावून सांगितले की तुमच्या हितासाठी आम्ही काम करत आहोत. हा प्रकल्प झाला तर तुम्हालाच पाणी मिळेल. त्यानंतर स्थानिक लोकांनी एक संघर्ष समिती तयार केली आणि हा बंधारा झालाच पाहिजे यासाठी आवाज

उठवला. श्री कोम्पलवार यांनी मोठा पुढाकार घेतला. यामुळे दोन्हीकडून संघर्ष होऊन वाद सर्वोच्च न्यायालयात गेला. सर्वोच्च न्यायालयाच्या समितीने केंद्रीय जल आयोगाला तोडगा काढण्यास सुचवले आणि त्यानुसार दोन्ही राज्यातील प्रतिनिधींची एक कमिटी तयार करण्यात आली आहे. ही कमिटी एकत्र बसून तोडगा काढते.

बाभळी बंधारा पूर्ण झाल्यानंतर या बंधाऱ्याचे गेट केव्हा खोलायचे आणि केव्हा बंद करायचे याच्या तारखा ठरल्या गेल्या आहेत. त्या तारखा नुसार दोन्ही राज्यातील मिळून प्रतिनिधींची झालेली कमिटी बाभळीच्या गेटचे नियंत्रण करत असते. अशा प्रकारे प्रचंड संघर्ष करून अनेक अडथळे पार करून चार वर्षात हा बाभळी बंधारा पूर्ण झाला. या बाभळीचे एक पुस्तक तयार होईल इतका मोठा इतिहास आहे. परंतु या संघर्षाचा नायक होते इंजिनिअर विश्वनाथ नाथ! यशाचे नायक सारेच होतात पण संघर्षाचे नायक एखादाच होतो. बाभळीवर त्यांचे नाव कायमस्वरूपी कोरले गेले आहे एवढे मात्र खरे.

त्यानंतर २०१० मध्ये विश्वनाथ नाथ यांची बदली माजलगाव कालवा विभाग क्रमांक दहा परभणी येथे लोअर दुधना कॅनलच्या कामावर झाली. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या एआयव्हीपीतून निधी मिळणार होता. मुख्य कालवा २७ किलोमीटर लांबीचा होता. पुढे अंतर्गत कालव्याचे जाळे निर्माण झालेले होते. या कामी देखील इंजि. विश्वनाथ यांनी केलेल्या कामाची दखल सामान्य नागरिकांनी घेतली आहे. कालवा पूर्ण करून त्याची चाचणी वगैरे घेण्यापर्यंत जबाबदारी श्री नाथ यांनी पार पाडली आहे. विष्णुपुरीच्या कालव्याचे काम करण्याची जबाबदारीही त्यांचीच होती. ती त्यांनी चोखपणे पार पडली. विष्णुपुरीची लिफ्ट इरिगेशन योजना ही आशिया खंडातील सर्वात मोठी लिफ्ट इरिगेशन योजना

आहे. ७५० हॉर्सपावरच्या सहा मोटारी पंपाच्या साह्याने १८ मीटर उंचीवर पाणी लिफ्ट करून पाईप द्वारे तीन किलोमीटरवर येऊन कॅनलमध्ये सोडायचे होते. या लिफ्ट इरिगेशन योजनेमुळे जवळपास १२००० हेक्टर क्षेत्राला लाभ मिळणार होते. शेतकऱ्यांच्या आनंदाला पारावरच उरला नाही. तसेच नांदेड शहर परिसराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील कायमस्वरूपी मिटला. अशा प्रकारे विष्णुपुरी प्रकल्पात असताना देखील त्यांच्या हातून एक प्रकारचे ऐतिहासिक कार्य झाले आहे.

त्यानंतर इंजीनियर विश्वनाथ नाथ यांची बदली मंत्रालयात अवर सचिव म्हणून झाली. सन २०१२ ते १५ या कालखंडात त्यांनी जलसंधारण खात्यात मंत्रालयात अवर सचिव म्हणून काम केले आहे. या ठिकाणी त्यांनी देखील सुधारित प्रस्तावाना मान्यता देणे महत्त्वाच्या जीआरचे ड्राफ्टिंग करणे अशी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. सन २०१५ ते २०१८ या काळात त्यांची पदोन्नतीवर बदली झाली. आताच्या छत्रपती संभाजीनगर आणि तेव्हाच्या औरंगाबाद येथे जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता म्हणून सेवा सुरू केली. त्यावेळी आठ जिल्हे त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत होते. त्या माध्यमातून जलयुक्त शिवाराची कामे मोठ्या प्रमाणावर राबवली गेली होती. त्यानंतर वाल्मी औरंगाबाद येथे सहसंचालक त्यानंतर पुढे एक वर्षभर नागपूर येथे अप्पर आयुक्त तर त्यानंतर आणखी पुन्हा औरंगाबाद येथे अपर आयुक्त म्हणून कार्य केले आहे. पुढे २०२० -२१ मध्ये अपर आयुक्त म्हणून वाल्मी मध्ये काम सुरू केले आणि त्याच ठिकाणी शेवटची दीड वर्षे त्यांनी वाल्मीचे महासंचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली.

अशाप्रकारे सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून शासकीय सेवेत सुरू झालेला त्यांचा प्रवास वाल्मि या शासनाच्या स्वायत्त

संस्थेचे महासंचालक पदापर्यंत त्यांची झेप पोहोचली. पण हा त्यांचा प्रवास सहजासहजी किंवा सुखाचा झाला नाही. प्रत्येक वेळी त्यांना आपल्या अधिकारासाठी आणि हक्कासाठी झगडावे लागले. कधी कधी तर न्यायालयाचे दरवाजे देखील खटखटावे लागले. अनेकदा मानसिक त्रास सहन करावा लागला. परंतु त्यांनी हार मानली नाही. कारण ध्येयाने झपाटलेली माणसं कोणत्याही अडथळ्याने विचलित होत नसतात. सागराच्या तीरावरील खडक जसा असंख्य लाटांचे तडाके सोसूनही कायम ठाम राहतो तसे विश्वनाथ नाथ यांनी अनेक त्रास, अपमान सहन केले. अन्याय पचवला परंतु आपल्या ध्येयापासून ते हटले नाहीत. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना त्रास झाला परंतु ते आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. शोषित पिढीत समाजात जन्माला येऊन अधिकारी म्हणून काम करणे आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही किती अवघड आहे हे लक्षात येते. परंतु या सर्वांवर मात करून इंजिनीयर विश्वनाथ नाथ यांनी आपली सेवा पूर्ण केली. एखादा माणूस आयुष्यात यशस्वी झाला की नाही हे त्याच्या पुढील पिढीवर अवलंबून असते. त्यांची पुढची पिढी काय करते म्हणजे मुले काय करतात यावरून त्यांचे यश पियुष मोजले जाते. त्यानुसार विश्वनाथ यांना तीन मुली आहेत. मोठी मुलगी नेहा ही बँक ऑफ अमेरिका या बँकेच्या आयर्लंड येथील शाखेमध्ये मॅनेजर म्हणून काम करत आहे तर दुसरी मुलगी निकिता ही आ. पी. जिंदाल संस्थेत लॉ करीत आहे. तिसरी मुलगी मॅट्रिकच्या वर्गात शिकत आहे. त्यांच्या भावाची मुले देखील त्यांच्या सोबतच राहत असतात आणि ते भावाच्या मुलांना आपल्या मुलाप्रमाणेच वागवतात आणि त्यांच्या भविष्याचाही विचार करतात. भावाचा मोठा मुलगा मंगेश यांने पायलटचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे तर दुसरा मुलगा बारावीच्या वर्गात शिकत आहे. आपल्या पुढच्या पिढीला देखील योग्य मार्गदर्शन करून त्यांचा जीवन मार्ग सुखकर केला आहे.

समाजातील गोरगरीब अनाथ बालकांनाही त्यांनी अनेकदा आर्थिक मदत केली आहे. पाठ्यपुस्तकांची मदत केली आहे. असा हा जगाची काळजी घेणारा माणूस किती मोठा अधिकारी झाला तरी त्याचे पाय जमिनीवरच आहेत अशी माणसं नव्या पिढीला प्रेरणादायी ठरतात.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

मराठवाड्याचे हित जपणारा अभियंता

इंजि. व्ही.व्ही.गायकवाड
से.नि.सचिव
जलसंपदा विभाग,महाराष्ट्र

मराठवाड्यासाठी वरदान ठरलेल्या गोदावरी नदीवर जी बॅरेजेसची शृंखला बांधण्यात आलेली आहे त्यापैकी सर्वात महत्वाचा, राज्याच्या टोकाला असलेला आणि अत्यंत बांधकामासाठी खडतर आणि न्यायालयीन संघष करुन पुर्ण केलेला बॅरेज म्हणजेच बाभळी बॅरेज होय! हा बाभळी बॅरेज महाराष्ट्र आणि तात्कालीन आंध्र प्रदेशच्या सीमेवर बाभळी या गावाजवळ आहे. म्हणून या बंधाऱ्याचे नाव बाभळी बंधारा असे आहे. हा बंधारा महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत आहे. या बंधाऱ्याचे वैशिष्ट्य असे की आंध्र प्रदेशच्या पोचमपाड या गोदावरी नदीवरील धरणाच्या जलाशयाचे पाणी महाराष्ट्राच्या हद्दीत येते. या जलाशयाखाली महाराष्ट्रातील जमीन, रस्ते, अनेक पूल बाधित झालेले आहेत. या जलाशया खालील जमिनीचा कोणताही मावेजा महाराष्ट्र शासनाने घेतलेला नाही. बाभळी या ठिकाणी अनेक वर्षापासून बंधाऱ्याचा प्रस्ताव होता. परंतु पोचमपाड धरणामुळे या साईटवर अंदाजे पाच फुट पाणी साठते. या भागात पाण्याचे अतिशय दुर्भिक्ष्य होते. अनेक ठिकाणी पिण्यासाठीसुध्दा पाणी नसते.त्यामुळे शासनाने हा बंधारा बांधण्याचा निर्णय घेतला.

तात्कालीन आंध्र प्रदेशच्या सरकारने आमच्या हक्काच्या पाण्यावर गदा येणार आहे म्हणून बाभळी बंधाऱ्याला हरकत घेतली. बंधाऱ्याच्या पाठीमागे पाच फुट उंचीचा जलाशय दोन्ही प्रकल्पात असल्यामुळे महाराष्ट्र आंध्र प्रदेशाच्या प्रकल्पाचे पाणी उपसा करुन वापरेल अशी भीती आंध्र प्रदेश सरकारने व्यक्त केली. त्यामुळे या बंधाऱ्याच्या निर्मितीला प्रचंड विरोध झाला. आंध्राचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी हा वाद केंद्रीय जल आयोगाकडे नेला. केंद्रीय जलसंपदा मंत्रालयाने देखील या बंधाऱ्याच्या कामास तात्पुरती स्थगिती दिली. पुढे मग हा वाद सर्वोच्च न्यायालयात गेला.

या वळी महाराष्ट्र शासन, आंध्र प्रदेश शासन व केंद्रिय जलआयोग यांच्या एका समितीने पोचंपाड बाभळी बंधाऱ्यामागे साठणारे पाणी सोडण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने मान्य केला. तरीसुध्दा आंध्राने हा वाद सर्वोच्च न्यायालयात नेला. न्यायालयाने महाराष्ट्राची बाजू मान्य करुन बांधकामास परवानगी दिली. संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्राची बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडली ती इंजि. विश्वनाथ नाथ यांनी!

त्यावेळी इंजि. नाथ हे कार्यकारी अभियंता म्हणून जलसंपदा विभागामध्ये नांदेड येथे कार्यरत होते. या बाभळी बंधाऱ्याची सुरुवातीपासूनची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. त्यामुळे तांत्रिक, कायदेशीर आणि प्रत्यक्ष काम याची उत्कृष्टपणे सर्व जबाबदारी त्यांनीच पार पाडलेली आहे. त्यामुळे त्यांचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. इंजि.नाथ यांनी बाभळी बंधाऱ्याची कायदेशीर लढाई लढत असताना स्थानिक लोकांनाही विश्वासात घेऊन एकत्र केले आणि त्यांची एक संघटना तयार करून त्यांची मदत घेतली. त्या संघटनेस पुढे सर्वोच्च न्यायालयात पार्टी करण्यात आले.

एकदा तर काय झाले की या संघर्षात आंध्र प्रदेशचे चंद्राबाबू नायडू चाळीस आमदारांना घेऊन प्रत्यक्ष साइटवर आले आणि आंदोलन सुरू केले. प्रचंड मोठ्या प्रमाणावर पोलीस फौज फाटा लागला होता. दोन्ही राज्यातील जिल्हाधिकारी अत्यंत तणावाखाली होते. त्या परिसरातील गावकरीसुध्दा प्रकल्प स्थळी उपस्थित होते. त्यावेळी इंजि. नाथ यांनी अतिशय संयमाने राहून परिस्थिती हाताळली. ते अगदी वाखाणण्यासारखे आहे. चंद्राबाबू नायडू आणि चाळीस आमदारांना महाराष्ट्र पोलिसांकडून औरंगाबादला आणण्यात आले. नंतर न्यायालयाच्या आदेशानंतर सोडून देण्यात आले. त्यांना हैदराबादला सन्मानपूर्वक रवाना करण्यात आले. त्यावेळी देशपातळीवर आणि आंध्र प्रदेशात जोरदार

प्रकरणाची चर्चा झाली होती. याप्रकरणी इंजि. नाथ यांनी महाराष्ट्र शासनाची बाजू सर्वोच्च न्यायालयात मोठ्या हिरिरीने मांडली होती. त्यावेळी मुख्यमंत्री मा.स्व. विलासरावजी देशमुख व सर्वपक्षीय शिष्टमंडळाने पंतप्रधान मनमोहनसिंग यांची भेट घेतली. इंजि. नाथ यांनी थेट पंतप्रधानाच्या समोर तांत्रिक सादरीकरण करून आपली बाजू भक्कमपणे मांडली होती. त्यामुळे गोदावरी नदीवरील सर्वात मोठा असणारा बाभळी बंधारा पूर्णत्वास गेला आणि त्याचे श्रेय श्री नाथ यांना जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार जी पाण्याची तूट होणार होती ती तूट भरून काढण्यासाठी बाभळी धरणाच्या वरच्या बाजूस पेनूर येथे एक वाढीव बंधारा बांधण्यासाठी शासनाने मंजुरी दिली ती घेण्याचे आणि त्याचे काम सुरू करणे आणि पुर्ण करणे हे देखील श्री नाथ यांच्या मेहनतीचे फळ आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही.

गोदावरी नदीवरील शृंखलेमध्ये विष्णूपुरी प्रकल्पाच्या वर तेवढाच आणखी एक मोठा बंधारा डिग्रस येथे त्यांच्याच कार्यकाळात पूर्ण झाला. त्यांच्या कार्यकारी अभियंता कार्यकाळात बाभळी आणि इतर दोन बंधाऱ्यांचे उल्लेखनीय कार्य त्यांच्या हातून घडले आहे. एक अभियंता म्हणून तांत्रिक ज्ञान, मेहनत घेण्याची तयारी, जिद्द आणि संयम या गुणांमुळे ते यशस्वी ठरले. या गुणांमुळेच त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वाल्मीसारख्या संस्थेचे महासंचालक म्हणून काम केले आहे.

याचबरोबर त्यांच्याकडे विष्णुपुरी प्रकल्पाची जबाबदारीही होती. ती त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. त्यामुळे नांदेड शहराचे पूर नियंत्रण उत्तम केले. विष्णुपुरी प्रकल्पाचे काम योग्य प्रकारे केल्यामुळे पाणी कमी पडू दिलें नाही. विष्णुपूरीची उर्वरित कामे पूर्ण करण्याचा

प्रयत्न केला.

ज्याप्रमाणे त्यांनी शासकीय सेवेत असताना अतिशय जबाबदारीने आणि स्वतःला झोकून देऊन काम केले. त्याचप्रमाणे त्यांनी सामाजिक कार्यात देखील तितक्याच तन्मयतेने सहभाग नोंदवला आहे. आपल्या समाजातील तरुणांना आणि विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणे, त्यांना आर्थिक मदतीचा हात देणे. नोकरीसाठी प्रयत्न करणारांना सहकार्य करणे अशा कामात त्यांना स्वारस्य आहे. त्यामुळे ते नाथपंथीय समाजामध्ये देखील त्यांचे नाव आदराने घेतले जाते. शांत स्वभाव, संयम आणि मितभाषी स्वभाव असलेला अभियंता आयुष्यभर संघर्ष करीत राहिला, लढत राहिला आणि जीवनात देखील यशस्वी झाला. त्यांची पुढची पिढी देखील योग्य मार्गावर आहे. त्यांची एक मुलगी विदेशात नोकरी करते तर एकत्रित कुटुंब असल्याने पुतण्यादेखील पायलट आहे. त्यामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील त्यांनी तितक्यात जबाबदारीने पार पाडल्या आहेत. त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे, आनंदाचे आणि आरोग्यदायी जावो या शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

कर्तव्यदक्ष अभियंता

इंजि. पी.सी.झपके
से.नि.कार्यकारी संचालक
जलसंपदा विभाग,महाराष्ट्र

सन १९७२ च्या दुष्काळानंतर मराठवाड्यातील शेतकऱ्यांची मुले मोठ्या प्रमाणावर इंजिनियरींगकडे वळली. त्यातील आख्खी फळीच त्यावेळी तात्कालिन पाटबंधारे खात्यात सेवेत दाखल झाली. कारण शेतीच्या दृष्टीने पाणी हा अतिशय महत्वाचा विषय असल्याने या मराठवाड्याच्या भूमिपुत्रांनी अतिशय पोटतिडकीने कामे केली. त्यात अगदी ज्युनियर इंजिनियरपासून ते सचिवापर्यंतच्या पदावर मराठवाड्याच्या भूमिपुत्रांना काम करण्याची संधी मिळाली. त्यामध्ये इंजि. व्ही.बी. अर्थात विश्वनाथ बाबूनाथ नाथ हे एक होत. त्यांच्या नावातील वेगळेपणामुळे ते फार लवकर लक्षात राहिले. मी औरंगाबादला म्हणजे आताच्या छत्रपती संभाजीनगरमध्ये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामध्ये कार्यकारी संचालक म्हणून रुजू झाल्यानंतर श्री व्ही.बी. नाथ यांचा कामाच्या निमित्ताने परिचय झाला. त्यावेळी ते नांदेड येथे विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२ येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. त्याचवेळी तात्कालिन आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर बांधण्यात येत असलेल्या बांभळी बंधाऱ्याचे काम सुरु झाले होते आणि त्या बंधाऱ्यास आंध्र प्रदेशातील राजकीय नेत्यांनी प्रचंड विरोध केला होता. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. त्या कामाच्या निमित्ताने वारंवार आमच्या बैठकीच्या वेळी चर्चा होत होत्या. त्यादरम्यानच हे व्यक्तिमत्व कळत गेले.

इंजि. नाथ हे अत्यंत सरळ साधे व्यक्तिमत्व आहे. रहाणीमानही साधे पण कामाच्या बाबतीत मात्र वाघ माणूस आहे. कोणतीही जबाबदारी त्यांच्यावर सोपविली की ते कारणे न सांगता आपले काम यशस्वीपणे पार पाडणार असा विश्वास वरिष्ठांना वाटावा असे काम ते करीत असतात. आंध्र प्रदेश महाराष्ट्र सीमेवरील बाभळी बंधाऱ्याच्या बांधकामाच्या वेळी तर वारंवार भेटीगाठी, चर्चा घडत असत. हा बाभळी बंधाऱ्याचा वाद अगदी सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्यावेळी कार्यकारी अभियंता म्हणून त्यांना वारंवार नांदेड ते औरंगाबाद, हैदराबाद, पुणे, मुंबईत मंत्रालय ते दिल्ली अशा वारंवार फेऱ्या माराव्या

लागल्या. आपल्या महाराष्ट्र सरकारची बाजू सर्वोच्च न्यायालयात मांडण्यासाठी वकीलांना माहिति पुरवावी लागायची. ती माहिति अभ्यास करुन तयार करावी लागायची. ती माहिति न थकता पुरविण्याची जबाबदारी श्री नाथ यांनी चोखपणे पार पाडली. वेळ, काळ, दिवस रात्र न बघता त्यांनी जी मेहनत घेतली त्यामुळेच बाभळी बंधाऱ्याची केस आपण जिंकलो असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एक दोन वेळेस आम्ही वरिष्ठ अधिकारीसुध्दा सर्वोच्च न्यायालयात गेलो होतो. विशेष म्हणजे ज्या दिवशी बाभळी केसचा निकाल लागायचा त्यादिवशी मी स्वत:,सल्लागार श्री हुद्दार साहेब हजर होतो. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्राच्या बाजूने निकाल दिल्यानंतर सर्वांनी एकमेकाना मिठ्ठ्या मारुन तो आनंद व्यक्त केला. या बाभळी बंधाऱ्याच्या निमित्ताने आमची ओळख आणखी वाढत गेली. पुढे कामांच्या तपासणीच्या निमित्ताने वारंवार भेटी घडत राहिल्या आणि व्ही.बी. नाथ यांचे व्यक्तिमत्व उलगडत गेले.

एकंदरीत प्रामाणिकपणे काम करणारा एक हुशार अभियंता व अधिकारी असल्याचे माझ्या लक्षात आले होते. कामातील गुणवत्ता तसीच दर्जेदार होती. ते क्षेत्रिय पहाणीच्यावेळी निदर्शनास यायचे. कामाची गुणवता चोख तर असायचीच परंतु वेळेच्या आधी कामे पुर्ण करण्याची त्यांची हातोटी होती. डेरला, किवळा आणि शिराढोण या उपसा सिंचन योजनांची कामे त्यांच्याकडे होती. अगदी सर्व्हेक्षण, डिझाइन, टेंडरपासून ते कामाची सुरुवात करेपर्यंत संपुर्ण जबाबदारी त्यांच्याकडेच होती. त्यांनी ती अतिशय कमी कालावधीत पार पाडली अगदी उत्तम गुणवतेने! कोलंबी गावाला उंचीवर असल्यामुळे विष्णुपुरी प्रकल्पाच्या पाण्याचा उपयोग होत नव्हता. त्यामुळे कोलंबी उपसा सिंचन योजना विष्णुपुरी प्रकल्प कालवा किमी ४९ मधून प्रस्तावित करुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न श्री नाथ यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मार्गी लागला हे कोणीही नाकारणार नाही. इसापूर धरणाच्या कालव्याच्या दुरुस्तीचे काम रखडले होते. त्यावेळी ते

मार्गदर्शनासाठी आले होते. त्यांची कामाप्रति असलेली तळमळ बघून त्यांना योग्य काळजी घेऊन काम जास्तीत जास्त चांगले कसे होईल याविषयी सुचना दिल्या आणि त्यांचे तंतोतंत पालन करुन त्यांनी ते काम पुर्ण केले.

महाराष्ट्र – आंध्र सीमेवर असलेल्या तात्कालिन आंध्र प्रदेशच्या पोचमपाड धरणाचे पाणी महाराष्ट्राच्या हद्दीत रहात असल्याने महाराष्ट्राचे नुकसान होत होते. ते भरुन काढण्यासाठी बळेगाव उच्च पातळी बंधारा प्रस्तावित करण्यामध्येही श्री नाथ यांची मोठा वाटा आहे. अतिशय कमी वेळात कामास परवानगी मिळवून धडाडीने काम सुरु करुन ते कमी वेळेत पुर्णदेखील केले. याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले होते. श्री नाथ यांचे तांत्रिक ज्ञान आणि कामाप्रति असलेली निष्ठा प्रकर्षाने दिसून येत असे. गोदावरी नदीवर असलेल्या उच्च पातळी बंधाऱ्याच्या शृंखलेतील दिग्रस बंधाऱ्यावरील मेकॅनिकल गेटचे काम सुरु असताना त्यांनी आपले कौशल्य पणाला लावून गेटचे काम अतिशय नियोजनबध्द रितीने वेळेत पुर्ण केले तेही अतिशय गुणवतापुर्ण रितीने! अशा कामांमुळे ते अनेकदा अभिनंदनास पात्र ठरले आहेत. दुसरे आणखी एक काम म्हणजे विष्णुपुरी धरणाचे दरवाजे पावसाळ्यात उघडण्यासाठी कर्मचाऱ्यांना अरुंद लोखंडी शिडीचा वापर करुन हॉइस्ट ब्रीजवर जावे लागत असे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या जिविताला धोका संभवत असे. याचा माणुसकीच्या जाणिवेतून त्यांनी विचार करुन अरुंद लोखंडी शिड्याऐवजी रुंद व मोठया मजबूत कायमस्वरुपी शिड्या तयार करुन हॉइस्ट ब्रीजवर ये जा करण्याची सोय करुन त्यांनी कर्मचाऱ्यांच्या जिविताचा धोका कायमचा कमी केला.

बाभळी बंधाऱ्यातील त्यांच्या कामाचा आवाका आणि कामाप्रति असलेली निष्ठा यामुळे श्री नाथ यांच्याबद्दलची आपुलकी वाढत गेली. अगदी घरगुती संबंध निर्माण झाले होते. त्यांच्या बोलण्यातून सतत जाणवायचे की ते खूप धार्मिक आहेत. त्यामुळे ते एकदा आमच्या घरी आले असता माझ्याकडील **भारतातील देवस्थाने**

हे पुस्तक त्यांना दिले. ते त्यांना खूपच आवडले. त्यांनीदेखील आपल्या आयुष्यात अनेक धार्मिक यात्रा केल्या आहेत. त्यांच्या बाबतीत मला समजलेली माहिती अशी की ते अतिशय मातृभक्त आहेत. ते जेथे जातील तेथे आई त्यांच्यासोबतच रहायची. एवढेच नव्हे तर त्यांचा एक कानाने अपंग असलेला भाऊ आणि त्यांचे कुटुंबही त्यांच्या सोबतच रहातात. आजच्या जमान्यात एकत्रित कुटुंब पध्दती लोप पावत चाललेली असताना श्री नाथ यांचे कुटुंब एक आदर्श उदाहरण म्हणून पाहता येईल. कौटुंबिक जिव्हाळा जपणारा एक संवेदनशिल माणूस म्हणूनही ते ओळखले जातात. त्यामुळे अनेकदा त्यांना सेवेत असतानाही संघर्ष करावा लागला. परंतु त्यांनी कधीही हार मानली नाही. जोपर्यंत एकादी गोष्ट साध्य होत नाही तोपर्यंत प्रयत्न करीत रहाणे हे त्यांच्या कार्य पध्दतीचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते. बाभळी प्रकरणाच्या वेळी अनेकदा नांदेड ते औरंगाबाद आणि औरंगाबाद ते दिल्ली, तेथून मुंबई आणि मुंबईतून पुन्हा औरंगाबाद अशी कामे आटोपून आठ दिवसानंतर घरी परतावे लागायचे. परंतु याबाबत त्यांनी कधी संताप व्यक्त केला नाही किंवा कुठल्याही प्रकारची कूरकूर न करता ते प्रकरण धसास लावले. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने उत्कृष्ट अभियंता ठरतात.

पुढे श्री नाथ जलसंपदा खात्यातून जलसंधारण खात्यात गेले. त्या ठिकाणी देखील त्यांनी विविध पदावर काम केले. शेवटी जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेचे सचिव समकक्ष महासंचालक या पदावरुन सेवानिवृत होत आहेत. त्यांना पुढील आयुष्यात चांगले आयुष्य जगण्यासाठी उत्तम आरोग्य लाभो आणि दीर्घायु लाभो ही सदिच्छा व्यक्त करुन थांबतो!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

सामाजिक बांधिलकीचे भान

न्यायमुर्ती माधव जाधव
सेवानिवृत्त न्यायाधिश
छत्रपती संभाजीनगर

मी औरंगाबाद येथील कौटुंबिक न्यायालयात असताना आमचे एक सीनियर न्यायाधीश शुद्धोधन मोरे साहेब औरंगाबाद न्यायालयामध्ये बदली होऊन आले होते. त्यावेळी त्यांना शासकीय कॉर्टरची गरज होती. त्यासाठी मी त्यांच्या कॉर्टरच्या शोधात होतो. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क करणे गरजेचे होते. परंतु माझा या बांधकाम खात्यातील अधिकाऱ्यांशी फारसा परिचय नव्हता. मग मी ओळखीचे कोणी अधिकारी आहेत का असा शोध घेत होतो. त्यावेळी मला माझे एक जुने स्नेही आणि नवी मुंबई येथील एक डॉक्टर जयाजी नाथ यांनी एक संपर्कासाठी नंबर दिला. तो नंबर होता इंजि. विश्वनाथ नाथ यांचा! परंतु ते महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामध्ये कार्यरत होते आणि माझे काम सार्वजनिक बांधकाम खात्यातल्या अधिकाऱ्यासोबत होते. परंतु नवी मुंबईचे डॉक्टर जयाजी नाथ यांनी मला सांगितले होते की तुम्ही विश्वनाथ नाथ यांच्याशी संपर्क करा ते तुम्हाला योग्य ते मार्गदर्शन करतील आणि तुमचे काम मार्गी लागेल. त्याप्रमाणे मी श्री नाथ यांना संपर्क केला आणि त्यांना सांगितले की बेलापूरचे डॉक्टर जयाजी नाथ यांनी मला तुमचा मोबाईल नंबर दिला आहे आणि आपल्याशी संपर्क करायला सांगितला आहे. आमचे ज्येष्ठ न्यायाधीश श्री शुद्धोधन मोरे हे औरंगाबादच्या कुटुंब न्यायालयामध्ये हजर झाले आहेत आणि त्यांना गव्हर्नमेंट कॉर्टरची गरज आहे. वास्तविक पाहता ते जलसंपदा खात्यातील अभियंता होते. परंतु त्यांचा संपर्क शासनाच्या सर्वच अधिकाऱ्यांशी चांगल्या पद्धतीने असल्यामुळे त्यांनी लगेच औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आमच्या न्यायाधीशांच्या क्वार्टरचे काम करून दिले. त्या थोड्याशा कालावधीत झालेला आमचा परिचय पुढे कायम स्वरूपी घट्ट झाला. याचे कारण असे की श्री नाथ साहेब यांची बोलण्याची पद्धत, शांत

मनमिळावू स्वभाव आणि नम्रता. त्याचप्रमाणे एखाद्याने आपल्यावर एखादी जबाबदारी सोपवली तर ती पूर्ण पार पाडण्याची जबाबदारी. यामुळे ते कायमचे लक्षात राहिले. वास्तविक पाहता कौटुंबिक न्यायालय आणि अभियंता यांचा तसा फारसा संबंध येत नाही. परंतु विशिष्ट कामाच्या पद्धतीमुळे आमचे संबंध कायम राहिले. श्री नाथ व आमची वारंवार भेट होत नसली तरी फोनवरून बोलणे घडत असे. परंतु नाथ या व्यक्तिमत्त्वाबद्दल फार उत्सुकता निर्माण झाली आणि त्यातून मिळालेली माहिती अशी की इंजि. नाथ हे केवळ अभियंता नसून ते एक अतिशय चांगला माणूस देखील आहेत. आपण ज्या समाजातून जन्माला आलो, वाढलो, त्याचे संस्कार घेतले त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून ते कार्यरत आहेत. समाजातल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांनी त्यांच्याबद्दल बोलताना अतिशय कृतज्ञतापूर्वक सांगितले की इंजिनीयर नाथ हे आमच्या समाजाचा चेहरा आहेत. समाजातील तरुण मुलांना अतिशय चांगल्या पद्धतीचे आणि पोटतिडकेने मार्गदर्शन करून शासकीय सेवेमध्ये कसे सामील व्हावे किंवा एखादा उद्योग व्यवसाय कसा करावा याचे अतिशय तळमळीने मार्गदर्शन करतात. त्यामुळे समाजामध्ये एक त्यांचे वेगळे स्थान आहे. केवळ समाजातच नव्हे तर त्यांच्याकडे जो जो व्यक्ती मार्गदर्शन घेण्यासाठी अथवा मदतीसाठी गेला त्याला त्यांनी अगदी मनापासून मदत केली आणि मार्गदर्शन केले. अतिशय हुशार आणि संयमी व्यक्तिमत्व आहे. समाजामध्ये त्यांची एक वेगळी प्रतिष्ठा आहे. त्यामुळे या व्यक्तिमत्त्वाशी असलेले संबंध वृद्धिंगत होत गेले. नाथ साहेब देखील आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आपल्या खात्यामध्ये वरच्या पदांवर पदोन्नत होत गेले आणि आपल्या कामाचा ठसा उमटवत गेले. मध्यंतरीच्या काळात २०२० मध्ये कोरोनाची साथ आली. त्याच दरम्यान मी न्यायव्यवस्थेतून सेवानिवृत्त झालो आणि माझ्या मूळ

गावी उदगीरला राहायला गेलो. त्या दरम्यान काहीसा संपर्क कमी झाला होता. परंतु पुन्हा फोनच्या माध्यमातून बोलणे होत राहिले आणि संबंध कायम झाले. सध्या ते वाल्मीचे महासंचालक असल्याचे कळाले त्यामुळे त्यासंबंधी एक आठवण सांगावीशी वाटते. आमच्या न्यायालयातर्फे एक ट्रेनिंग कॅम्प घेण्याचे योजले होते. त्यावेळी जागा निवडीसाठी आम्ही शोधात होतो. त्यावेळी देखील त्यांची मदत झाली. त्यांनी आम्हाला वाल्मीतील शांत निसर्गरम्य परिसरातील जागेची माहिती दिली. एवढेच नाही तर ती जागा उपलब्ध करून देण्यासाठी मदतही केली. वाल्मिची जागा खूपच आम्हाला आवडल्याने त्यानंतर जे काही कार्यक्रम झाले ते आम्ही वाल्मीच्या निसर्गरम्य परिसरातच घेतले. त्यामुळे देखील इंजि. नाथ हे चांगले लक्षात राहिले. लोकांना मदत करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. ते कमी बोलतात, कामापुरते बोलतात पण त्यात स्पष्ट पणा आणि आत्मीयता असते. त्यामुळे ते अधिक आपले वाटतात. त्यांचे सुरुवातीचे मार्गदर्शक आणि गुरु म्हणजे नवी मुंबईतील डॉक्टर जयाजी नाथ हे होत. मी देखील डॉक्टर जयाजी नाथ यांना गुरुस्थानी मानतो. त्यामुळे अर्थातच आम्ही दोघे गुरुबंधू आहोत याचा मला अधिक आनंद वाटतो. इंजि. नाथ यांनी आपल्या कर्तृत्वाने एका छोट्याशा लहान गावातून सुरुवात करून मुंबईतील मंत्रालयापर्यंत धडक मारली. त्यानंतर आपल्या खात्यातील सर्वोच्च पदापर्यंत ते पोहोचले आणि आपल्या कार्याचा ठसा उमटविला. ही गोष्ट सोपी नाही. लहानपणापासूनच संघर्षातून वाट काढण्याची कला त्यांनी आत्मसात केली होती. त्यामुळे त्यांना इथपर्यंत पोहोचणे फार अवघड गेले नाही. परंतु संघर्ष कोणाला चुकला नाही. अशा या संघर्षमयी जीवनातून यशाच्या शिखरावर पोचलेल्या व्यक्तिमत्त्वाला कोण विसरेल! लवकरच ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत परंतु मला माहित आहे की जरी ते सेवानिवृत्त झाले तरी आपल्या

अंगात संचारलेला सामाजिक जाणिवेचा अंगार ते कधीही शांत होऊ देणार नाहीत. ते सतत कार्यरत राहातील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. या कामासाठी त्यांना प्रचंड ऊर्जा मिळत राहो, शक्ती मिळत राहो आणि उदंड आयुष्य लाभो अशी मी सदिच्छा व्यक्त करून येथेच थांबतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

कर्तव्यदक्ष भूमिपूत्र

मा.आ.सुरेश देशमुख
माजी आमदार
परभणी

इंजिनियर विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे शासनाच्या जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेचे महासंचालक आहेत. ते आमच्या परभणी जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. अत्यंत गरिबीतून शिक्षण घेऊन डोळ्यासमोर उच्च ध्येय ठेवून त्यांनी ते ध्येय साध्य केले आहे. यासाठी त्यांच्या अंगभूत गुणांची साथ त्यांना लाभली आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हा त्यांच्या विचारांचा पाया आहे. सरळ साधा स्वभाव, करुणाशीलता, अत्यंत चांगला मातृभक्त आणि कायम सामाजिक बांधिलकीचे भान असणारा आमचा हा कर्तव्यदक्ष अधिकारी केवळ शासकीय सेवेमध्येच नाही तर सामाजिक जीवनातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून गेला आहे.

शासकीय सेवेत काम करीत असताना आपले केवळ कर्तव्य बजावायचे म्हणून नाही तर शासनाचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. त्याचबरोबर गोरगरिबांचे हितही साधले गेले पाहिजे याविषयी सतत जागरूक राहून काम करण्याची त्यांची कार्यपद्धती आहे. एकदा का त्यांनी एखादे काम हाती घेतले तर ते पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. ते स्वस्थ बसत नाहीत. अत्यंत कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे. शासनाच्या जलसंपदा विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशच्या सीमेवर गोदावरी नदीवर बॅरेज बांधत असताना आंध्र प्रदेशने त्या बंधाऱ्याला आक्षेप घेतला होता. आंध्र प्रदेशचे तात्कालीन माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी दिल्लीपर्यंत जाऊन या बाभळी बंधाऱ्याला विरोध केला होता. प्रकरण अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले होते. त्यावेळी विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. या सर्वांशी समन्वय साधून श्री नाथ यांनी महाराष्ट्र शासनाची बाजू सर्वोच्च न्यायालयासमोर समर्थपणे मांडून रात्रीचा दिवस करून आणि प्रचंड

कष्ट करून त्या बाभळी बंधाऱ्याला परवानगी मिळवली. याचे आम्ही साक्षीदार आहोत. अतिशय पोटतिडकेने आपल्या मातृभूमीसाठी जगणारा अधिकारी हा आमच्या जिल्ह्याचा सुपुत्र आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. इंजिनिअर विश्वनाथ नाथ यांचे आमच्या कुटुंबाशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. आम्ही त्यांना आमच्या कुटुंबाचा घटकच मानतो.

श्री नाथ यांचे आचार, विचार आणि संस्कार उच्च कोटीचे आहेत. ते चांगले मातृभक्त आहेत. वडिलांच्या निधनानंतर आईने काबाडकष्ट केले आणि त्यांना शिक्षण दिले. त्यामुळे ते आईला थोडा काळ देखील विसरत नाहीत. शेवटच्या क्षणापर्यंत आई त्यांच्यासोबतच होती. अगदी श्रावण बाळासारखी त्यांनी आईची सेवा केली. हल्लीच्या काळात असा सुपुत्र विरळच! इंजि. नाथ यांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतेही काम करताना सामाजिक जाणिवेचे भान ते कायम ठेवत असतात. त्यामुळे लोकांचा त्यांच्या कामावर आणि त्यांच्यावर प्रचंड विश्वास आणि प्रेम आहे. जिथे जिथे त्यांनी सेवा बजावली त्या त्या ठिकाणी आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्यांनी उमटवलेला आहे. मातृभूमीची अशा प्रकारे सेवा करून तिच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. एक चांगला अधिकारी, एक चांगला पुत्र, एक चांगला मित्र, एक चांगला मार्गदर्शक आणि एक चांगला सामाजिक भान असलेला समाजसेवक अशा वेगवेगळ्या भूमिका त्यांनी आयुष्यात चांगल्या प्रकारे वठविल्या आहेत आणि प्रत्येकाशी संबंध उत्तम प्रकारे बनवले आहेत. त्यामुळे त्यांचे आयुष्य सफल झाले आहे असे म्हणावेसे वाटते. त्यांना पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य लाभो आणि दीर्घायु लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि थांबतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

समाजभूषण

डॉ.जयाजी नाथ
राष्ट्रीय अध्यक्ष
अ.भा.नाथपंथी समाज महासंघ
नवी मुंबई

आम्ही वैद्यकीय क्षेत्रात काम करीत असलो तरी सामाजिक क्षेत्रात काम करण्याचे बाळकडू लहानपणापासून रक्तात बनलेले आहे. त्यामुळे नवी मुंबइमध्ये जन सेवा करीत असताना राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक थोरा मोठ्या लोकांशी वारंवार संपर्क येत असतो. नवी मुंबईतील आमच्या विभागाच्या एका नगरसेविकेकडे आमचे नेहमी जाणे येणे असायचे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आम्ही जातीने ओळखतो. एके दिवशी त्या नगरसेविकेच्या बंधूंशी बोलत असताना सहज आम्हाला त्यांनी सांगितले की, मी जिथे जॉब करतो त्या ठिकाणी देखील एक नाथ आडनावाचे प्राध्यापक आहेत. ते तुमचे कोणी नातेवाईक आहेत का? त्यावर आम्ही म्हणालो, तसे परिचयाचे तर नाहीत परंतु आडनाव नाथ आहे म्हटल्यावर ओळख निघेलच. एखाद्या सुट्टीच्या दिवशी त्यांना इकडे बोलवा, मग आपण बघूया! एवढे बोलल्यानंतर मीही विसरून गेलो होतो की आपण कुणाला भेटायला बोलावले आहे. परंतु आमच्या त्या नगरसेविकेच्या बंधूने नेमके लक्षात ठेवून श्री नाथ यांना एका रविवारी नवी मुंबईत आमच्या घरी भेटायला बोलावले. प्राथमिक चर्चा झाल्यानंतर काही क्षणातच आमची वैचारिक नाळ जुळली.

अतिशय गरिबीतून शिक्षण घेऊन प्राध्यापक झालेल्या श्री विश्वनाथ नाथ या नाथपंथीय समाजातला मुलगा कुठल्याही प्रकारचा कौटुंबिक आधार नसताना मुंबईत एकटा राहतो याचे आम्हाला खूपच कौतुक वाटले. साहजिकच आपुलकीही निर्माण झाली. त्या आपुलकी पोटी त्यांच्या खाण्यापिण्याच्या आणि राहाण्याच्या सोयीबद्दल आम्ही विचारणा केली असता त्यांनी आपली अडचण सांगितली. त्यानंतर आम्ही त्यांना आमच्याकडे जागा आहे. तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही इथे राहू शकता आणि नोकरी करू

शकता.असे त्यांना आम्ही सांगितले त्या दिवसापासून इंजिनिअर विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे आमच्या कुटुंबाचा हिस्सा बनले. अतिशय शांत स्वभाव मनमिळावू अभ्यासू प्रेमळ आणि असेल त्या परिस्थितीशी समरस होऊन आपले ध्येय गाठण्याचा त्यांचा स्वभाव त्यांना थेट क्लासवन अधिकाऱ्याच्या खुर्चीपर्यंत घेऊन जाण्यास उपयुक्त ठरला आहे. ज्या कुटुंबाचा उदरनिर्वाहच मुळी मोलमजुरी केल्याशिवाय होत नव्हता. घरात अठरा विश्व दारिद्र्य असताना उच्च शिक्षण घेऊन एमपीएससी सारख्या कठीण परीक्षेत उत्तीर्ण होणे केवळ अशक्यप्राय गोष्ट होती. अतिशय खडतर अशा अग्नी दिव्यातून इथपर्यंत पोहोचलेला समाजातील एक तरुण म्हणून साहजिकच त्यांच्याविषयी मनात प्रचंड आदर आणि प्रेमभावना होती.

त्यामुळे आम्ही त्यांना आमच्या जागेमध्ये राहण्याची सोय करून दिली आणि ती त्यांनी मान्य देखील केली. त्यादरम्यान त्यांच्या खडतर परिश्रमाचे आणि अभ्यासू वृत्तीचे, संघर्ष वृत्तीचे दर्शन घडले. मुंबईतील एका नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजचे ते प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. नवी मुंबई ते मुंबईला येऊन जाऊन करीत असत. प्रवासाची दगदग असायची. त्यात नोकरीचा ताण असायचा. त्याच दरम्यान ते एमपीएससी परीक्षेची तयारी देखील करीत होते. दिवसा नोकरी करून रात्री एमपीएससीचा अभ्यास करायचे. त्याचे आम्हाला फारच कौतुक वाटायचे. अधून मधून त्यांच्या आई मुंबईला येऊन भेटून जायच्या. त्यातून कौटुंबिक संबंध वाढत गेले. काही दिवस गेल्यानंतर त्यांच्या आईशी बोलताना त्यांच्या लग्नाचा विषय निघाला. आई म्हणाल्या आता नोकरी लागली आहे तर लगीन पण उरकून टाकावे असे वाटायला लागले आहे. त्यानंतर त्यांच्यासाठी मुलगी शोधण्याची जबाबदारीही त्यांच्या आईने आमच्यावर सोपविली. आम्ही सामाजिक क्षेत्रात काम करीत असल्यामुळे एक सामाजिक जबाबदारी म्हणून अनेक

उपवर मुला मुलींची लग्ने जमवण्याचे काम आम्ही करीत होतो. योगायोगाची गोष्ट अशी की त्याचवेळी आमचे एक सांगली जिल्ह्यातील जत या गावचे एक व्यावसायिक स्नेही यांच्या मुलीसाठी स्थळ बघण्याची जबाबदारी देखील आमच्यावरच होती. अशा रितीने योगायोग जुळून आला. मुलगी लाडात वाढलेली, रूपवान होती तर मुलगा काळा सावळा एका खेड्यातून आलेला होता. त्यामुळे हे लग्न जमते की नाही असा प्रश्न मनात आला होता. परंतु आम्ही मुलीला समजावून सांगितले की मुलगा जरी काळा सावळा असला तरी तो खूप गुणवान आणि उच्च पदाची नोकरी करणार आहे. त्यावर मुलीनेही कुठल्याही प्रकारचे आढेवेढे न घेता होकार दिला आणि लग्न जुळले.

अशाप्रकारे इंजि. विश्वनाथ नाथ साहेबांच्या आयुष्यातील प्रत्येक जडणघडणीत आमचा सहभाग आहे. त्यांचे शिक्षण एमपीएससी परीक्षा, नोकरी, लग्न, त्यांचे सामाजिक कार्य या सर्व बाबतीत आम्ही त्यांच्या सोबत आहोत. इंजिनीयर नाथ साहेब यांचे व्यक्तिमत्व सरळ साधे, संयमी, जिद्दी आणि कष्टाळू आहे. स्वतःच्या प्रगती बरोबरच समाजाची देखील प्रगती झाली पाहिजे. या विचाराचे हे व्यक्तिमत्व आहे. त्यासाठी केवळ भावना व्यक्त करूनच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी दाखवून दिले आहे की ते केवळ एक अभियंता किंवा प्रशासकीय अधिकारी नाहीत तर ते एक आदर्श समाजसेवक देखील आहेत. आयुष्यात चालताना त्यांनी जे खाच खळगे तुडवले होते त्याची शंभर टक्के जाण त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत ठेवली आहे. आपल्या विद्यार्थी दशेत ज्या खस्ता त्यांनी खाल्ल्या होत्या त्या समाजातील इतर मुलांच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी ते राज्यात अनेक भागात फिरून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करत असतात. अनेकांना वह्या पुस्तके गणवेश यासारखी मदत कुठल्याही प्रकारचा गवगवा न करता करत असतात.

अनेकांच्या मुलांच्या लग्नासाठी आणि निवाऱ्यासाठी देखील त्यांनी हातभार लावल्याची अनेक उदाहरणे आम्ही स्वतः डोळ्यांनी पाहिली आहेत.

इंजिनीयर नाथ साहेब यांचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते अतिशय कुटुंब वत्सल आहेत. ज्या आईने त्यांच्या शिक्षणासाठी खस्ता खाल्ल्या त्या आईला ते कधीही विसरले नाहीत. शेवटपर्यंत आई त्यांच्या सोबतच राहिली, एवढेच नव्हे तर त्यांचा लहान भाऊ, लहान भावाचे कुटुंब, बहिणीचे कुटुंब या सर्वांना त्यांनी एका प्रेमळ धाग्याने बांधून ठेवले आहे. त्यांच्या उन्नतीचा मार्ग साहेबांनी स्वतः तयार करून ठेवलेला आहे. त्यामुळे त्यांच्यासारखा सुपुत्र, चांगला भाऊ, चांगला पती, चांगला पिता, चांगला मित्र आणि चांगला समाजसेवक अशा अनेक पातळ्यांवर त्यांनी अतिशय अंत:करणापासून कर्तव्ये पार पाडली आहेत. त्यामुळे जीवनातील महत्त्वाच्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत असेच म्हणावे लागेल. मुंबईतील प्राध्यापकाची नोकरी करीत असताना ते एमपीएससी परीक्षेची देखील तयारी करीत होते. मी हे सांगितलेच आहे. त्यांच्या अभ्यासू वृत्तीने ते एमपीएससी परीक्षा पास होऊन शासनाच्या जलसंपदा अर्थात पाटबंधारे खात्यात क्लास वन अधिकारी म्हणून सेवेत रुजू झाले. जिथे जातील तिथे त्यांनी स्वतःला झोकून देऊन काम करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांनी खात्यात अशक्य वाटणारी अनेक कामे देखील करून दाखविली आणि अनेक पुरस्काराचे मानकरी देखील ठरले आहेत. ध्येयाने प्रेरित होऊन काम करण्याचा त्यांचा मनस्वी स्वभाव आहे एखादे काम हाती घेतले की ते पार पाडल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. त्यामुळेच ते आज सचिव स्तरावरील महासंचालक पदापर्यंत पोहोचले आहेत. त्यांचा आम्हाला खूपच अभिमान वाटतो. त्यांचे हे सामाजिक कार्य त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर

देखील असेच चालू राहील याची आम्हाला अगदी खात्री वाटते.

शेवटी मनुष्य आयुष्यात यशस्वी झाला की नाही हे ठरविण्याचे समाजाचे काही ठोकताळे असतात. त्यानुसार एखाद्या यशस्वी माणसाची पुढची पिढी काय करते त्यानुसार त्याच्या यशस्वी आयुष्याचे मोजमाप केले जाते. तसे पाहिले तर इंजिनीयर विश्वनाथ नाथ साहेबांची एक मुलगी युरोपमध्ये एका आंतरराष्ट्रीय बँकेची मॅनेजर आहे तर एक मुलगी कायद्याचे उच्च शिक्षण घेत आहे तर एक मुलगी मॅट्रीकच्या वर्गात शिकत आहे आणि भावाचा मुलगा पायलट चे प्रशिक्षण घेत आहे. मुलांवर कुठल्याही प्रकारचा दबाव न टाकता त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे करिअर करण्याचे स्वातंत्र्य त्यांना दिले आहे. त्यामुळे ते एक आदर्श पिताही ठरले आहेत. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य सुखाचे, शांतीचे आणि आरोग्यदायी जावो यासाठी आमच्या भरभरून शुभेच्छा !

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

बाभळी बंधाऱ्याचा प्रशासकीय कणा

प्रा.डॉ. बालाजी कोंपलवार
सचिव, सर्वपक्षीय बाभळी
बंधारा कृती समिती
धर्माबाद, जि.नांदेड

मराठवाड्याचे शिल्पकार स्व. शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या भोकर मतदार संघातील धर्माबाद हा भाग होता. त्यामुळे महाराष्ट्र - आंध्र प्रदेश सीमेवर असलेल्या भागातून गोदावरी नदीतून मोठ्या प्रमाणावर पाणी नदीतून वाहून आंध्र प्रदेशात जात होते. या पाण्याचा वापर धर्माबाद, बिलोली, उमरी, नायगार, मुदखेड, परिसरातील शेतकरी व जनतेसाठी करण्याच्या दृष्टिने इडकॉमतर्फे राज्यशासनाने मनूर, भायेगाव, हस्सा, दिग्रस,व बाभळी या ठिकाणी उपसा सिंचन योजना निर्माण करुन ७४०० हेक्टर शेतीला सिंचनाची सोय करुन दिली. १९७० ते १९८० या दहा वर्षात सदर उपसा सिंचन योजनांचा लाभ घेऊन शेतकरी सुखी व संपन्न झाला.

नांदेड येथे विष्णूपुरी प्रकल्पात पाणी अडविल्यामुळे व आंध्रातील पोचमपाड धरणाखालील सिंचनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याने महाराष्ट्राच्या हद्दीतील पाणीसाठा वेगाने कमी होऊ लागला. त्यामुळे या भागातील उपसा सिंचन योजना वेगाने कमी झाल्या. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या भागातील शेतकऱ्यांनी बळेगाव, अमदुरा व बाभळी येथे बंधारा बांधण्याची मागणी केली. स्व. शंकरराव चव्हण यांची धर्माबाद ते पैठण महाराष्ट्र - आंध्रा सीमेपर्यंत नदीतच पाणी साठविण्यासाठी उच्च पातळी बंधारे झाले पाहिजेत अशी भूमिका होती. माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांच्या प्रयत्नातून तात्कालिन मुख्यमंत्री ना. शरदचंद्र पवारसाहेब यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाने ना. रोहिदास पाटील यांच्या कार्यकालात १३ मार्च १९८५ रोजी. ३२ कोटी रुपायाच्या बाभळी बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता दिली. परंतु पुढे लोकप्रतिनिधींची उदासिनता आणि प्रशासनाच्या दिरंगाईमुळे सदर प्रकल्प दहा वर्षे रखडला. पुढे ना. सुशीलकुमार शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात १४ फेब्रुवारी २००३ रोजी बाभळी बंधाऱ्याच्या ९२

कोटीच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली. परंतु निधीची तरतूद न केल्याने पुन्हा प्रकल्पाचे काम रखडले. त्यानंतर बाभळी बंधारा कृति समितीने जनआंदोलन केले. त्यानंतर माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर, भास्करराव खतगावकर,केंद्रिय मंत्री सुर्यकांता पाटील या सर्वांच्या प्रयत्नामुळे प्रकल्प मार्गी लागला आणि दि. १८ ऑगस्ट २००४ रोजी बाभळी येथे या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.

या भूमिपूजनाच्या कार्यक्रमानंतर ३१ ऑगस्ट २००४ रोजी पहिल्यांदाच विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र. २ नांदेड येथे इंजि. विश्वनाथ नाथ हे कार्यकारी अभियंता म्हणून दाखल झाले. विष्णुपुरी प्रकल्प आणि बाभळी बंधारा हे दोन्ही प्रकल्प इंजि. नाथ यांच्या अखत्यारित असल्यामुळे माझा त्यांच्याशी प्रथम त्यावेळी परिचय झाला. इंजि. नाथ यांची ओळख अत्यंत अभ्यासू, मितभाषी व अत्यंत कार्यक्षम अधिकारी म्हणून अशी होती. बाभळी प्रकल्प जलद गतीने सुरु व्हावा यासाठी त्यांनी कार्यालयीन पातळीवर मंत्रालयापर्यंत खेटे घालायला सुरुवात केली. अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे मन वळविण्यासाठी त्यांनी अगदी शर्थीचे प्रयत्न केले. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष काम सुरु करणयाचा आदेश मिळविला. ताबडतोब नियोजन करुन २५ जानेवारी २००५ रोजी बाभळी बंधाऱ्याच्या प्रत्यक्ष बांधकामास प्रारंभ केला. या प्रकरणी इंजि. विश्वनाथ नाथ यांचा सिंहाचा वाटा आहे हे कोणीही नाकारु शकत नाही.

आंध्र प्रदेशातील तेलगू देशमचे नेते चंद्राबाबू नायडू यांनी बाभळी बंधाऱ्याच्या कामास विरोध करायला सुरुवात केली. आंध्र प्रदेश सरकार आणि चंद्राबाबू नायडू यांनी बाभळी बंधाऱ्याच्या बांधकामाच्या विरोधात केंद्रिय जल आयोगाकडे तक्रार दाखल केली. त्याचप्रमाणे तात्कालिन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्याकडे लेखी

तक्रार करुन बाभळीचे काम त्वरीत थांबविण्याची विनंती केली. बाभळी बंधाऱ्यामुळे आंध्र प्रदेशाचे संपुर्ण वाळवंट होईल अशा प्रकारचा कांगावा सुरु केला. अशावेळी श्री नाथ यांनी अत्यंत अभ्यासूपणे आपली राज्याची भूमिका मांडली. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशाच्या दोन्ही राज्यांच्या तांत्रिक अधिकाऱ्यांच्या अनेकदा बैठका झाल्या. केंद्रिय जल आयोगाकडे दोन्ही राज्यांच्या अधिकाऱ्यांनी अनेक बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये महाराष्ट्राच्या जलसंपदा खात्याचे सचिव, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, यांचे सोबत कार्यकारी अभियंता श्री नाथ यांनी खूपच मेहनत घेतली आहे. फाईल तयार केल्या, अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. महत्वाचे दस्ताऐवज जमा केले. त्यामुळे केंद्रिय जल आयोगाकडे महाराष्ट्राची बाजू समर्थपणे मांडता आली. आंध्र प्रदेश सरकारने निर्माण केलेल्या वादास समर्थपणे उत्तरे देता आली. कायदेशीर बाजू अतिशय समर्थपणे मांडली. त्यामुळे केंद्रीय जल आयोगाने महाराष्ट्राने दिलेला पर्याय मान्य केला. आम्ही बाभळी बंधारा कृती समितीचे सदस्य म्हणून या घटनाक्रमाचे साक्षीदार आहोत. परंतु पुढे केंद्रिय जल आयोगाचा तोडगाही अमान्य केला गेला.

आंध्र प्रदेशातील तेलगू देशम पक्षाने बाभळी बंधाऱ्याला राजकीय शस्त्र म्हणून वापरले व सातत्याने विरोधच केला. आंध्र प्रदेशात व दिल्ली येथे धरणे आंदोलन, निदर्शने, उपोषणे, मोर्चे इत्यादी मार्गाने आंदोलने केली. सरकारवर दबाव आणला. या बंधाऱ्यावर प्रत्यक्ष काम करणारे कार्यकारी अभियंता श्री नाथ यांनी आंध्र सरकारचे अधिकारी व महाराष्ट्र सरकारचे अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू प्रभावीपणे मांडली. त्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. नांदेड- औरंगाबाद- दिल्ली - मुंबई अशा अनेक फेऱ्या मारल्या. आपल्या वकीलांना अत्यंत महत्वाचे दस्ताऐवज व माहिती पुरविली.

याचाच परिणाम म्हणून २६ एप्रिल २००७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन बाभळी बंधाऱ्याचे काम पुढे चालू ठेवण्यास परवानगी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने सैरभैर झालेल्या चंद्राबाबू नायडू यांनी महाराष्ट्रात प्रवेश करण्यास बंदी असतानाही कायद्याचा भंग करून १६ जुलै २०१० रोजी बस यात्रा काढली. शेकडो वाहनांसह ४० आमदार व अनेक खासदार, मंत्री आणि शेकडो कार्यकर्त्यांसह प्रसिद्धी माध्यमांच्या ताफ्यासह धर्माबाद येथे महाराष्ट्राच्या हद्दीत प्रवेश केला. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला. महाराष्ट्रातील कार्यकर्ते शेतकरी व आंध्र प्रदेशातील कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. वातावरण पेटले. महाराष्ट्र पोलिसांनी अत्यंत कार्यक्षमपणे चंद्राबाबूंसह सर्व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. स्थानिक न्यायालयात वकील संघाने चंद्राबाबू नायडू यांची बाजू मांडण्यास असमर्थता दर्शवली. त्यामुळे त्यांना बसने औरंगाबाद येथे नेले व जामिनावर सोडण्यात आले. नुकतेच मे २०२४ रोजी सदर प्रकरणी उच्च न्यायालयाने चंद्राबाबू व इतरांना दोषी ठरवले आहे.

सदर अत्यंत संघर्षमय स्थितीत जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. कार्यकारी अभियंता श्री नाथ व सहाय्यक अभियंता विजय कुरुंदकर यांनी याप्रकरणी कठोर परिश्रम घेतले आहेत. तेलगू देशम पक्षाने बाभळी बंधारा उद्ध्वस्त करण्याची भाषा केली. अनेक वेळा महाराष्ट्रात बेकायदा घुसण्याचा प्रयत्न केला. ते आंध्रातून बोटीद्वारे बाभळी बंधाऱ्यात गोदावरी नदीतून भेट देण्याचा प्रयत्न करत असत. आंध्र - महाराष्ट्र सीमेवर महाराष्ट्रातील कृती समितीचे कार्यकर्ते, शेतकरी, नागरिक व आंध्रातील तेलगू देशम व भाजपच्या कार्यकर्त्यात अनेकदा वाद झाले, जाळपोळ झाली, दगडफेक झाली. पोलिसांनी लाठीचार्ज

केला. अशाही परिस्थितीत पोलीस प्रशासनाने परिस्थिती चांगली हाताळली. आपले जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, स्थानिक पोलीस व जलसंपदा विभाग, महसूल विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कठोर परिश्रम घेतले. स्वतः कार्यकारी अभियंता श्री नाथ हे या सर्वात केंद्रस्थानी होते. नांदेड जिल्ह्यातील नायगाव, बिलोली, उमरी, धर्माबाद या चार तालुक्यातील ६० गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी व वीस हजार एकर क्षेत्राला सिंचनाचा लाभ देणारा बाभळी बंधारा व्हावा ही या भागातील जनतेची तीव्र इच्छा होती. त्यासाठी तीस वर्षापासून राज्य सरकारकडे मागणी करण्यात येत होती. लोकशाही मार्गाने आंदोलन केले गेले होते. सर्वोच्च न्यायालयात २००६ साली शेतकऱ्यांच्यावतीने याचिका देखील दाखल केली गेली होती. यासाठी कार्यकारी अभियंता श्री नाथ यांनी मोलाचे सहकार्य केलेले होते..

बाभळी बंधारा प्रकरणी महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री आर आर पाटील, जलसंपदा मंत्री अजित दादा पवार, अशोकरावजी चव्हाण, नागोराव जाधव, जलसंपदा विभागाचे सचिव, या भागाचे आमदार, नेते यांचे एक शिष्ट मंडळ दिनांक १८ एप्रिल २००७ रोजी भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भेटण्यासाठी गेले, यावेळी जलसंसाधन मंत्री सैफुद्दीन सोझ व पृथ्वीराज चव्हाण इतर नेते उपस्थित होते. महाराष्ट्राची बाजू पंतप्रधानांसमोर अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली. याचा मी साक्षीदार आहे. यावेळी श्री नाथ यांनी सर्व नेत्यांचा समन्वय साधून भेटीचे योग्य असे नियोजन केले होते. ही बाब खरोखरच वाखाणण्यासारखी आहे

अशा प्रकारे महाराष्ट्र शासन स्तरावर बंधाऱ्याच्या बांधकामास पुरेसा निधी वेळेवर उपलब्ध व्हावा यासाठी मंत्रालयीन

स्तरावर त्याचा पाठपुरावा करणे तसेच दुसरीकडे न्यायालयीन बाजू समर्थपणे मांडण्यासाठी योग्य, अचूक व पुरेशी माहिती वकिलांना पुरविणे, स्थानिक शेतकरी व जनतेच्या मागण्या पूर्ण करणे अशी तिहेरी भूमिका श्री नाथ यांनी यावेळी पार पाडली.

बाभळी बंधाऱ्याच्या बांधकामात त्यांना इंजिनियर विजय कुरुंदकर सहाय्यक अभियंता श्रेणी एक, हरिहर, ओझरकर ,बडगे, भानुस्कर इत्यादी सर्व जलसंपदा विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. सोमा कन्स्ट्रक्शन हैदराबाद यांनी बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम अत्यंत निर्धारित वेळेत व गुणवत्तेसह पूर्ण केले आहे. अखेर २८ फेब्रुवारी २०१३ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने बाभळी उच्च पातळी बंधारा बांधकामाचा निर्णय महाराष्ट्राच्या बाजूने दिला. बाभळी बंधाऱ्याचे २९ ऑक्टोबर २०१३ रोजी तात्कालिन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माननीय अजित दादा पवार, माननीय सुनील तटकरे, माननीय अशोकरावजी चव्हाण, माननीय भास्करराव पाटील खतगावकर, आमदार वसंतरावजी चव्हाण, गंगाधरराव कुंटूरकर, माननीय अंतापुरकर, माननीय डी.पी. सावंत यांच्या उपस्थितीत नागोराव जाधव, रोशन गावकर, गणेश पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत जलसाठा करून उद्घाटन करण्यात आले. बाभळी बंधाऱ्याच्या या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातच बळेगाव बंधाऱ्याचा समावेश केल्याने बळेगाव बंधारा पूर्ण झाला. हे जनतेचा लोक लढा लोकप्रतिनिधी व कुशल प्रशासनाच्या त्रिवेणी कष्टाचे फळ आहे असे मला वाटते. मागील दहा वर्षापासून जिल्ह्यातील पाच तालुक्यातील हजारो शेतकरी व लाखो जनतेला या बंधाऱ्यामुळे सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी मिळत आहे. गोदाकाठच्या परिसरात विहिरी व विंधन विहिरींना कायमस्वरूपी पाणी मिळत आहे. शेतकरी दुहेरी पीक घेत आहेत. या भागात या भागातील शेतकरी, शेतमजूर व

जनतेच्या विकासासाठी बाभळी व बळेगाव बंधारे वरदान ठरले आहेत. यात कार्यकारी अभियंता श्री नाथ यांचा मोलाचा वाटा आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. नाथ साहेबांना त्यांना त्यांच्या कार्याबद्दल त्यांच्या या सहभागाबद्दल धन्यवाद आणि त्यांना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

प्रामाणिक व ध्येयवेडा अधिकारी

श्री. सुनिल चव्हाण (आयएएस)
से.नि.सचिव जलसंधारण विभाग
महाराष्ट्र शासन

इंजिनीयर विश्वनाथ बाबुनाथ नाथ यांनी जलसंपदा आणि जलसंधारण अशा दोन्ही विभागांमध्ये विविध ठिकाणी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता म्हणून उत्कृष्ट रीतीने कर्तव्य पार पाडले आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची भाग्यरेषा ठरलेल्या गोदावरी नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेजेसच्या निर्मितीमध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. तसेच महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशच्या सीमेवरील बाभळी बंधाऱ्याबाबत निर्माण झालेल्या आंतरराज्य वादात त्यांनी माझ्या महाराष्ट्र राज्याची बाजू न्यायालयात अचूकपणे मांडली. त्यामुळे बाभळी बंधारा वेळेत पूर्ण होऊ शकला.

पुढे हे इंजि. विश्वनाथ नाथ हे जलसंपदा विभागामधून जलसंधारण विभाग आणि मराठवाड्यात चांगले काम करून गेले. शासनाच्या धोरणाप्रमाणे पावसाचे पाणी अडवण्यासाठी योजना प्रभावीपणे राबवीत होते. सध्या ते शासनाच्या जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेचे महासंचालक अर्थात वाल्मी छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असून येथूनच ते लवकरच सेवानिवृत्त होत आहेत. श्री विश्वनाथ नाथ यांनी माझ्यासोबत विविध पदांवर काम केलेले आहे. त्याच्या कामाची पद्धत आणि आवाका मी जवळून पाहत आलेलो आहे. ते खरोखरच एक प्रामाणिक आणि ध्येयवेढे अधिकारी आहेत. त्यांनी केलेले काम खरोखरच वाखाणण्यासारखे आहे.

शासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी सामाजिक जाणिवेने नाथपंथी समाजातील व्यक्तींना शिक्षणाचे महत्त्व आणि शासन सेवेतील संधी याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे अनेकदा त्यांचा गौरवदेखील झाला आहे. त्यामुळे नाथपंथी समाजातील अनेक युवक शासकीय सेवेत दाखल झालेले आहेत. आता त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्यावर गौरव ग्रंथ प्रकाशित केला जात आहे हे वाचून आनंद झाला.

एका अतिशय सामान्य कुटुंबातून येऊन खडतर आयुष्य जगून शिक्षण पूर्ण करून महासंचालक या पदापर्यंत पोहोचले यात त्यांचे कष्ट प्रामाणिकपणा आणि जिद्द दिसून येते. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे समाजसेवेचे कार्य अखंड चालूच राहील याची मला खात्री आहे. निवृत्तीनंतरचे आयुष्य त्यांना आरोग्यदायी, समाधानी आणि सुखदाय जावो या शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

सचोटीने काम करणारा अधिकारी

मा.श्री. शंकरअण्णा धोंडगे
मा.आमदार,नांदेड

आम्ही राजकीय, सामाजिक जीवनात वावरत असताना अनेकदा प्रशासनातील विविध स्तरावर कार्यरत असणाऱ्या शासकीय अधिकारी वर्गाशी संबंध येत असतो. त्यातील सर्वांचीच नावे लक्षात ठेवणे अथवा ओळख राहाणे शक्य नसते. परंतु काही अधिकारी असे असतात की ते कायमचे लक्षात राहातात. कधी स्वभाव, कधी काम करण्याची वेगळी पद्धत तर कधी मनाला भावणारा प्रामाणिकपणा ! अशा वेगळ्या पद्धतीने प्रशासनात काम करणारे अधिकारी चटकन लक्षात राहतात. त्यापैकीच एक म्हणजे इंजिनियर विश्वनाथ बाबुनाथ नाथ साहेब ! शासनाच्या जलसंपदा आणि जलसंधारण खात्यात विविध पदावर कार्यरत राहून आत्ता ते औरंगाबाद येथील शासनाचा उपक्रम असलेल्या वाल्मि या संस्थेचे महासंचालक आहेत.

इंजिनीयर नाथ साहेब यांच्या बाबतीत भरपूर काही लिहिण्यासारखे आहे. परंतु त्या सर्वाचा थोडक्यात सारांश सांगायचा झाला तर त्यांचा प्रामाणिकपणा आणि जबाबदारी स्वीकारून काम करण्याची पद्धत मनाला भावणारी आहे. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी त्याचा चारी बाजूने विचार करून, अभ्यास करून निर्णय घेण्याची त्यांची पद्धत लोकांवर छाप पाडणारी आहे. नाथ साहेबांची कौशल्य पणाला लावून काम करण्याची पद्धतच त्यांना इथपर्यंत यशस्वीपणे घेऊन आली आहे. अलिकडे आम्ही पाहतो की वरिष्ठ पातळीवर काम करणारे अनेक अधिकारी राजकीय पुढाऱ्यांच्या मागेपुढे करत असतात. आपल्यावर त्यांची कृपादृष्टी राहावी म्हणून वाटेल तसे काम करतात. परंतु नाथ साहेबांच्या बाबतीत असे अजिबात नाही. कोणाच्या विनाकारण पुढे पुढे करणे किंवा हांजी हांजी करण्याचा त्यांचा स्वभाव नाही. आपल्या कामाशी प्रामाणिक राहून हाती घेतलेल्या कामांना न्याय देणे हेच त्यांच्या कार्यपद्धतीचे सूत्र आहे. राजकारणी लोकांच्या पुढे पुढे करणे त्यांना जमत नाही

नव्हे तर त्यांचा तो स्वभावच नाही. त्यामुळे होते असे की अनेकदा पात्रता आणि कुवत असताना देखील महत्त्वाच्या पदांवर काम करण्यापासून त्यांना दूर राहावे लागले आहे.

महाराष्ट्राच्या जलसंपदा विभागात काम करीत असताना त्यांची कामाच्या प्रती असलेली तळमळ आम्ही जवळून पाहिली आहे. विशेषतः महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश राज्याच्या सीमेवर असलेल्या गोदावरी नदीवरील बाभळी उच्च पातळी बंधाऱ्याच्या निर्मितीच्या वेळी दोन्ही राज्यांमध्ये जो वाद झाला होता तो वाद अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत पोहोचला होता. त्यासाठी वारंवार दिल्लीला फेऱ्या मारणे असो की आपल्या राज्याची बाजू आपल्या वकिलांना भक्कमपणे न्यायालयात मांडता यावी यासाठी जो अभ्यास करावा लागायचा किंवा जी कागदपत्रे जमा करावी लागतात आणि त्यासाठी जी धावपळ करावी लागते तशी धावपळ दुसऱ्या कुठल्याही क्लासवन अधिकाऱ्यांने केली नसती याची आम्हाला खात्री आहे. तो लढा केवळ नाथ साहेब होते म्हणूनच जिंकू शकलो असे माझे प्रामाणिक मत आहे. या बंधाऱ्यामुळे हजारो शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे. अधिकाऱ्याची आपल्या कामाप्रती असलेली निष्ठा ती कायम असावी लागते. ती असली की ते काम चांगले होतेच. नाथ साहेब यांचे नाव बाभळी बंधाऱ्याला कायमचे जोडले गेले आहे.

महाराष्ट्राच्या सिंचन क्षेत्रात सातत्याने वेगवेगळे प्रयोग चालू असतात. नाथ साहेब यांचा नेहमी हाच प्रयत्न चालू असायचा की आपल्या हातून असे काहीतरी चांगले काम व्हायला पाहिजे की त्यामुळे शेतकऱ्यांचे आणि जनतेचे कल्याण झाले पाहिजे. त्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू असायची. त्यासाठी नवनवीन कल्पना मांडणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे सतत चालू असते. त्यांची कल्पनाशक्ती आणि कार्यक्षमता प्रचंड आहे. परंतु आपल्या

शासनाचे दुर्दैव असे की अशा प्रामाणिक अधिकाऱ्याची योग्य ठिकाणी नेमणूक न करता नेहमी साईड पोस्टला ठेवले गेले. त्यामुळे खरे तर राज्याचेच मोठे नुकसान झाले आहे. एक उत्तम प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची जनमानसात प्रतिमा आहे. परंतु शासनाने त्यांच्या क्षमतेचा आणि प्रामाणिकपणाचा, सचोटीचा योग्य असा वापर करून घेतला नाही. त्यांची प्रतिमा आणि प्रतिभा याचा वापर झालेला नाही. अशा अधिकाऱ्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

सध्या राज्यातील सिंचन क्षेत्राची घडी विस्कटलेली आहे आणि जुने चांगले अधिकारी सेवानिवृत्त होत आहेत. परंतु नाथ साहेबांची सामाजिक बांधिलकीची वीण घट्ट आहे. ते आपल्या सेवानिवृत्तीनंतर देखील आपल्या ज्ञानाचा उपयोग राज्याच्या सिंचन विकासासाठी करतील आणि मला खात्री आहे शासन सेवे बाहेर राहून देखील बऱ्याच गोष्टी त्यांना करता येण्यासारख्या आहेत. मग ते कल्पनांची मांडणी असो अथवा प्रबोधनाचे काम असो यातून देखील त्यांच्या ज्ञानाचा उपयोग राज्याला होऊ शकतो. राज्य शासनाने देखील त्यांच्या कार्याची दखल घेऊन सेवानिवृत्तीनंतर देखील त्यांच्या ज्ञानाचा आणि सृजनशीलतेचा उपयोग करून घ्यावा अशी सूचना करावीशी वाटते. श्री नाथ साहेब यांना पुढील आयुष्य सुख-समृद्धीचे आणि भरभराटीचे जावो त्यांना उत्तम आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

अनाथांचा नाथ विश्वनाथ

कर्मयोगी अभियंता

इंजि.विलास राजपूत
से.नि.सचिव
जलसंपदा विभाग,मंत्रालय,
मुंबई

मी जेव्हा अधीक्षक अभियंता म्हणून नाशिक येथील मध्यवर्ती संकल्पचित्र मंडळ नाशिक येथे कार्यरत असताना इंजिनियर विश्वनाथ बाबुनाथ नाथ यांची भेट झाली. त्यावेळी ते नांदेड येथे कार्यकारी अभियंता म्हणून जलसंपदा विभागात कार्यरत होते. त्यांच्याकडे त्यावेळी उपसा सिंचन योजनांची कामे होती. त्या निमित्ताने ते संकल्पचित्र मंडळामध्ये येत असत. त्यावेळी म्हणजे आमची प्रथम भेट झाली आणि पहिल्या भेटीतच ते एक मृदू स्वभावाचे शांत, निगर्वी परंतु हुशार अभियंता असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यानंतर फारसा आमच्यात संपर्क झाला नाही. परंतु पुढे मी पुणे येथे जलसंधारण विभागात अधीक्षक अभियंता असताना श्री नाथ हे मंत्रालयामध्ये जलसंधारण विभागात आले आणि अवर सचिव झाले. त्यावेळी मात्र त्यांच्यासोबत सतत तीन वर्षे काम करण्याचा योग आला.

त्यावेळी त्यांचा अतिशय जवळून परिचय झाला. त्यांचे स्वभाव त्यांचे गुणविशेष याच्याशी परिचित झालो. अतिशय संयमी स्वभाव कायम, दुसऱ्यांना सहकार्य करण्याची भावना अशा प्रकारचे हे युनिक व्यक्तिमत्व होते. त्यामुळे आमचा परिचय अधिक वाढला. वास्तविक पाहता मी फारसा लोकांमध्ये मिसळत नाही अथवा फारसे कोणाला जवळही करीत नाही. परंतु जी माणसे मनाला भावतात त्यांचा स्वभाव, त्यांचे कार्य मनाला पटते अशा व्यक्ती आपोआपच जवळ येतात आणि त्यातून ऋणानुबंध तयार होतात. माझ्या असे लक्षात आले की श्री नाथ हे अतिशय गरीबीतून वर आलेले व्यक्तिमत्व आहे. विशेष म्हणजे प्रचंड कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. सामान्य परिस्थितीतून आल्यामुळे कष्टाचे महत्त्व त्यांना माहित आहे. त्यातूनच त्यांच्या सकारात्मक विचारसरणीची निर्मिती झाली आहे. बोलत असताना सतत हसतमुख चेहरा असतो. त्यांच्या बोलण्यातून सतत सकारात्मक विचार बाहेर येत असतात आणि संघर्ष मार्ग त्यांचा

कार्यभाग आहे. संकटातून किंवा अडीअडचणीतून कुठल्याही परिस्थितीतून मार्ग काढण्याचा त्यांचा स्वभाव आहे आणि हीच त्यांची काम करण्याची पद्धत देखील बनली आहे. एखादी गोष्ट अवघड असेल किंवा अडचणीची वाटत असेल तर ते त्या संकटातून मार्ग काढण्यासाठी अविरत प्रयत्न करत असतात. प्रयत्नांती वाळूचे कण रगडीता तेलही गळे ही जी म्हण आहे ती त्यांच्यासाठी चपखल बसते. प्रतिकूल अवस्थेतून मार्ग कसा काढायचा आणि त्यासाठी प्रयत्नांची कास अजिबात सोडायची नाही हा त्यांचा एक स्वभाव विशेष आहे.

बाकी प्रशासकीय बाबतीत म्हणायचे झाले तर कोणत्याही विषयाला हात घालताना सर्व शक्यता तपासून त्यानंतर तांत्रिक निर्णय घ्यायचा अशी त्यांची कार्यशैली आहे. इंजीनियरिंगच्या बाबतीत अतिशय चांगला अभ्यास आहे. त्याचबरोबर प्रशासनातील देखील त्यांचा चांगला अनुभव आहे. त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामध्ये आणि जलसंधारण विभागांमध्ये दोन्हीकडे काम करून आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे.

वास्तविक पाहता एखाद्या विशिष्ट वर्गातून अतिशय गरीबीतून शिक्षण घेऊन शासनाच्या वर्ग एक अधिकारी होणे आणि त्या ठिकाणी टिकून राहणे एवढेच नव्हे तर त्या खात्याच्या सर्वोच्च पदी विराजमान होणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. परंतु श्री नाथ यांनी ते साध्य करून दाखवले आहे. यासाठी त्यांची वाट मात्र सोपी नव्हती. प्रत्येक ठिकाणी त्यांना संघर्ष करावा लागला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करावे लागले. परंतु त्यांनी कधीही हार मानली नाही. आपली कष्ट करण्याची सवय, विनम्र स्वभाव आणि संकटावर मात करण्याची जिद्द याच्या जोरावर ते सर्वोच्च पदावर पोचले आणि आपल्या कर्तृत्वाची छाप त्यांनी खात्यावर सोडली आहे. त्याचप्रमाणे त्याच विभागाच्या सर्वोच्च पदावर देखील ते विराजमान झालेले आहेत. सध्या ते महाराष्ट्र शासनाच्या जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी या

संस्थेच्या महासंचालक पदावर कार्यरत आहेत. अगदी सहाय्यक कार्यकारी अभियंता पदापासून ते अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता आणि आता वाल्मीचे महासंचालक या पदापर्यंत पोहोचलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी संघर्ष करून त्यांना स्वतःला सिद्ध करावे लागले आहे.

एखादा माणूस कोणत्या परिस्थितीतून सुरुवात करतो आणि कुठे पोहोचतो, त्यावेळी त्याला ज्या ज्या संघर्षातून जावे लागले आणि त्यानंतर यश प्राप्त झाले ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. संघर्षातून शून्यातून शिखरापर्यंत पोहोचणे यात खूप वेगळेपण आहे. अशा प्रकारचे काम करणारे अधिकारी अगदी बोटावर मोजता येणे योग्य आहेत. अशा अधिकाऱ्यांना मी तर कर्मयोगीच समजतो. प्रशासकीय सेवेमध्ये काम करीत असताना बऱ्याच वेळेला गॉडफादर असणे कोणाचा तरी राजकीय पाठिंबा असणे अशा गोष्टी असल्याशिवाय मोक्याच्या जागा मिळत नाहीत. परंतु अशा प्रकारचा कुठल्याही प्रकारचा पाठिंबा अथवा गॉडफादर नसताना त्यांनी केवळ आपल्या कर्माच्या जीवावर स्वतःला सिद्ध केले आणि यशाचे शिखर गाठले. यासाठी त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आता ते सेवानिवृत्तीच्या टप्प्यावर येऊन पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या कामाचा आढावा लक्षात येतो. यापुढील आयुष्य त्यांना सुख-समृद्धीचे आणि आरोग्यदायी जावो या माझ्या सदिच्छा आहेत.

अनाथांचा नाथ विश्वनाथ

आपल्या मातृभूमिचे नाव उंचावले

श्री. भगवान वाघमारे

मा.उपमहापौर,महानगरपालिका,

परभणी

साधारणपणे वीस पंचवीस वर्षांपूर्वी मी त्यावेळी परभणी महानगरपालिकेचा उप महापौर होतो. त्यावेळी काही कामानिमित्त आलेल्या जलसंपदा खात्यातील कार्यकारी अभियंता असलेले इंजि. विश्वनाथ नाथ माझ्याकडे भेटीसाठी आले होते. त्यावेळी आमची आणि त्यांची पहिली भेट परभणी येथे झाली. ज्या कामासाठी ते आले होते त्या कामावर चर्चा झाली ते कामही झाले मात्र ही व्यक्ती माझ्या कायमची लक्षात राहिली. या व्यक्तिमत्वाबाबत अधिक माहिती घेतली असता असे कळले की परभणी जिल्ह्यातल्या शिंगणापूर या छोट्याशा गावात अतिशय सामान्य कुटुंबातून आलेल्या या व्यक्तीने आपल्या कर्तृत्वाच्या, हुशारीच्या आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या जलसंपदा आणि नंतर जलसंधारण या खात्यातील सर्वोच्च पद गाठले आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे.

आपल्या कर्तृत्वाने त्यांनी आमच्या परभणी जिल्ह्याचे नाव देशाच्या आणि राज्याच्या नकाशात कोरले आहे. त्यांची कामाबद्दलची तळमळ आणि झपाटा हे आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेले आहे. प्रचंड मेहनत घेण्याची त्यांची तयारी असते. प्रशासनात काम करताना अनेक अडचणी येतात. या अडचणीवर मात करून यशाच्या शिखरापर्यंत कसे पोहोचायचे हे श्री नाथ यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. आपल्या खात्यामध्ये काम करत असताना अनेक प्रशासकीय अडचणी आल्या, राजकीय हस्तक्षेप झाले किंवा तांत्रिक अडचणी आल्या या सर्वांचा बारीक अभ्यास करून त्या सर्वांवर तोडगा काढून त्या सर्व समस्या सोडवण्याचे काम श्री विश्वनाथ नाथ यांनी अतिशय सचोटीने आणि प्रामाणिकपणे केलेले आहे. त्यांचे हे कार्य उल्लेखनीय अशा प्रकारचे आहे.

आपल्या आयुष्यात त्यांनी सामाजिक कार्यात देखील सामाजिक जाणिवेने आणि तळमळीने सहभाग घेतलेला आहे.

अनेकांना त्यांनी मदतीचा हात तर दिला आहेच याशिवाय आयुष्यात पुढे जाण्यासाठी जी मार्गदर्शनाची गरज लागते ती अनेकांची गरजही त्यांनी पूर्ण केलेली आहे. एक व्यक्ती म्हणून आणि एक प्रशासकीय अधिकारी म्हणून ते अतिशय उच्च कोटीतील ज्ञान संपादन करणारे अधिकारी आहेत आणि त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी, राज्यासाठी, देशासाठी आणि आपल्या जिल्ह्यासाठी त्यांनी केलेला आहे. त्यामुळे त्यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांना धन्यवाद देतो. अलिकडेच त्यांची वाल्मि या सरकारी संस्थेच्या महासंचालक पदी निवड झाल्याचे कळले. त्याबद्दल त्यांचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो. त्यांना आपली सेवा करण्याकरिता आणि समाजात मार्गदर्शन करण्याकरता यापुढेही उत्तम आरोग्य आणि आयुर्मान लाभो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि माझे दोन शब्द थांबवतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

मेरा गीत अमर कर दो

इंजि.राजेंद्र एकनाथ भिंगारे
मा.उपअभियंता सा.बां.
औरंगाबाद

औरंगाबाद येथील शासकीय इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असताना जुलै १९८७ साली माझी व विशू अर्थात विश्वनाथ नाथ यांची पहिल्यांदा भेट झाली. कारण आम्ही एकाच इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता आणि होस्टेललाही एकाच रूममध्ये नंबर लागला होता. विशेष म्हणजे आम्ही एका रूममध्ये तिघेजण राहत होतो आणि तिघेही मराठवाड्यातीलच होतो. तिघांचाही विषय सिव्हिल इंजिनिअरिंग हाच होता. त्यामुळे आमची लवकर गट्टी जमली. तीन वर्षे आम्ही एकत्र राहिलेलो आहे. त्यापैकी मी स्वतः राजेंद्र भिंगारे, दुसरा विश्वनाथ नाथ आणि तिसरा सुनील पैठणकर असे आम्ही तिघे रूम पार्टनर होतो. त्यापैकी सुनील आणि विशू हे ग्रामीण भागातून आलेले होते. विशू तर परभणी जिल्ह्यातील असणाऱ्या शिंगणापूर या अगदी छोट्याशा गावातून आलेला होता. विशेष म्हणजे मी सोडून इतर दोघे जे रूम पार्टनर होते त्यांच्यामध्ये विशूच्या वडिलांचे निधन अगदी विशूच्या लहानपणीत झालेले होते तर दुसरा मित्र सुनील याच्या आईचे निधन झालेले होते. केवळ मी एकटाच असा होतो की माझे आई आणि वडील दोघेही जिवंत होते. त्यामुळे ते दोघे मला अतिशय भाग्यवान समजत असत. विशूची आई शेतमजूर होती. घरी अठरा विश्व दारिद्र्य असायचे. आई दुसऱ्यांच्या शेतामध्ये मोलमजुरी करून मुलांना जगवायची. पण परमेश्वर देखील किती निष्ठूर असतो पहा. अशा या गरीब कुटुंबात विशू हा एकटाच शिकून इंजिनिअरिंगला आलेला होता तर त्याचा लहान भाऊ मूक आणि बधिर अशा स्वरूपाचा होता. विशूची आई काबाडकष्ट करायची आणि मुलांना कसं बसं जगवायची. परंतु विशू अभ्यासात अतिशय हुशार होता. प्रत्येक वर्गात त्यांने पहिला नंबर कधी सोडला नाही .

दहावी – बारावीपर्यंत प्रत्येक विषयात चांगले गुण त्याने

मिळवले होते. त्यामुळे त्याचा इंजिनिअरिंग कॉलेजला सहजगत्या नंबर लागला होता. औरंगाबादला प्रवेश जरी मिळाला असला तरी येथे राहून शिकायचे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. त्यावेळी त्याला जी स्कॉलरशिप मिळायची त्या स्कॉलरशिपमुळे सर्व खर्च भागत नव्हता. परंतु आपल्या कुटुंबावर, आईवर आणि भावंडांवर त्याचे एवढे प्रेम होते की आपल्या स्वतःचीच गुजराण त्या स्कॉलरशिपमध्ये होणे शक्य नव्हते तरी पण विशू आपल्या स्कॉलरशिप मधील अर्धे पैसे मनीऑर्डरने आईला पाठवत असे. आम्हाला खूप प्रश्न पडायचा की याच्या मेसचे द्यायला याच्याकडे पैसे नसायचे तरीदेखील तो स्कॉलरशिप झाल्या झाल्या आपल्या आईला मनी ऑर्डर न चुकता करायचा. त्यामुळे त्याला नेहमी आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागायचे. कधीकधी तर असे व्हायचे की मेसचे द्यायला देखील त्याच्याजवळ पैसे नसायचे. मेसचे पैसे वाढू नयेत म्हणून तो अधून मधून मेसला जाणे टाळायचा आणि कमीत कमी जेवणाचा खर्च कसा होईल याचा विचार करायचा. आम्ही मित्रांनी त्याला विचारले की, अरे आज जेवायला मेसला का नाही आलास?.. तर तो म्हणायचा आज मी मावशीकडे गेलो होतो. तिथेच जेवून आलो. कधी म्हणायचा की माझा आज उपवास आहे तर कधी म्हणायचा की माझा अमुक एका देवीचा उपवास आहे. त्यामुळे आज मी जेवणार नाही. असे अनेकदा व्हायचे. परंतु एकदा आमच्या कॉमन मित्राने सांगितले की तो मावशीकडे वगैरे काही जेवायला जात नाही. मेसचे जेवण टाळण्यासाठी तो अधून मधून बाहेर फिरून येत असे आणि मावशीकडे जेवून आलो असे मुद्दाम सांगत असे.

ही गोष्ट लक्षात आल्यानंतर आम्ही त्याच्यावर रागावलो. एकत्र राहून एकमेकांना समजून न घेणे, न सांगणे हे काही बरे नाही. मग त्यावर काहीतरी तोडगा काढण्याचे ठरले. कारण त्यावेळी

सर्वांचीच परिस्थिती सारखीच असायची. सर्वच मुले अतिशय सामान्य परिस्थितीतून आलेली असायची. माझे वडील शासकीय नोकरीत असल्यामुळे परिस्थिती जरा बेताची होती. परंतु या दोघांची परिस्थिती सारखीच होती. यावर तोडगा काढण्यासाठी आम्ही तिघां मित्रांनी एक आयडिया केली. एका दहावीच्या मुलाला शिकवणी देण्यासाठी एका शिक्षकाची गरज आहे असे आम्हाला कळले. त्यानंतर मी विशूचा त्या ठिकाणी विचार केला.

त्याच्या वतीने मी त्या दहावीच्या मुलाच्या पालकांशी बोललो. त्यावेळी मी त्यांना सांगितले की माझा एक मित्र आहे. तो तुमच्या मुलाला सकाळी आणि संध्याकाळी दोन वेळेला शिकवायला येईल. परंतु त्याचे मानधन न देता त्याला दोन वेळ जेवण द्या. सकाळी आणि संध्याकाळी. त्या मुलाच्या वडिलांना खूपच आनंद झाला आणि हा प्रस्ताव त्यांनी ताबडतोब मान्य केला. दोन टायमाचे जेवण देण्याने मुलाची शिकवणी होत असल्याने त्यांनाही आनंद झाला आणि विशूचाही जेवणाचा प्रश्न मिटला. त्या दिवसापासून दररोज सकाळी विशू शिकवणी घेऊन येत असे आणि येताना जेवण करून येत असे. पुन्हा संध्याकाळी शिकवणी घेऊन येताना परत जेवून येत असे. अशा प्रकारे त्याच्या जेवणाचा प्रश्न मिटला. विशुने अतिशय खडतर परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले आणि तो इथपर्यंत पोहोचलेला आहे.

इंजिनिअरिंगच्या पहिल्या प्रयत्नातच सुनील आणि विशू दोघेजण म्हणजे माझे रूम पार्टनर उत्तीर्ण झाले आणि बाहेर पडले. मी मात्र माझ्या काही शारीरिक अडचणीमुळे मागे राहिलो. इंजिनिअरिंग तर झाले मग आता पुढे काय असा प्रश्न निर्माण झाला. असे अनेक विद्यार्थी होते की ज्यांना निकाल झाल्या झाल्या लगेच नोकरी मिळणे शक्य नव्हते. परंतु नोकरीच्या शोधात औरंगाबाद सारख्या शहरांमध्ये

राहणे देखील गरजेचे होते. त्यावेळी इंजिनियररिंगमधील जी हुशार मुले असत ती कॉलेजचे प्रिन्सिपल आणि शिक्षकांच्या ताबडतोब लक्षात येत असत. प्रत्येकाच्या घरची परिस्थिती शिक्षकांच्या लक्षात येत असे. विशूची परीक्षा झाल्यानंतर त्याची आर्थिक परिस्थिती प्रिन्सिपल आणि शिक्षकांच्या लक्षात आली होती. त्यामुळे त्याला व्हिजिटिंग लेक्चरर करण्यासाठी संधी देण्याचे त्यांनी ठरवले. विशेष म्हणजे स्ट्रक्चर हा विषय त्याचा चांगला होता. वास्तविक हा विषय किचकट समजला जातो. परंतु माझे रूम पार्टनर दोघेही या विषयात चांगले हुशार होते. मराठवाड्याचे टॉपर होते. विशू तर परीक्षेला जाताना आय.एस. कोड देखील सोबत घेऊन गेला नाही. परीक्षेत आकडेमोड रफ कागदावर तयार करून तो पेपर लिहीत असे.

त्यानंतर विशूने प्रिन्सिपलच्या आदेशानुसार विजिटिंग लेक्चर सुरू केले. परंतु ते लेक्चर नियमित नसत. त्यामुळे त्यातून जे उत्पन्न मिळते त्यावर काही भागत नसायचे. पैसे कमी पडायचे. मग त्याचे काही मित्र आणि त्यांने कोचिंग क्लास सुरू करण्याचे ठरवले. जे विषय किचकट आहेत त्या विद्यार्थ्यांना त्या विषयासाठी कोचिंग क्लासची गरज वाटायची. हा मुद्दा लक्षात घेऊन त्यांनी दोघा तिघांनी मिळून कोचिंग क्लासेस सुरू केले. अतिशय कमी वेळेमध्ये त्यांचा क्लास नावारूपाला आला. अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. कारण या दोघांची दोघा तिघांची शिकवण्याची पद्धत साधी सोपी आणि सुटसुटीत होती. तसेच सर्वसामान्य मुलांना कळणारी होती. त्यामुळे अतिशय अल्प कालावधीत यांच्या क्लासला चांगला प्रतिसाद मिळाला. त्याचवेळी माझ्या घरी माझ्या लग्नाचा विचार सुरू झाला होता. तेव्हा मी माझ्या आईला सांगितले होते की माझ्या लग्नाचा विचार तूच कर. सगळं तूच करायचे. मुलगी बघण्यापासून ते बोलणी करण्यापर्यंत तूच सर्व काही ठरव. मी फक्त लग्नाला येईन.

त्याप्रमाणे आईने मुलगी बघितली. सर्व बोलणी केली आणि मला म्हणाली की तुम्हाला दोघांना पतीपत्नी म्हणून आयुष्य काढायचे आहे. एकदा तरी मुलगी बघून घे . त्यानंतर मुलीला बघायला जाण्याचा निर्णय घेतला आणि त्यावेळी मी माझ्यासोबत विशूला अर्थात विश्वनाथ नाथ या मित्राला सोबत घेऊन गेलो होतो. मुलीच्या घरी गेल्यानंतर आम्ही मुलीला पाहिले आणि त्यावेळी एक सच्चा मित्र म्हणून विशू देखील मुलगी चांगली असल्याचे आणि तू तिच्याशी लग्न करावे असे त्याने सांगितले. त्यानुसार आमचे लग्नही त्यावेळी पार पडले.

इकडे विशू आणि त्याच्या मित्रांचे क्लास चांगले चालले होते. त्यांना चार पैसे मिळत होते. याचवेळी विशूने इंजिनियरींगमध्ये पोस्ट ग्रॅज्यूयशन देखील केले. विशूला देखील पोस्ट ग्रॅज्युएशन झाल्यानंतर व्हीजेटीआय या नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजच्या लेक्चररशिपसाठी कॉल आला. यावेळी मी त्याला सल्ला दिला आणि कोचिंग क्लासेस बंद करून तू लेक्चररशिप कर असा मी सल्ला त्याला दिला आणि तो त्यांनी मानला. त्यानंतर तो मुंबईला शिफ्ट झाला. त्या ठिकाणी लेक्चररशिप चालू असतानाच त्याचे लग्न जमले आणि लग्न झाले देखील. त्यानंतर आम्ही अधून मधून भेटत राहिलो. त्याने मात्र तेवढ्यावरच न थांबता पुढे एमपीएससीची तयारी सुरू केली. तो इतका हुशार होता की त्याने पहिल्या प्रयत्नातच एमपीएससी पास करून तो एइइ म्हणजे सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून निवडला गेला आणि त्याची पोस्टिंग पाटबंधारे खात्यामध्ये झाली. पुढे मग त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही.

आज तो इतक्या मोठ्या पदावर असला तरी अगदी डाऊन टू द अर्थ आहे. कुठल्याही गोष्टीचा गर्व, अभिमान अजिबात नाही. सर्वांशी तो आजही तितक्याच प्रेमाने आणि आपुलकीने वागतो आणि बोलतो. त्यामुळे तो सर्वांना हवाहवासा वाटतो. त्याच्या परीने जितकं

शक्य आहे तेवढी मदत तो आपल्या मित्रांना, नातेवाईकांना, समाजातल्या गोरगरिबांना करीत असतो. विशेष म्हणजे आज तो इतका मोठा अधिकारी असला तरी त्याच्या गाडीवरचा चालक, घरकाम करणारे कर्मचारी यांना देखील तो आपल्या कुटुंबाचा घटक आहेत असे समजून मदत करत असतो. त्यांच्या अडीअडचणीला धावून जात असतो. त्यामुळे माणुसकी त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि तळमळने जपलेली आहे.

पुढे नांदेडला बराच कालावधी त्यांनी घालवला आहे. महाराष्ट्राच्या जलसंपदा खात्यातील बाभळीचा उच्च पातळी बंधारा खूप गाजलेला आहे. या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याचे भाग्य विश्वनाथला लाभले आहे. या ठिकाणी भौगोलिक परिस्थिती अशी होती की हे धरण महाराष्ट्र, आंध्र प्रदेश सीमेवर आहे. त्यामुळे दोन्ही राज्यांचा वाद होता. या वादातून मार्ग काढण्यासाठी अगदी सुप्रीम कोर्टापर्यंत विशूला फेऱ्या माराव्या लागल्या. दोन्ही राज्याचे मुख्यमंत्री आणि एकदा तर पंतप्रधान आणि दोन्ही राज्याचे मुख्यमंत्री यांच्यासोबत चर्चा करून या प्रश्नावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. आपल्या खात्याची प्रतिमा त्यांनी चांगलीच तयार केली आहे.

विशू आज कितीही मोठा झाला तरी तो आपल्या मित्रांना नातेवाईकांना अजिबात विसरत नाही. प्रत्येकाशी रिलेशन त्यांनी जपलेले आहेत. वास्तविक पाहता मी आणि विशू अगदी इतके जवळचे मित्र आहोत की अगदी सख्खे भाऊ असल्यासारखे आम्ही राहत असतो. परंतु आपले कुटुंबीय तितक्याशा जवळीकतेने राहत नाहीत याची सल त्याला सलत होती. त्यामुळे त्यांनी एकदा माझ्याकडे प्रस्ताव मांडला की आपण फॅमिली सह ट्रीपला कुठेतरी जाऊया आणि त्यांनी स्वतःच तीन चार दिवसाची सहल दीव दमण

येथे आयोजित केली. त्यामध्ये आम्हा दोघांची कुटुंबे मुलेबाळे सर्व सहभागी झालो आणि येथेच्छ आनंद लुटला. त्यानंतर छोटे मोठे कार्यक्रम आयोजित करुन त्यासाठी एकमेकांकडे येणे जाणे चालू ठेवले. अशाप्रकारे त्यांनी आमच्या दोन्ही कुटुंबातील स्नेह वृद्धिंगत केला आहे. विशूने अनेक मित्र जपले आहेत, अनेक नाती जपली आहेत. त्याच्या वैयक्तिक आवडीनिवडीबद्दल सांगायचे तर त्याला गाण्याची खूप आवड आहे. त्याचे फेवरेट गाणे **ओठो से छू लो तुम मेरा गीत अमर कर दो** हे त्याचे अतिशय आवडते गाणे आहे. परंतु त्याला फार चित्रपटाचा आणि इतर गोष्टीचा छंद नव्हता. अभ्यास एके अभ्यास असा त्याचा खाक्या होता. आज विशू वाल्मीसारख्या संस्थेचा महासंचालक झालेला आहे. ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्याला उत्तम आरोग्य लाभो आणि यश मिळो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्याला धन्यवाद देतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

विश्वनाथ

सौ. वर्षा देशपांडे
वर्गमैत्रिण, औरंगाबाद

समस्तां धीर तो द्यावा, सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे, जगाला प्रेम अर्पावे...

सानेगुरुजी यांच्या या उक्ती सार्थ ठरवणारा..विश्वनाथ हा माझा शाळकरी सोबती, क्लासमेट. आमची शाळा नेताजी सुभाष विद्यालय मानवत येथील. तशी त्या वेळेसच्या काळा प्रमाणे खूप चांगली होती. मुलं मुली वेगळे डिव्हीजन होते. त्यामुळे फार असा त्याच्याशी त्यावेळी मैत्री किंवा बोलणं असं त्या काळा प्रमाणे होत नव्हतं. पण एक हुशार, मेहनती, गरीब घरातून येऊन शिक्षणाचे ध्येय ठेवून कष्ट करणारा विद्यार्थी हीच त्याची ओळख होती. त्यात आम्ही मधल्या सुट्टीत जी दोन तास होती, तेंव्हा घरी जेवायला यायचो. पण या दोन तासात विश्वनाथ मात्र गोळ्या बिस्कीटे विकून त्यातून घर आणि आपलं शिक्षण साध्य करत होता. ट्युशन क्लास जरी त्या वेळी फार नव्हते, तरी आम्ही गणित व इंग्लिश विषयासाठी ती लावत होतो. पण हे चोचले त्याला शक्य नव्हते. पण कुठल्याही प्रकारचे ट्युशन नसतानाही त्याने दहावीत उल्लेखनीय यश प्राप्त केलं. कामाशी काम, अतिशय मेहनती वृत्ती, नम्र असे वर्तन आणि अभ्यासू वृत्ती याच्या जोरावर त्याने यश प्राप्त केलं.

माणसाने ध्येय ठरवून त्याप्रमाणे प्रयत्न केले की यश परमेश्वर देतोच...आणि हा तर विश्वनाथच होता. त्याला तर यश प्राप्ती होणारच होती. परत दहावी नंतर पॉलिटेक्निक, मग इंजिनिअरिंग सर्व त्याने स्वतःच्या जोरावर, कष्टाने पदवी प्राप्त केली याचं आम्हा सर्व वर्ग मित्र मैत्रीणींना कौतुक आणि अभिमानच वाटतो. त्यात नंतर तो खूप पुढे गेला. नोकरीत यशस्वी झाला. याचं श्रेय त्याच्या त्या शाळेतल्या कष्ट सोसत केलेल्या मेहनतीलाच आहे यात शंका नाही. त्याच्या या उज्वल यशाचं गमक, रहस्य या शाळेतल्या मेहनतीच्या दिवसातच आहे.

अशा आमच्या दहावीच्या बॅचचा खरंच नाथ असलेला विश्वनाथ.!! आता whatsapp मुळे परत २५ ते ३० वर्षांनी गेट टुगेदर साठी एकत्र जमलो. तेंव्हा त्याला अशा अति उच्च पदावर विराजमान झालेले पाहून फार आनंद झाला. पण तेंव्हा तो अगदी नम्रपणे यात सहभागी झाला. कधी कुठे त्याच्या बोलण्यात वागण्यात कधीच गर्व जाणवला नाही हेच त्याचे मोठेपण.!! आम्ही जे काही झालो शिक्षक, इंजिनिअर, डॉक्टर, बँक, बिझनेस, शासकीय सेवा क्षेत्र, प्रत्येक जण करिअर करत गेलो, त्यात फार काही विशेष नाही. कारण घरून बराच सपोर्ट होता. पण त्या मुळेच विश्वनाथचं यश हे दैदीप्यमान असंच आहे. ते त्याच्या मेहनतीमुळे, कष्टाने साध्य झालंय. आमच्या ग्रुप मधल्या किती तरी शेतकरी मंडळी, अजून कोणी गरजवंत यांना त्याने सढळ हाताने मदत केलीय. त्याची गणती नाही. आपल्या बरोबर सर्वांचा विचार करून सर्वांना मदत करून वर आणणे, मदत करणे हेच त्याचा उद्देश असावा कदाचित. म्हणून त्याच नाव विश्वनाथ असावं, जे त्याने सार्थ ठरवले.

आज तो सेवा निवृत्तीच्या उंबरठयावर आहे. अगदी अभिमान वाटावा असंच कर्तृत्व आहे. त्याच्या सारखा मित्र आम्हाला लाभला यांचा अभिमान वाटतो आणि कौतुकही! खरं तर आजच्या काळात असं स्वतः कमवून आपलं शिक्षण करून आपल्या पूर्ण समाजाचा, मित्र मंडळाचा उध्दार करणारी व्यक्ती म्हणजे आजच्या पिढीला थोतांड, अशक्य वाटेल, पण विश्वनाथचे जीवन चरित्र हा एक अभ्यासाचा विषय किंवा धडा व्हावा असा आहे!!! ज्यातून फक्त आयुष्य हिंमतीने, कष्टाने, जगून आपले ध्येय साध्य होते आणि कोणतेही यश सहजासहजी मिळत नाही याची जाणीव आणि त्यातून तशी प्रेरणाच येणाऱ्या पिढीला मिळेल, यात शंका नाही.

अशा आमचा प्रिय विश्वनाथ यास सेवा निवृत्ती च्या शुभेच्छा

!!! विश्वनाथ, ही आता तुझ्या नव्या जीवनाची सुरुवात आहे. तुझी समाज सेवा अखंड चालू राहणार हे मला पण माहित आहे म्हणून तुला सेकंड इनिंग साठी शुभेच्छा आणि all the best. !! यात तुला वहिनीची साथ आधीही होती, आता पण असणारच त्याशिवाय संसार आनंदी होतच नाही. सौ वाहिनीने साथ दिली यातच सर्व आहे. त्यांचं पण खूप कौतुक.

आज गौरव ग्रंथ तयार होतोय म्हणजे बघ तुझे अगदी कर्तृत्व डोंगरा एवढंच नक्की आहे आणि याचा मला फार अभिमान वाटतो, कौतुक वाटतं.!! तशाच भावना सर्वांच्या असतील आज!

तुला खूप खूप शुभेच्छा, शुभकामना, तुझे पुढील आयुष खूप छान चांगले आनंदात निरोगी जावे, आणि तुझ्या हातून आशीच सेवा घडत जावी, हीच प्रार्थना..

अशा माझ्या प्रिय मित्राबद्दल अगदी सार्थ ओळी म्हणजे..

भरावा मोद विश्वात असावे सौख्य जगतात..
सदा हे ध्येय पूजावे, जगाला प्रेम अर्पावे

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

ध्येयवादी मित्र

श्री. राजेंद्र बाबुराव ढाकणे
जि.प.शाळा, गेवराई,
छत्रपती संभाजीनगर

विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे माझे वर्गमित्र आहेत. पाचवी ते दहावी या वर्गामध्ये आम्ही सोबत शिकत होतो. परभणी जिल्ह्यातील मानवत येथे असणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस या शाळेचे आम्ही विद्यार्थी आहोत. लहानपणापासूनच विश्वनाथ यांना अभ्यासाची फार गोडी होती. तल्लक बुद्धिमत्ता होती. वर्गामध्ये पहिला दुसरा क्रमांक नेहमीच असायचा. घरची परिस्थिती हालाखीची असताना देखील अभ्यासाकडे मात्र त्यांचे बारीक लक्ष असायचे. त्यांचे मूळ गाव परभणी जवळ असणारे शिंगणापूर. परंतु घरची परिस्थिती चांगली नसल्याने आणि वडील लहानपणीच वारले असल्याने शिक्षणासाठी ते मामाकडे राहत असत. तसे पाहिले तर त्यांच्या मामाची परिस्थिती अगदी गरिबीचीच होती.

तो काळीही असा होता की त्यावेळी शिक्षणात कुठल्याही प्रकारच्या फारशा सवलती नव्हत्या. त्यामुळे जे काही करायचे शिक्षणासाठी खर्च करायचा ते स्वतःलाच करावा लागायचा. त्यामुळे त्यांची परिस्थिती खूपच बिकट होती. परंतु हुशारी आणि प्रामाणिकपणा त्यांच्याकडे अगदी पुरेपूर होता. वह्या पुस्तके नसायचे. त्यामुळे त्याचा अभ्यासावर परिणाम व्हायचा परंतु त्यांचं बोलणे आणि मैत्री करणे हे सर्वांना भावायचे. त्यामुळे काही मित्र एकत्र यायचे आणि त्यांना आर्थिक मदत करून वह्या पुस्तकांसाठी सहाय्य करायचे. श्री नाथ हे वर्गात हुशार असल्याने कायमच मॉनिटर असायचे. त्यांच्यामध्ये सहकार्याची भावना पुरेपूर असायची. सर्व मित्रांना ते अतिशय सहकार्य करायचे. मात्र त्यांची मेहनत करण्याची खूप तयारी असायची. अभ्यास शिकत असताना ते काही छोटी-मोठी कामे देखील करायचे. त्यातून मिळणाऱ्या पैशातून ते स्वतःचा खर्च तर भागवायचेच शिवाय कधीकधी आईला देखील आर्थिक मदत म्हणून मनी ऑर्डर करायचे. शाळेच्या अभ्यासामध्ये जर त्यांचा पहिला

क्रमांक होताच याशिवाय शाळेच्या खेळामध्ये देखील त्यांचा सहभाग असायचा. विशेषत: खो–खोच्या टीम मध्ये ते नेहमी हमखास असायचे आणि खेळासदेखील त्यांचे प्राधान्य होते. कधी कधी शाळेमध्ये नाटिका सादर केल्या जायच्या. अशा नाटकांमध्ये देखील त्यांचा सहभाग असायचा. पुढे ते दहावी पास झाल्यानंतर पॉलिटेक्निक साठी औरंगाबादला गेले आणि त्यांचा मार्ग वेगळा झाला. पुढे त्यांनी पॉलिटेक्निक झाल्यानंतर त्याच ठिकाणी काही दिवस लेक्चरर म्हणून नोकरी देखील केली. पुढे मुंबईला एका कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्या ठिकाणी काही दिवस सेवा केल्यानंतर त्यांनी एमपीएससीची परीक्षा दिली आणि ते शासनाच्या जलसंपदा विभागामध्ये सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून रुजू झाले. त्यानंतर जो प्रवास सुरू झाला तो त्यांनी मागे वळून नंतर पाहिलेच नाही.त्यानंतर काही दिवस आमचा संपर्क तुटला होता. परंतु नंतर मोबाईलचा जमाना आल्यानंतर एकमेकांचे मोबाईल नंबर शेअर केले गेले आणि तुटलेला संपर्क पुन्हा सुरू झाला आणि पुन्हा आमचे मैत्री आज पर्यंत कायम टिकून आहे. एकदा जोडलेले नाते कायम टिकवणारा असा हा मित्र सर्वोच्च पदावर विराजमान होण्याचा मान मिळवला आहे त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्याला यापुढील आयुष्यात देखील असेच यश मिळत जावो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्याला चांगले आरोग्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

अन्यायाची चीड असणारा मित्र

श्री. अनिल काकासाहेब देशमुख
कॉन्ट्रॅक्टर, लातूर

छत्रपती संभाजीनगर येथील वाल्मि या संस्थेचे महासंचालक असलेले इंजिनीयर विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे आमचे मित्र आहेत. अतिशय शांत स्वभावाचा माणूस! कोणाचेही मन न दुखवणारा आणि अतिशय संयमाने वागणारा असा हा आमचा मित्र आहे. पण कधी कधी अन्याय झाल्यास मात्र प्रतिकार करण्याची ताकद देखील बाळगतो. ते माझे अतिशय जवळचे मित्र आहेत. सुरुवातीपासून आम्ही अगदी जवळचे मित्र म्हणूनच वागत आलो आहोत. शाळेत असताना अभ्यासामध्ये अतिशय हुशार आणि खिळाडू वृत्तीचा हा माझा मित्र आहे. शाळेत असताना अतिशय बिकट परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले आहे. मात्र जिद्द, मेहनत आणि चिकाटी याच्या जोरावर त्यांनी शाळेमध्ये पहिल्या चार क्रमांकामध्ये नेहमी येण्याचा इरादा कायम ठेवला आणि तो पूर्ण केला. अतिशय मृदू भाषा, शांत स्वभाव ही त्याच्या स्वभावाची वैशिष्ट्ये आहेत. पण त्यांना व्यवहार जमत नाही. माणुसकी आणि माणूस याच्यामध्ये त्यांना फार प्रेम आहे. बऱ्याचदा त्यांच्या या स्वभावाचा अनेकांनी गैरफायदा देखील घेतला. माझा अतिशय आवडता मित्र आहे. अलीकडे त्यांची वाल्मि या संस्थेच्या महासंचालक पदी नियुक्ती झाली आहे. त्यामुळे त्याचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

यापुढे देखील त्याच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा समाजाला व्हावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि मला खात्री आहे की ती अपेक्षा ते पूर्ण करणारच. ते व्यक्तिमत्व सामाजिक, सांस्कृतिक जाणीव असणारे आहे. त्यामुळे जरी ते सेवानिवृत्त झाले तरी आपले कार्य चालूच ठेवतील याची मला खात्री आहे. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो अशी मी प्रार्थना करतो आणि थांबतो.

एक दिलदार मित्र

इंजि.एम.जी.शेख
शाखा अभियंता
जलसंपदा विभाग

डोक्यावरील वडिलांचे छत्र हरवलेला साधा आणि सरळ स्वभावाचा, एका पायात चांदीची बेडी घातलेला, ज्याच्या राहणीमान व देहबोलीवरून ग्रामीण भागातून व अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून आल्याचे स्पष्ट जाणवत असलेला, तितकाच प्रगल्भ बुद्धिमत्तेचा अभियंता विश्वनाथ बाबुराव नाथ यांच्याशी माझी पहिली भेट शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथे स्थापत्य अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात शिकत असताना झाली. आज ते जलसंधारण विभागात महासंचालक या उच्च पदावर विराजमान आहेत. एक वर्गमित्र म्हणून मला त्याचा सार्थ अभिमान आहे.

स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका घेऊन अभियांत्रिकी मधील बेस पक्का करून आलेला असल्यामुळे वर्गात दिलेले ड्रॉईंग व प्रॅक्टिकल मध्ये त्याची आम्हाला नेहमीच मदत होत असे. तो आमची खुल्या दिलाने मदत देखील करीत असे. वर्गातील बरीच मंडळी त्याच्या ड्रॉइंग्स घेऊन जीटी मारत असत. माझ्या मते अभियांत्रिकी मधील विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाचा व कौशल्याचा वापर करून संशोधित केलेले प्रथम तंत्रज्ञान म्हणजे जीटी असेल. मनाने दिलदार व वर्ग मित्रांना मदत करण्यात नेहमीच अग्रेसर असलेला तो आमच्या बॅचचा टॉपरही राहिला आहे. वर्गमित्र या नात्याने इथपर्यंत मी त्याचा एकेरी नावाने उल्लेख करत आहे. तसं मी त्यांना प्रत्यक्षात कधीही एकेरी बोलत नाही.

विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्रमांक दोन नांदेड येथे ते कार्यकारी अभियंता असताना त्यांचे अधिनस्त काम करताना मला त्यांच्यातील शासकीय गतिमानता, निर्णय क्षमता, शासकीय कामाप्रती असलेली कटिबद्धता, कर्तव्यदक्षता अगदी जवळून अनुभवता आली. विभागीय कार्यालयात काम करत असताना मी त्यांच्या मैत्रीचा गैरफायदा घेण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. मैत्रीमुळे त्यांना काही त्रास होणार

नाही याची मी पूर्ण दक्षता घेत असे. प्रशासकीय कामात कधीही मैत्री आडवी येऊ दिली नाही व त्यांनीदेखील सर्वांना सोबत घेऊनच काम केले. त्यांनाही एका वर्ग मित्रासोबत काम केल्याचा आनंद घेता आला.

त्यांच्या या कार्यशैलीमुळे विभागाने जेव्हा राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान या स्पर्धेत भाग घेतला. तेव्हा विष्णुपुरी विभागाला त्यावेळी या अभियानाचा नांदेड जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. या यशाची व कार्याची दखल घेऊन माननीय अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता व कार्यकारी संचालक गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव केला. नांदेड पाटबंधारे मंडळ नांदेड व कार्यकारी संचालक गोदावरी विकास महामंडळ औरंगाबाद यांनी विभागाची पाहणी करण्यासाठी विभागीय कार्यालयास खास भेट दिली तेव्हा त्या घटनेचा आम्हाला विशेष आनंद झाला होता.

आंध्रप्रदेश आताचे तेलंगणा राज्य यांनी बाभळी उच्च पातळी बंधारा तालुका धर्माबाद जिल्हा नांदेड प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात केस दाखल केली होती. सुरुवातीची लढाई लढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नाथ साहेब यांना प्राधिकृत केले होते. त्यांनी यावेळी अक्षरशः अहोरात्र अथक मेहनत व विशेष परिश्रम घेऊन या लढाईला योग्य न्याय दिला आहे. बाभळी बंधारा न्यायालयीन कामासाठी कधी कधी २४ तासात औरंगाबाद वरून रात्री उशिरा नांदेड येथे येऊन आवश्यक ती कागदपत्रांची जमवाजमव करून सकाळी चार वाजता हैदराबादला निघून विमानाने दिल्ली व तेथील न्यायालयीन काम पूर्ण करून परत दिल्लीहून येणे व तेथे औरंगाबाद मार्गे नांदेड ला परत येणे असा थकून टाकणारा प्रवास त्यांनी बऱ्याच वेळा अनुभवला आहे. प्रवासात झालेल्या त्रासाबद्दल व आलेल्या थकव्याबद्दल त्यांनी कधीही आपली

नाराजी कोणासमोरही व्यक्त केली नाही किंवा एवढे सगळे मीच करतो अशी शेखी देखील कधी मिरवली नाही. ते माझे आद्य शासकीय कर्तव्य आहे ही बाब लक्षात ठेवून स्वतःला या कामात झोकून दिले. त्यांची शासकीय कामाप्रती असलेली निष्ठा, कर्तव्य परायणता दर्शवते.

त्यांच्या कार्यकालात विष्णुपुरी प्रकल्प कालव्याची, डेरला योजनेची, किवळा उपसा सिंचन योजना, दिग्रस व बाभळी बंधारा या महत्त्वाच्या प्रकल्प व योजनांचे अंदाजपत्रक, निविदा कार्यवाही पूर्ण करून या कामास सुरुवात देखील करण्यात आली होती.

कौटुंबिक जीवनाबद्दल बोलायचे झाल्यास आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या जमान्यात ते संयुक्त कुटुंबात राहत असून नुसतं एकत्रित कुटुंबच नसून जवळचे बरेच नातलग मुलं-मुली त्यांच्याकडे नेहमीच शिक्षणासाठी राहत असतात. नात्यातील बहिणीच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रवेशासाठी ते स्वतः एकटेच गेले होते याचा मी साक्षीदार आहे. साहेबांचे घर नेहमीच पाहुण्या रावळ्यांनी भरलेले असते. मी क्लास वन अधिकाऱ्याची पत्नी आहे व माझ्या बंगल्यावर मी व माझे कुटुंब, वापरायला सरकारी नोकरांची फौज असायला पाहिजे या अविर्भावात कधीच न राहता येणाऱ्या सर्व गोतावळा हसतमुखाने सांभाळणाऱ्या त्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची हसतमुखाने व्यवस्था करण्यामध्ये धन्यता मानणाऱ्या सौ स्वप्नजा वहिनी सारख्या अर्धांगिनी श्री नाथ साहेबांना लाभल्या असून याबाबतीत ते खरंच भाग्यवान आहेत यात तीळमात्र शंका नाही. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो असे म्हणतात त्याप्रमाणे वहिनी साहेबांमुळे नाथ साहेबांना घरची काही चिंता नसल्यामुळे साहेब आपले शासकीय कर्तव्य चोख व तत्परतेने बजावत आले आहेत. त्यांच्या धडाकेबाज कामाचे श्रेय काही अंशी त्यांच्या धर्मपत्नी यांनासुद्धा जाते. त्यांच्या सेवाभावाचे फलित म्हणून परमेश्वराने त्यांना

त्यांच्या सारख्याच प्रगल्भ व बुद्धिमान कन्या दिल्या असून डोक्यावर मातोश्रीचा वरदहस्त व आशीर्वाद कायम आहे.

परभणी जिल्ह्यातील त्यांचे मूळ गाव शिंगणापूर. आजही त्यांची नाळ गावाशी घट्ट जोडलेली आहे. त्यामुळे ते समाजप्रिय व कुटुंब वत्सल व्यक्ती आहेत हे सप्रमाण सिद्ध होते. ते कलासक्त व्यक्ती आहेत. अभियांत्रिकी वसतिगृहात असताना ते नेहमी सिनेमाचे गाणे गुणगुणत असत. गायकीमध्ये त्यांचा आवाज मधुर व तितकाच दर्दभरा आहे. आवडीचे गाणे म्हणण्यास विनंती केली तर जलसंपदा विभागाच्या होत असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात ते नक्कीच आपलं गाणं सादर करतील. स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील स्नातकोत्तर पर्यंत अर्हता प्राप्त करण्याच्या जीवन प्रवासात केलेला संघर्ष यातून मिळालेले अनुभव व यासाठी मित्रांनी वेळोवेळी दिलेली साथ ते कधीही विसरले नाहीत. आज ते उच्च पदावर असून सुद्धा कामाच्या व्यस्ततेतून देखील मित्रांना वेळ देतात. त्यामुळे मित्रच माझी खरी शक्ती आहेत हे मित्र संग्रहणे बल संपद्यते या उक्तीप्रमाणे विश्वनाथ बाबुराव नाथ हे एक चांगले मित्र, पिता, गायक,व उत्कृष्ट अभियंता आहेत याची पदोपदी प्रचिती येते. त्यांच्या हस्ते बऱ्याच जणांचे भलेच झाले आहे. त्यामुळे त्यांचे भविष्य नक्कीच उज्ज्वल राहणार आहे यात काही शंका नाही. माझ्याकडून त्यांना भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

गोरगरिबांचा कैवारी

इंजि. कैलास ठाकरे
कार्यकारी अभियंता
जलसंसाधरण विभाग

औरंगाबाद येथील वाल्मी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक माननीय नाथ सर यांचेबाबत मनोगत लिहिण्यासाठी विचारणा करणारा श्री विजयजी मोरे यांचा फ़ोन आला. या बाबत मनस्वी खूप आनंद झाला! तसे नाथ सरांबाबत लिहिणे म्हणजे एका खोल पाण्याच्या भागाचा तळ शोधण्यासारखे आहे. तसे त्यांच्या नावातच विश्व सामावले आहे, म्हणून की काय त्यांची जगाशी ओळख म्हणजे विश्वनाथ अशीच आहे. त्यास योगायोग नसावा हे नक्की . अशा ह्या वल्ली बाबत लिहिण्यासाठी खूप विचार न करता सरळ मी लिहित जात आहे. तशी माझी आणि त्यांची ओळख प्रथम आम्ही मुंबई येथील व्हिजेटीआय या संस्थेत आधिव्याख्याता या पदावर मी रुजू झाल्यावर झाली.

आम्ही ग्रामिण भागातून आलेलो असल्याने आपल्या गावाकडील कोणी ओळखीचे आहेत का हे शोधत होतो. पहिल्या सात/ आठ दिवसात कोणीही आपले वाटत नव्हते. दररोज नजर आपल्याकडचे, आपल्या जवळचे कोण दिसते का ते शोधत होती. अशावेळी मला कोणी तरी सांगितले की औरंगाबाद येथील इंजिनियरींग कॉलेजचे एक प्राध्यापक संस्थेत पदवी अभ्यासक्रमासाठी असल्याचे कळले . थोडा तपास केला आणि कळाले की श्री नाथ नावाचे कोणीतरी प्राध्यापक आहेत. त्यानंतर उत्सुकता वाढली आणि त्या उत्सुकतेपोटीच आमची भेट झाली. त्या दिवशी मला थोडं बरे वाटले की आपलं कोणी तरी ह्या प्रचंड महाकाय अशा मुंबईत आहे. मग ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. एकाच भागातून दोघेही आलेले असल्याने मनमोकळे पणाने बोलता येत होते. परंतु हा आनंद काही फार काळ टिकला नाही. कारण त्या नंतर सरांनी १९९६ मध्ये अभियांत्रिकी एमपीएससी परीक्षा दिली. त्यात त्यांनी अभूतपूर्व असे यश संपादन करुन सहाय्यक कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग या उच्च पदी त्यांची निवड झाली . त्या नंतर आम्हाला एकत्र काम

करण्याचा जलसंपदामध्ये योग आला नाही.

आमची जोडी फुटली. तथापि अधून मधून त्यांचेशी बोलणे व्हायचे. मात्र कानावर आलेल्या माहितीनुसार साहेब अत्यंत मेहनतीने जलसंपदा विभागात काम करीत होते. अनेक मोठमोठी आव्हाने त्यांनी शासकीय सेवा बजावत असताना पेलली आहेत. त्या दरम्यान त्यांनी खूप क्लिष्ट असे विषय हाताळले . त्यात त्यांना काही प्रकरणात सुप्रीम कोर्टात शासनाची बाजू मांडण्याचा अनुभव आला असे त्यांच्या बोलण्यातून जाणवले. त्यामुळे त्यांचा कायद्याचा अभ्यास सुद्धा झाला.

मागील काही काळात मी जलसंधारण विभागात कार्यकारी अभियंता असताना सर जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता व व्यवस्थापकीय संचालक असताना त्यांचे मार्गदर्शनात काम करण्याचा योग आला. नाथ सरांनी आपल्या कार्यकाळात सर्व कर्मचारी अधिकारी यांचा समन्वय घालून जास्तीत जास्त कामे केली. त्यांनी नेहमी शेतकरी कष्टकऱ्यांना सरळ फायदा होईल याची काळजी घेतली. सरांनी सामाजिक स्तरावर काम करण्यासाठी सर्व आवश्यक प्रयत्न केले. नाथ सरांनी त्यांचे आयुष्यात नेहमी सर्वांचे भले होईल याची काळजी घेतली. त्यांना पुढील आयुष्यात सर्व सुख मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

समाजकार्यात रमणारा अधिकारी

श्री. मच्छिंद्र चव्हाण
से.नि.सहा.पोलीस आयुक्त
महाराष्ट्र पोलीस

इंजि. विश्वनाथ नाथ हे जलसंपदा व नंतर जलसंधारण आणि आता औरंगाबादच्या वाल्मी या शासकीय संस्थेचे महासंचालक असेलेले प्रशासकीय अधिकारी आहेत. जसे ते प्रशासकीय कामात कार्यत्तपर आणि कुशल समजले जातात तसे ते आमच्या नाथपंथी समाजामध्ये देखील सामाजिक जाणीव असलेले कर्तव्यदक्ष आणि तळमळीचे कार्यकर्ते म्हणून लोकप्रिय आहेत. वास्तविक पहाता गरिबीतून वर आलेली मुले चांगली नोकरी लागली की पैशाच्या मागे लागतात आणि आपली सामाजिक जबाबदारी विसरुन जातात. आपले कुटुंब आणि आपण एवढाच विचार करीत असतात. यापलिकडे त्यांना फारसे आठवत नाही. परंतु याला अपवादही असतात. याचे जीवंत उदाहरण म्हणजे आमचे इंजिनियर विश्‍वनाथ नाथ होय. वास्तविक पहाता भटक्या समाजामध्ये शिक्षणाबद्दल मुळातच अनास्था फार! त्यात मार्गदर्शन करणारे आणि प्रोत्साहन देणारे कोणीच नाही. अशा परिस्थितीमध्ये वडिलांचे छायाछत्र वय अगदी लहान असतानाच हरपलेल्या मुलाची अवस्था काय होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी. इंजिनीयर विश्वनाथ नाथ यांचे वडिलांची छत्रछाया अगदी लहानपणीच हरपलेली होती. मात्र म्हणतात ना की वडील गेले की आईच त्या मुलाचा पिता आणि माता अशा दोन्ही भूमिका वठवत असते. त्याप्रमाणे त्या माऊलीने आपल्या मुलाला शिक्षणाची वाट दाखवली. स्वतः अशिक्षित असताना देखील शिक्षणाचे महत्त्व त्या माऊलीने ओळखले आणि आपल्या मुलाला शिकवले. नुसतेच शिकवले नाही तर एक चांगल्या प्रकारचा अभियंता तयार केला.

आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून नाथ साहेब खूप शिकले आणि शासनाच्या सेवेमध्ये वर्ग एक अधिकारी म्हणून दाखल झाले. नोकरीमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांनी आपली सर्व कर्तव्ये प्रथम पार पाडली. आईची सेवा केली आणि त्यानंतर समाजातल्या मुलांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. त्यांचा सगळ्यात जास्त भर

शिक्षणावर असतो. जर समाजाची प्रगती करायची असेल तर प्रथम शिक्षण हे समाजात तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजे हा विचार त्यांनी प्रत्येक वेळी आपल्या समाजाच्या तरुणांसमोर आणि मुलांसमोर मांडला.

ज्या ज्या ठिकाणी ते प्रमुख पाहुणे अथवा सभांना बैठकांना उपस्थित राहत असत. त्यावेळी ते तरुणांशी संवाद साधत असत आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटवून देत असत. आपल्यासाठी शिक्षणाच्या कोणकोणत्या सोयी उपलब्ध आहेत, त्यानंतर नोकरीसाठी कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत याची बारीक-सारीक माहिती ते मुलांना देत असतात. त्यामुळे मुलांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळत असते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडविले आहे. असा अधिकारी समाजाच्या हिताचे काम करणारा मला मनापासून आवडतो.

श्री नाथ यांनी जे कार्य हाती घेतले आहे ते खरोखरच कौतुकास्पद आहे आणि त्यामुळेच त्यांना समाजातला मार्गदर्शक आणि समाजसेवक असे म्हटले जाते. समाजाचे ते एक भूषण आहेत. समाजासाठी त्यांचे हे योगदान अतिशय मोलाचे आहे आणि त्याचप्रमाणे मार्गदर्शकही आहे. इतर अधिकाऱ्यांसाठी देखील ते एक मार्गदर्शक आहे. केवळ आपल्या पुरतेच न पाहता आपल्या समाजाच्या उद्धारासाठी सुद्धा प्रयत्न केले पाहिजेत असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे वाक्य होते ते त्यांनी तंतोतंत पाळले आहे. त्यामुळे ते एक समाजापुढे दीपस्तंभ ठरले आहेत. अलीकडे त्यांनी आपल्या खात्यामध्ये मिळवलेली ख्याती आणि केलेले काम कौतुकास्पद आहे. शासनाचा पुरस्कार देखील त्यांना मिळालेला आहे ही बाब कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणे आता ज्या पदावर ते कार्यरत आहेत त्या पदाचा समाजासाठी उपयोग व्हावा यासाठी ते

शेतीचे मार्गदर्शन देखील लोकांना करत असतात. शेती हा असा व्यवसाय आहे की तो कधीही न संपणारा आहे. त्यामुळे तरुणांनी फक्त नोकरीच्याच मागे न लागता व्यवसायाकडे आणि शेतीकडे देखील वळावे असा संदेश ते मुलांना देत असतात. सतत समाजाचा विचार करणारे नाथ साहेब यांना नुकतीच पदोन्नती मिळाली आहे त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा देतो. त्यांना दीर्घायु लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

समाजाचा चेहरा

श्री. दिगंबर डवरी
सामाजिक कार्यकर्ते
पुणे

अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ ही एक भटक्या विमुक्तांचे काम करणारी संघटना आहे. या संघटनेचे अवघे देशभर जाळे पसरले असून त्या निमित्ताने अनेक वेळा वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळ्या व्यक्तींशी संपर्क आला. अशा या सामाजिक संपर्कातून मिळालेले एक रत्न म्हणजे आमचे इंजिनीयर विश्वनाथ नाथ हे होत. पहिल्या भेटीतच या व्यक्तिमत्त्वाची छाप माझ्या मनावर पडली. समाजाबद्दल असलेली कणव आणि तळमळ त्यांच्या पहिल्या भेटीनेतूनच माझ्या लक्षात आली. हळूहळू या व्यक्तिमत्त्वाचा परिचय वाढत गेला आणि त्यानंतर असे लक्षात आले की की नाथ साहेब आमच्या नातेसंबंधातील आहेत. आमचे पाहुणेच आहेत असे लक्षात आले.

समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आमच्या अनेक वेळा भेटीगाठी होत असत. या भेटीगाठी दरम्यान त्यांची समाजाविषयी जी तळमळ होती ती वेळोवेळी दिसून येत होती. त्यांच्या बाबतीत आणखी सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे आमच्या नाथपंथी समाजाचे एक मोठे नेते सांगली जिल्ह्यातील जत या ठिकाणी बाळासाहेब जाधव नावाचे हे गृहस्थ होते. ते सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य देखील होते. त्यांचे एक बंधू तहसीलदार होते आणि जत शहरामध्ये एका मुख्य चौकामध्ये एक हॉटेल आहे **आनंद हॉटेल** या नावाने. तर या बाळासाहेब जाधव यांच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला आणि त्यांची दुसरी कन्या माझ्या भावाला देण्यात आलेली होती. अर्थात माझ्या भावाचे लग्न अगोदर झालेले आहे. त्यानंतर नवी मुंबईतील डॉक्टर जे.के.नाथ हे आमच्या समाजाचे मोठे नेते आहेत. त्यांनी हे संबंध जुळून आणले होते.

अतिशय तळागाळातून आणि गरिबीतून शिक्षण घेऊन वर आलेले हे व्यक्तिमत्व असल्यामुळे समाजातील सर्वच लोकांना

यांच्याबद्दल आपुलकी आणि आदर आहे. त्यातूनच त्यांचे हे विवाह जमले. श्री विश्वनाथ नाथ हे व्यक्तिमत्व अतिशय प्रेमळ, सुस्वाभावी आणि समाजाचा विचार करणारे आहे. प्रथम वर्ग अधिकारी असून कामाचा सतत ताण असताना देखील वेळात वेळ काढून समाजासाठी ते कुठल्याही सभेसाठी किंवा बैठकीसाठी आवर्जून उपस्थित असतात. समाजाला इतका वेळ देणारा हा एकमेव अधिकारी असावा असा माझा विश्वास आहे. समाजाविषयीची ही जाणीव सर्वांच्याच लक्षात येणारी आणि मनात भरणारी आहे.

आपल्या समाजातील गोरगरिब मुलांनी शिक्षण घ्यावं आणि पुढे जावे यावर त्यांचा भर आहे. आपल्या प्रत्येक कृतीतून, भाषणातून आणि मदतीतून ते हे सिद्ध करत असतात की आपल्या समाजातील मुलांनी शिकलं पाहिजे. शिक्षण हाच पुढे जाण्याचा आणि सुधारण्याचा मार्ग आहे हे मुलांना ते पटवून देत असतात. श्री नाथ यांनी अगदी लहानपणापासून गरिबीचे चटके सहन केल्यामुळे त्यांना प्रत्येक गोष्टीची जाणीव आहे. त्यांची आई एक महान स्त्री आहे. एक आदर्श माता आहे. घरात शिक्षणाचा गंध नव्हता तरी पतीच्या निधनानंतर त्यांनी आपल्या मुलांचा सांभाळ अतिशय चांगल्या पद्धतीने केला आहे. त्यांच्यावर चांगल्या प्रकारचे संस्कार केले आणि शिक्षणाची कास सोडू दिली नाही. त्यामुळे आज हे उत्तुंग व्यक्तिमत्व घडले आहे. ही त्यांच्या आईचीच कृपा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे साहेब आजही आपल्या आईला देवी समान मानतात. त्यांचा प्रत्येक शब्द झेलण्यासाठी ते तत्पर असतात. आईचा शब्द आज प्रमाण मानतात. त्यामुळे ते एक उत्तम मातृभक्त आहेत.

श्री नाथ साहेब ज्या ज्या ठिकाणी सामाजिक बैठकी किंवा कार्यक्रमासाठी जातात ते समाजातील तरुण आणि विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे अलीकडे समाज

जागृती मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. अनेकांना त्यांनी शिक्षणासाठी मदत केली. शिक्षणात कोणत्या मार्गाने गेल्यास आपल्याला लवकर यश मिळेल आणि आपली, आपल्या कुटुंबाची सुधारणा होईल यासाठी ते अतिशय पोट तिडकीने आणि आपुलकीने मार्गदर्शन करत असतात. यासाठी त्यांनी तन–मन–धनाने सर्वांना मदत केली आहे . आपल्या स्वतःच्या जीवनामध्ये अत्यंत मोठ्या पदावर काम करत असल्यामुळे त्यांना वेळ देणे जमत नसले तरीसुद्धा आपली जबाबदारी आहे, आपले कर्तव्य समजून ते प्रत्येक वेळी अशा कार्यक्रमांना जाणीवपूर्वक हजर असतात आणि समाजातील तरुणांना मार्गदर्शन करत असतात.

या सर्वात शिक्षणावर त्यांचा सर्वात जास्त भर असतो. विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक क्षेत्र निवडताना कोणते क्षेत्र निवडावे? कोणत्या क्षेत्रामध्ये काय अडचणी आहेत हे सर्व ते अगदी समजावून सांगत असतात. त्यामुळे एक ज्येष्ठ समाजसेवकाची भूमिका ते अतिशय चांगल्या पद्धतीने साकार करीत आहेत. त्यामुळे ते आमच्या समाजाचे भूषण आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांना पाहिलं किंवा त्यांना ऐकलं की तरुणांमध्ये एक प्रकारची ऊर्जा जागृत होते आणि त्यांना एक वेगळ्या प्रकारची प्रेरणा मिळत असते. हेच त्यांच्या कार्याचे यश आहे असे मला वाटते. शिक्षण याबरोबरच शेती व्यवसाय देखील त्यांना आवडतो. त्यासाठी ते अतिशय चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन करतात. शेती कशी करता येईल आणि त्यातून कमी खर्चात आधुनिक पद्धतीने शेती करून उत्पन्न कसे वाढवता येईल यासाठी ते मार्गदर्शन करतात. परंतु त्यात काही अडचणी असतील तर त्याही सोडवण्यासाठी शासकीय माध्यमातून प्रयत्न करत असतात.

ते महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण खात्यामध्ये वरिष्ठ पातळीवर अधिकारी म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांना या सर्व

गोष्टीची जाणीव आहे, माहिती आहे आणि त्याचा लाभ समाजातील लोकांनी घेतला पाहिजे याची तळमळ त्यांना नेहमीच असते. त्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांचा हात नेहमीच पुढे असतो.

श्री नाथ साहेब आपल्या बिझी शेड्यूलमधून वेळात वेळ काढून त्यांना जे जे शक्य वाटते तेथे अगदी मनापासून करत आले आहेत. त्यामुळे सातत्याने त्यांचे काम चालू असते. कामाचा ताण असला किंवा काही घरगुती अडचणी असतील तर त्यावर ते कधीही भाष्य न करता आपले कर्तव्य समजून ते समाजाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहत असतात आणि मार्गदर्शन करत असतात. त्यामुळे एक समाजाचा मार्गदर्शक म्हणून आम्हाला खूप अभिमान आहे.

आता अलिकडेच त्यांना वाल्मि या शासकीय संस्थेच्या महासंचालक पदी बढती मिळाली आहे याचाी आम्हाला अतिशय आनंदाची अशी बातमी क़ळली आहे. त्यामुळे आम्हा सर्व समाज बांधवांना अतिशय आनंद झाला असून त्यांना या कामांमध्ये यश मिळो आणि त्यांची अशीच उतरोत्तर प्रगती होत राहो अशी मी शुभेच्छा त्यांना व्यक्त करतो,

माझ्यावतीने आणि समाजाच्या वतीने मी त्यांना अनंत शुभेच्छा देतो आणि त्यांना समाजाची सेवा करण्यासाठी दीर्घायुष्य लाभो अशी शुभेच्छा देतो. त्यांचं एक महत्त्वाचं वाक्य ठिकाणी मला व्यक्त करावसं वाटतं की **आपल्या समाजातील लोकांनी रडत राहण्यापेक्षा इच्छाशक्तीच्या जोरावर लढत राहण्यावर भर दिला पाहिजे त्यातून आपण तयार झाले पाहिजे.** हे त्यांचे प्रेरणादायी वाक्य अतिशय महत्त्वाचे असे मला वाटते. पुन्हा एकदा त्यांच्या यशासाठी दीर्घायुषासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

कृष्णसखा

इंजि. आनंद शेजूळ
व्यावसायिक बिल्डर
(वर्गमित्र)

दु:ख अडवायला उंबऱ्यासारखा नव्हे तर पहाडासारखा मित्र, वनव्यामध्ये अगदी गारव्यासारखा मित्र, असा विशू हा एकमेव मित्र आहेच मुळी असा. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा आणि जलसंधारण खात्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारा महासंचालक पदापर्यंत पोहचलेला आमचा मित्र विश्वनाथ नाथ! लहानपणी आम्ही सारे वर्गमित्र त्याला प्रेमाने विशू म्हणत असू. असा हा आमचा विशू प्रत्येकाच्या अडीअडचणीला सुखदु:खाला आपल्या पदाच्या प्रतिष्ठेची परवा न करता आम्हा मित्रांसाठी तसेच समाजातील दीन दुबळ्यांसाठी हाकेला धावून जाणारा असा हा आमचा मित्र! आमच्या सर्वांचा लाडका विशू !

तसे पाहिले तर आम्हा सुदाम्यासारख्या मित्रांचा कृष्ण सखा असतो. सुदामा पोहे तरी घेऊन गेला होता. आम्हा मित्रांकडून ती सुद्धा अपेक्षा न ठेवता भरभरून देणारा असा आमचा मित्र कृष्ण सखा विशू आहे. वर्णन करायला आणि महती सांगायला शब्द कमी पडावेत असे हे श्रेष्ठ कर्तृत्ववान व्यक्तिमत्व आहे. अगदी छोट्या खेड्यातून येऊन अत्यंत गरिबीतून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेऊन आणि खडतर परिस्थितीतून मार्ग काढत महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण खात्यातील सर्वोच्च पदापर्यंत तो पोहोचला आहे. ही गोष्ट त्यावेळेच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करता अगदी शक्यच नव्हती. ती अशक्य कोटीतील गोष्ट फक्त दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर आणि प्रचंड मेहनतीच्या जोरावर माझ्या या मित्राने शक्य करून दाखवली आहे.

सरकारी खात्यामध्ये येणाऱ्या लाल फितीच्या नियमांमधून वावरताना व काम करताना विशूला खूप त्रास सहन करावा लागला. परंतु शाळा कॉलेजमध्ये असल्यापासून प्रत्येक प्रॉब्लेमचे सोल्युशन शोधून काढायची सवय त्याला त्यामुळे लागलेली होती. त्यामुळे

आयुष्यात आलेल्या प्रत्येक समस्येचे उत्तर हा मित्र मिळवतोच. मला आठवते आम्ही कॉलेजमध्ये बरोबर असताना संत तुकाराम मुलांचे शासकीय वस्तीगृह औरंगाबाद येथे वास्तव्य करत असताना आम्ही सर्व मित्र एकत्र अभ्यास करीत असू. शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवसांमध्ये प्रोजेक्ट, ड्राइंग असाइनमेंट, थियरी वर्क असो आमचा मोठा ग्रुप एकत्र जमून आम्ही ते सर्व एकत्रच काम करत असू. म्हणजे सांगण्याचा अर्थ असा की विशूला टीम एकत्र करून वर्क करून घेण्याची हातोटी त्यावेळेस अवगत झालेली होती. त्याच अनुभवावर तो आयुष्यभर सरकारी डिपार्टमेंटमधील खात्यामध्ये वावरताना सहकार्याकडून यशस्वीरित्या काम करून घेणे त्याला सहज शक्य झालं.

कॉलेजमध्ये असताना आम्हा सर्व मित्रांची आर्थिक परिस्थिती जवळजवळ सारखीच म्हणजे अगदी हलाकीचीच होती. मग आमची पार्टी म्हणजे चहाची मेजवानी! मग मधल्या सुट्टीतील वेळ आम्ही चाय पार्टी देणारा मित्र फायनल झाला की आमची स्वारी निघायची उस्मानपुरातल्या कॉर्नरवर असलेल्या त्या वेळच्या गो.टी. म्हणजेच गोपाल टी हाऊसच्या दिशेने. अगदी त्यावेळी सुद्धा आमच्या चाय पे चर्चा व्हायच्या आणि चाय पार्टीचा आनंद घेऊन उद्याचा पार्टनर ठरवून आमची मीटिंग संपत असे. असे अनेकदा घडत असे. यातून मैत्री घट्ट होत गेली आणि आनंद वाढत गेला . विशू वर्गात अगदी कमी बोलणारा, लाजरा तरीही लेक्चरर म्हणजेच गुरुजन आणि मित्रमंडळी या सर्वांचा लाडकाच होता. सर्वजण त्याच्यावर खूप मनापासून प्रेम करायचे. अर्थातच तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि प्रचंड मेहनती असल्यामुळे सर्व प्रॉब्लेम तो अगदी सहज सोडवायचा आणि आमच्याही न सुटणाऱ्या प्रॉब्लेमचे सोल्युशन तो आम्हाला सांगायचा. अगदी फाईनचा प्रोजेक्टला सुद्धा विशू प्रत्येक गोष्टीत टीम लिडरच असायचा व प्रत्येक ॲक्टिव्हिटीमध्ये हिरीरीने भाग घेऊन ती पूर्ण करायचा.

कॉलेज नंतर मधल्या काळामध्ये अगदी कुंभ के मेले में बिछडल्यागत आम्ही वेगवेगळे झालो होतो. संसारातील, सामाजिक व व्यावसायिक जबाबदाऱ्या प्रत्येकावर येऊन पडल्या होत्या. तरी देखील आमच्यामधील रेशमी बंध मात्र सैल झाले नाहीत. मधल्या काळात संपर्काची साधने उपलब्ध नसली तरी आमच्या मित्रांचे कर्तृत्व झाकलेले नव्हते. मग ते बाभळीच्या वादग्रस्त डॅमचे काम पूर्ण करणे असो किंवा इतर लहान मोठे प्रोजेक्ट तयार करणे असो. वर्तमानपत्रातील मुख्य मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांबरोबर पाणी दौरा असो. त्याचे छायाचित्र असो किंवा महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट अभियंता पुरस्कार असो विशूचे कर्तृत्व सतत निखारत राहिले. शब्द खरोखरच कमी पडत आहेत. माझ्या मित्रांच्या कर्तृत्वाचे वर्णन करताना शेवटी मी असेच म्हणेन की परमेश्वर माझ्या मित्राला सुदृढ तब्येत व उदंड आयुष्य देवो. पृथ्वीतलावर पाठवलेल्या या माझ्या मित्राला देवदूतांकडून अशीच जनहिताची कामे यशस्वीरित्या पार पाडण्याचे आयुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो. गॉड ब्लेस हीम!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

नाथ साहेब एक उत्तम समाजसेवक

श्री. प्रकाश इंगोले
पंढरपूर,जि.सोलापूर

महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद येथील वाल्मी या संस्थेचे महासंचालक इंजिनियर विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे एक उच्चशिक्षित आणि चांगल्या विचाराचे व्यक्तिमत्व आहे. आपल्या शासन सेवेतील कालावधीमध्ये त्यांनी केलेले कार्य अतिशय वाखण्याजोगे आहे. अतिशय सर्वसामान्य परिस्थितीमध्ये जन्म घेऊन त्यातून शिक्षण घेऊन महासंचालक पदापर्यंत पोहोचेपर्यंत त्यांचा जो प्रवास झाला आहे तो अतिशय खडतर आणि संघर्षाचा असणार यात प्रश्नच उद्भवत नाही. कारण ज्या समाजामध्ये केवळ पारंपारिक पद्धतीने जगण्याची रीत आहे त्या समाजामध्ये शिक्षणाची आवड निर्माण होणे आणि त्या पद्धतीने संघर्ष करीत परिस्थितीशी संघर्ष करीत जगणे अतिशय अवघड बाब आहे. तरी देखील श्री नाथ साहेब यांनी अतिशय बिकट परिस्थितीचा सामना करीत आपले शिक्षण पूर्ण केले त्यातून त्यांची जिद्द आणि चिकाटी दिसून येते.

त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये देखील आपला ठसा उमटून आपले कर्तुत्व सिद्ध केले. शासकीय सेवेत असताना जनहिताच्या योजना राबवून त्यांनी शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य केले. केवळ शासकीय कर्तव्य बजावूनच ते थांबले नाहीत तर आपल्या समाजाकडे देखील त्यांनी तितकेच लक्ष दिले आहे. असे म्हणतात की जन्मताच माणसाच्या डोक्यावर तीन प्रकारचे ऋण असतात. पहिले ऋण म्हणजे आई-वडिलांचे ऋण! श्री नाथ साहेब यांनी ते ऋण केव्हाच फेडले आहे. त्यांचे वडील तर लहानपणीच वारले होते परंतु आईने त्यांचा अतिशय चांगल्या पद्धतीने सांभाळ केला आणि शिक्षण देऊन एक मोठा अधिकारी घडवला. या बदल्यात साहेबांनी आईचे ऋण शेवटपर्यंत विसरले नाहीत. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत आई त्यांच्या सोबतच होती. आईला ते अक्षरश: देवताच मानत असत. त्यानंतर दुसरे ऋण असते ते म्हणजे जन्मभूमीचे! ज्या जन्मभूमीत आपण जन्म घेतो त्या भूमीचे उपकार आपल्यावर असतात

आणि त्याची परतफेड करावी लागते. त्याप्रमाणे त्यांनी त्यांची जन्मभूमी असलेल्या मराठवाडा आणि परभणी या भागामध्ये त्यांनी आपल्या सेवेच्या माध्यमातून फार मोठे योगदान दिले आहे. मराठवाड्याची भाग्यरेषा ठरलेल्या गोदावरी नदीवर जे बॅरेजेस बांधण्यात आले आहेत त्यातील त्यांचे योगदान कोणी नाकारू शकत नाही. विशेष करून महाराष्ट्र आंध्र प्रदेशाच्या सीमेवर असणाऱ्या बाभळी बंधाऱ्याबाबत त्यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे हे अवघ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे. त्याचप्रमाणे तिसरे ऋण उपकार असतात ते म्हणजे समाजाचे! समाजासाठी आपली बांधिलकी मान्य करून त्यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन आपल्या बांधवांना केलेले आहे.

वास्तविक पाहता आपण पाहतो की एखादा गरीब घरातील मुलगा सरकारी नोकरी लागला चांगला पगार मिळू लागला तर तो आपले कुटुंब म्हणजे पत्नी, मुले यांच्या पुरताच मर्यादित राहातो. स्वतःच्या आई-वडिलांना देखील विसरून जातो. मग समाज तर दूरच राहतो. परंतु श्री नाथ साहेब यांच्या बाबतीत अभिमानाने सांगावीशी वाटणारी गोष्ट आहे ती म्हणजे त्यांनी या तिन्ही प्रकारच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न चांगल्या पद्धतीने केला आहे. सुरुवातीला त्यांनी आईची सेवा एखाद्या देवतेप्रमाणे केली. तिथेच आई-वडिलांचे पांग फिटले. त्यानंतर त्यांनी आपल्या मातृभूमीची जन्मभूमीची सेवा शासकीय सेवेत जलसंपदा खात्यात, जलसंधारण खात्यात सेवा करीत असताना शेतकऱ्यांसाठी पाण्याची सोय करून जन्मभूमीच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला आहे तर समाजातील उच्चशिक्षित तरुण आहेत त्यांनी कशाप्रकारे आयुष्यात पुढे यायला पाहिजे, त्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत, त्यासाठी त्यांना कोणत्या अडचणी आहेत, त्या अडचणी कशाप्रकारे मार्ग काढला पाहिजे याचे मार्गदर्शन ते अतिशय पोट तिडकीने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने

करीत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन अनेक तरुण शासकीय सेवेमध्ये जॉईन झाले आहेत. त्याचप्रमाणे काहींनी उद्योगाची कास धरली आहे. काहीजण व्यापारामध्ये देखील निपुण झाले आहेत. या सामाजिक जाणिवेची तीव्रता त्यांच्यामध्ये ठासून भरली आहे. त्यामुळे ज्या ज्या वेळी समाजाच्या कार्यक्रमास त्यांना निमंत्रित करण्यात येते त्यावेळी ते आवर्जून जातात आणि नव्या पिढीला मदत करीत असतात. एखाद्या समाजातील व्यक्ती थोडासा पुढे गेला की सर्व समाजातील आडल्या नडलेल्यांना तोच एक आशेचा किरण वाटत असतो. त्यामुळे मदत करणारा एक आणि मदत मागणारे हजार अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते. तशीच परिस्थिती श्रीनाथ साहेब यांच्या बाबतीत घडली आहे. परंतु त्यांच्याकडे जाणारा याचक कधीही निराश होऊन परतत नाही. त्यांना अपेक्षित असणारी मदत नाही मिळाली तरी योग्य मार्गदर्शन मिळालेले आहे. त्यामुळे नाथ साहेब हे केवळ एक अधिकारीच नाहीत तर ते एक उत्तम प्रकारचे समाजसेवक आहेत आणि सामाजिक बांधिलकी हा त्यांचा श्वास आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृतीमध्ये विचारांमध्ये सामाजिक बांधिलकीची वीण दिसून येते. गेली अनेक वर्षे त्यांनी शासकीय सेवेत असताना समाजातील गोरगरीब मुलांना कुटुंबांना शक्य तेवढी मदत केली आहे. परंतु देता देता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे असे म्हणतात त्या पद्धतीने आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण तयार झाले आहेत. त्यांनी देखील नाथ साहेबांच्या विचारांचा कित्ता गिरवला पाहिजे असे मला वाटते. नाथ साहेबांसारखी माणसे समाजात फार थोडी असतात. त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. त्यांच्या विचाराची आणि आचाराची दिशा समाजाला दिली पाहिजे. काही दिवसात नाथ साहेब शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत त्यांना पुढील आयुष्यासाठी मी माझ्या कुटुंबातर्फे आणि समाजातर्फे त्यांना खूप शुभेच्छा देतो धन्यवाद.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

तेरे जैसा यार कहाँ...

शेख महंमद अलीम
परळी वैजनाथ, बीड
वर्गमित्र

इंजिनीयर विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे शासकीय सेवेतील महासंचालक पदावर असलेले नाव आहे. सुपर क्लास वन अधिकारी! परंतु ते आमच्यासाठी आजही मानवत च्या सुभाष चंद्र बोस विद्यालयातील वर्गमित्रच आहेत. मी शेख महंमद अलीम त्यांचा वर्गमित्र. विश्वनाथ बाबुनाथ नाथ हे त्यांचे शाळेच्या रेकॉर्डवरचे नाव आहे परंतु आम्ही शालेय जीवनात असताना सर्व मित्रमंडळी त्यांना विश्वनाथ जोगी. या नावाने ओळखत असू. आज ते जरी सुपर क्लास वन अधिकारी असले तरी आजही ते आमच्यासाठी आमचा जिवाभावाचा मित्र विश्वनाथ हेच आहेत. विद्यार्थी दशेत असताना अतिशय हुशार आणि होतकरू विद्यार्थी होते. शालेय जीवनात त्याने वर्गातील वर्ग मित्रांबरोबर कधीही भांडण तंटा केला नाही किंवा कधी हमरी तुमरी केली नाही. अतिशय शांत स्वभाव आणि आत्म सहासी होता. आर्थिक परिस्थिती गरिबीची होती पण त्याने त्या परिस्थितीचा सामना आपल्या हुशारीने आणि कर्तबगारीने करून त्यावर मात करीत पुढील वाटचाल चालू ठेवली.

तो मानवत येथील क्रांती चौकात एका अतिशय लहानशा घरात आपल्या मामाच्या कुटुंबाबरोबर राहत होता. ते घर आजही त्या ठिकाणी आहे. वर्ग मित्राबरोबर तो कधीकधी खेळाच्या तासात किंवा शालेय क्रीडा स्पर्धेत आमच्या सोबत खो-खो, क्रिकेट, हॉलीबॉल या खेळत असे. विद्यार्थी जीवनात त्याने अतिशय गरीब परिस्थितीत दिवस काढले असले तरी मेहनत आणि कर्तबगारीच्या जीवावर त्याने आपले शिक्षण पूर्ण केले आहे. शालेय जीवनात शाळेच्या मधल्या सुट्टीमध्ये तो गोळ्या संत्र्याच्या गोळ्या विकण्याचे काम करीत असे. शाळेत वर्गात बसल्यानंतर तो गोळ्यांची पिशवी सोबत ठेवत असे आणि मधली सुट्टी झाली की गोळ्या विकून चार पैसे कसे कमवता येईल याचा विचार करीत असे. त्यामुळे स्वावलंबन आणि कष्ट याची सवय त्याला अगदी लहान वयातच लागली होती. त्यानंतर त्याने

दहावीनंतर त्याने पॉलिटेक्निकला औरंगाबाद येथे प्रवेश घेतला आणि त्या ठिकाणी पुढे त्यांनी पदवी संपादन करुन त्या ठिकाणी करून प्राध्यापकाची नोकरी देखील केली . पुढे काही दिवस मुंबईमध्ये प्राध्यापकाची नोकरी केली आणि शासनाच्या जलसंपदा खात्यामध्ये कार्यकारी अभियंता म्हणून रुजू झाला. याचा आम्हाला खूप अभिमान आहे. सध्या त्यांचा मुक्काम नांदेड येथे आहे.

नांदेड येथे असताना एक आमचा दुसरा एक वर्गमित्र आहे त्याची बायपासची शस्त्रक्रिया झाली होती. त्याला हे कळल्यावर त्यांनी त्याची दवाखान्यात भेट घेतली आणि त्याला आर्थिक मदत केली. आमची दुसरी एक वर्ग मैत्रीण होती. तिच्या मुलाला अमेरिकेत शिक्षणासाठी एज्युकेशन लोनची गरज होती. त्याला कळल्यानंतर त्याने थेट तेथील बँक मॅनेजरशी संवाद साधला आणि ताबडतोब एज्युकेशन लोन मंजूर करून दिले आणि त्याने सर्व वर्गमित्रांना सांगितले आहे की तुमच्या मुलांना जर शिक्षणासाठी काही मदतीची आवश्यकता असेल तर मी ती सदैव तुमच्या मदतीसाठी हात लावायला तयार आहे. आणखी एक घटना. जानेवारी २०१९ वर्षी आम्ही गेट–टुगेदर च्या तयारीसाठी त्यांच्या भेटीसाठी औरंगाबाद येथे माझ्या एका दुसऱ्या मित्राबरोबर गेलो होतो. त्यांच्या कार्यालयात गेलो. सन२०१३ पासून आम्ही दरवर्षी जानेवारी महिन्यात गेट–टुगेदर ठेवत असतो. औरंगाबादला झालेल्या गेट–टुगेदर हा नाथ यांच्यातर्फे करण्यात आले होते.

आम्ही दोघे त्यांच्या भेटीसाठी गेलो असता त्याने चहापानानंतर तेथील एका अधिकाऱ्याला बोलावून आम्हा तिघांचा फोटो घेतला व तेथील कर्मचाऱ्यांना सांगितले की हे माझे बालपणीचे वर्गमित्र आहेत. आमचा एक तिसरा मित्र रेल्वेने औरंगाबादला येत होता. तो व्यवसायाने शेतकरी होता. आम्ही त्याला आणायला सांगितले. आपला परमेश्वर आहे तो मागच्या गाडीने येत आहे त्याने

कार्यालयीन कामे आटोपून आम्हा दोघांना बरोबर घेऊन रेल्वे स्टेशनला त्याला घेण्यासाठी आला. तो मित्र आम्हा दोघांसोबत नाथला बघून एवढा खुश झाला की विचारता सोय नाही. तो म्हणाला मला न्यायला स्वतः इंजिनियर विश्वनाथ आले आहेत. आम्ही सर्व मित्रमंडळीत २०१३ च्या गेट–टुगेदर नंतर दरवर्षी येणाऱ्या प्रत्येक गेट टुगेदरला भेटत असतो. सर्व एकमेकांच्या मुलांच्या मुलींच्या लग्न कार्यात किंवा इतर काही कार्यक्रमात वेळेनुसार भेटत असतो. सर्व खेळीमेळीच्या वातावरणात शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देत असतो. आमच्या शाळेचे नाव नेताजी सुभाषचंद्र बोस असून मानवत येथील परभणी जिल्ह्यात आहे. त्यानुसार आम्ही शालेय मित्रांचा एक ग्रुप तयार केला आहे. त्या ग्रुपला **एनएसव्ही १९८४** असे नाव दिले आहे. हे ग्रुप तयार करण्याचे श्रेय आमचे वर्गमित्र प्रवीण सोनी, गणेश पाटील, बद्रीनाथ लाहोटी, बबन राऊत, अनुजा डावरे, अनिता बोरबने यांना जाते. यांनी सर्व मित्रांना भेटीगाठी व फोनद्वारे एकमेकांच्या संपर्कातील मित्रांच्या साह्याने सर्व मित्रांना एकमेकांशी संपर्कात आणले ही खूप मोठी गोष्ट आहे ना.

दहावी पास झाल्यानंतर श्री नाथ पॉलिटेक्निक कॉलेजला औरंगाबाद प्रवेश घेतला. त्यानंतर औरंगाबाद येथे पदवी देखील घेतली आणि काही दिवस तिथे प्राध्यापकाची नोकरी देखील केली. त्यानंतर पुढे मुंबईला जाऊन देखील काही दिवस प्राध्यापकाची नोकरी केली आणि शेवटी एमपीएससीची परीक्षा देऊन ते जलसंपदा खात्यामध्ये कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत राहिला. त्यांची शासकीय सेवेतील गुणवत्ता आणि कार्यपद्धती ते देखील तितकीच प्रभावी आणि नाविन्यपूर्ण राहिली आहे. याची शासनाने देखील दखल घेतली आहे. पुढे काही दिवसांनी मंत्रालयात देखील काम केले आणि आज शेवटी ते औरंगाबादच्या वाल्मी या संस्थेमध्ये महासंचालक पदावर आरुढ होऊन आपल्या बुध्दीमत्तेचा प्रभाव दाखवित आहेत.

कष्ट, मेहनत आणि जिद्द हे त्यांचे अंगभूत गुण आहेत. या गुणांच्या बळावरच त्यांनी आपली कारकिर्द पुर्ण केली आहे. येत्या काही दिवसात ते सेवानिवृत्त होणार आहेत. या सेवानिवृतीनंतरही ते आपल्या बुध्दीचा वापर गोरगरिबांच्या सेवेसाठी करतील याची आम्हाला खात्री आहे. त्याला आमच्या मित्रांतर्फे आणि माझ्या कुटुंबातर्फे हार्दिक शुभेच्छा!

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

दयाळू धन

श्री. संजय दत्तात्रय बंडे
उपअभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
परभणी

विश्वनाथचं मूळ गाव परभणी तालुक्यातील शिंगणापूर! वडील बहुतेक विश्वनाथच्या लहानपणीच गुजरल्यामुळे तो मानवत येथे मामाकडे राहायचा. वडिलांची बदली झालेमुळे कंधारहून आठवीत असताना आम्ही मानवतला आलो. नेताजी सुभाष विद्यालयात प्रवेश घेतला. शाळा एकदम चांगली. महाराष्ट्रात दहावीच्या मेरिट लिस्ट मध्ये किमान दोन तरी विद्यार्थी असणारच. शाळा जुन्या किरायाच्या जागेतून नुकतीच प्रशस्त अश्या गावा बाहेरील ५ एकर परिसरात स्थलातरील झालेली. शाळा खोल्यांचं बांधकाम अपूर्ण, पोकळ सिमेंट विटाचे ढीग जागोजागी जमा करून ठेवलेलं. कुणी तरी सांगितलं की विटा तयार करण्याचं काम शिक्षक व विद्यार्थी मिळून स्वतः करतात. माझ्या सारख्या १४ वर्ष वयाच्या मुलाचे बाल सुलभ मनावर या गोष्टीचा आदर्श आज देखील जशाचा तसा कोरलेला आहे.

अश्यातच आठवीचे पहिले सत्र संपले. मी अ वर्गात होतो. ब वर्गातून एक मुलगा पहिला आला असून अत्यंत गरीब आहे. शाळेत गोळ्या विकतो. पाहा जरा शिकां काही तरी त्याचे कडून. अभ्यास करीत नाहीत, नुसता धिंगाणा करता, काही खरं नाही तुमचं, दोन वर्षांनी दाखवीत जाल, मग कसं होईल? पवार सरांनी त्याच्या धमाकेदार शैलीत एका हिंदीचे तासात सुनावलं.

स्काऊट गाईड मधील मखरी कमाई अभियान माहित होतं पण कोणीतरी आपला सहपाठी अशी खरी कमाई करतो आहे हे खरं वाटलं नाही. म्हणून दुपारच्या सुटीत विद्यार्थ्यांचे गर्दीत वाट काढीत विश्वनाथला शोधलं. किरकोळ शरीर यष्टी, काळा सावळा रंग, धारदार नाक, खाकी हाफ पँट, पांढरा शर्ट, पायात चप्पल नाही, कड्क विशिष्ट पद्धतीचा आवाज... शब्द ऐकू आले ...चार आणेचे पाच,

आज जरी विश्वनाथ असं म्हणत असलो तरी आम्ही सर्व विद्यार्थी त्याला बालपणी जोगी असंच म्हणायचो,

जोगी बरोबर नंतर मैत्री झाली तो पांचाळ सराचे जवळ लाड गल्लीत रहायचा. आम्ही पेठ मोहल्याकडून यायचो, नाटकेश्वरा जवळून तळ्याचे काठाने जाताना भेट व्हायची. एकदा मुद्दामच वाट वाकडी करून विश्वनाथ राहात असलेल्या मामाचे घराकडेही गेलो. कमी उंचीची पत्र्याची खोली. त्यातच स्वयंपाक करण्यासाठी जागा असं ते चित्र. कुतूहल म्हणून विश्वनाथची भिक्षा मागण्यासाठी वापरत असलेली झोळी देखील मी पाहिली. पुन्हा एकदा स्तिमित झालो. असं ही आपल्या मित्राकडे असतं, वाईट वाटलं.

नंतर दहावी झाली. मी शासकीय तंत्र निकेतन नांदेड मध्ये सिव्हिल शाखेत प्रवेश घेतला. विश्वनाथने देखील तेव्हाच्या औरंगाबाद येथील शासकीय तंत्र निकेतन सिव्हिल शाखेत प्रवेश घेतला. मला तेव्हा मला कळलं की त्याच्या शिक्षणाचा खर्च मानवत येथील आमचे मित्र दिलीप लाड यांचे बंधू हे करीत आहेत. कुतूहल आणि बाल सुलभ काळजी म्हणून कॉलेजचे प्रॅक्टिकल निम्मित औरंगाबाद येथे गेलो. विश्वनाथची भेट घेतली. त्याचा रूम पार्टनर दिलीप लाड व माझा एक मित्र यांनी सोबत जेवण केलं. रात्री सेकंड शो मध्ये बहुतेक बागवान चित्रपट पहिला. रूम वर मुक्काम केला. महत्वाचे म्हणजे नको नको म्हणूनही आमचा सर्व खर्च आमच्या या सुदामा मित्र विश्वनाथने केला. कसा केला ? कुठून केला माहित नाही. परंतु त्याचे हे अगत्य आजही मनात घर करून आहे.

असा हा आमचा प्रिय मित्र एमपीएससी झाला. सिंचन खात्यातील जवळपास सर्व पदे उपभोगली. मध्यंतरीचे काळात आमची फार भेट होत नसे. परंतु मला खात्री आहे विश्वनाथला पदाचा गर्व कधी शिवला नाही. त्यानं त्याला भेटणाऱ्या गरजूची मदतच केली असेल.

असा हा आमचा परम प्रिय मित्र सेवा निवृत होत आहे. विश्वनाथ किती

ही मोठा झाला तरी तो आमच्यासाठी आमचा जोगीच आहे. तो परभणीला येण्याची आमचे बाल मित्र डॉ प्रवीण संगवे, गोविंद जवादे, बद्रि लाहोटी, गणेश पाटील, अनुजा पालेकर, गंगाधर हर्गुडे मामा आम्ही सारे वाट पाहत आहोत, म्हणजे सूनहरी यादे चा एक कार्यक्रम करायचा आहे.

असो, असे आधिकरी प्रशासनात अभावानेच आढळतात. एका कनवाळू तरीही कर्तव्यदक्ष, सह्रदयी, नेहमी जमिनीवर वावरणारा, अधिकाऱ्याची नेमाने येणारी ही सेवा निवृती हितेशी मित्र, अधिकारी, कर्मचारी, त्यांचे संपर्कात आलेले सामान्य नागरिक, शेतकरी यांना चटका लावणारी आहे. या निमित्त जुन्या आठवणींना हा अल्पसा उजाळा. सदगुण शिकवून मिळविता येतात का? – प्लुटो याचे उत्तर आपल्याला विश्वनाथमध्ये मिळू शकते.

विश्वनाथ ला पुढील वाटचालीसाठी, आरोग्यदायी जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा !

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

रवनाथ जोगी

अनुजा विनोद डावरे
अर्थात अनुजा पालेकर
(वर्गमैत्रिण)

कोणे एके काळी मानवत सारख्या खेडेवजा गावातल्या शाळेत एक गरीब मुलगा शिकत होता. अर्थात तेंव्हा शाळेत शिकणारे सगळीच मुले गरीबच असत. ज्याची चड्डी धड तो साधारण घरातला, ज्याच्या चड्डीला ठिगळं तो खातापिता गरीब आणि ज्याची चड्डी फाटकी तो खरा गरीब! अशी साधारण वर्गवारी आता केली जाऊ शकते. कारण तेंव्हा ती वर्गवारी करण्याची मुभा आणि अक्कल दोन्ही नव्हती.

तर, तेंव्हा शाळेत शिकणाऱ्या त्या गरीब विद्यार्थ्याच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य हा शब्द देखील कमी पडावे इतके दारिद्र्य. त्या काळी बालसुलभ वयात आनंदाचा क्षण म्हणजे संत्रा गोळ्या खाणे! पण या मुलाच्या नशिबी ते क्षण कधीच नव्हते. उलट ते क्षण इतरांच्या आयुष्यात यावे या करिता हा शाळेच्या मध्यंतरात संत्रा गोळ्या विकत असे! जे क्षण इतर मुलांना आनंदाचे होते तेच क्षण या मुलासाठी उदरनिर्वाहाचे होते.

नाथ जोगी ही एक भटकी जमात. तसं तर या जामातीच्या लोकांचे एक गाव देखील नसतं पण सगळीच जमात गावोगावी पाल ठोकून राहायची आणि गावात भिक्षा मागून जगायची! हीच त्यांची जीवनशैली. याच जमातीमधील एका निरक्षर नाथाला ही भटकंती पटली नाही. पटली नाही त्या मागे मुलाने शिक्षण घ्यावे हा शुद्ध हेतू. या हेतूने हा नाथ मानवत येथे स्थायिक झाला. स्थायिक म्हणजे तरी काय तर एका मंदिराच्या बाजूला आपल्या पालाचे रूपांतर झोपडीत करून स्थायिक झाला.....

मुलाने शिकावं या दुर्दम्य इच्छेने मुलाला शाळेत टाकलं. मुलानेही वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी शिक्षण सुरू ठेवलं. ते कधी आपल्याच शाळेत गोळ्या विकून तर कधी नाईलाज झाला तर भिक्षा मागून. शिक्षणात गरिबीचा अडथळा आला नाही. कारण तेंव्हा

गरिबीवर हसण्याची किंवा हेटाळणी करण्याची प्रथा समाजात नव्हती.!!!

दहावी नंतर शाळेतली मुलं पांगली. कुणी कुठे तर कुणी कुठे आपल्या आपल्या ठरलेल्या किंवा न ठरलेल्या मार्गाला लागली. दरम्यान, पोटाची भूक भागवणयासाठी स्ट्रगल करणारा विश्वनाथ अनाथ झाला तरीही पोटाच्या भुके सोबत शिक्षणाची देखील भूक भागवत भागवत उच्च शिक्षित झाला सुद्धा. शिवाय नोकरीला देखील लागला. आता पोटाच्या भुकेची भ्रांत मिटली होती.

पोटासाठी भटकंती करता करता स्थायिक झालेला हा विश्वनाथ आता नोकरी निमित्त बदलीच्या ठिकाणी भटकत राहिला....

यथावकाश नोकरीत बढती घेता घेता वय देखील बढती घेत होतंच. आणि सेवा निवृत्तीचे वय होता होता हा कमिशनर पदा पर्यंत पोचला.

खायला महाग ते कमिशनर पर्यंतचा प्रवास करणारा हा विश्वनाथ जोगी, भटक्या नाथ जोगी पुढे अनाथजोगी खऱ्या अर्थाने स्वनाथ बनला.

विश्वनाथ नाथ जोगी अचंबित करणाऱ्या तुझ्या या प्रवासाला मानाचा मुजरा आणि निवृत्ती पुढील आयुष्याला खूप खूप शुभेच्छा! येणाऱ्या पिढी साठी नक्कीच तू एक आदर्श आहेस..!!!

९

अनाथांचा नाथ विश्वनाथ

शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी

श्री. वामनराव ना.कदम
से.नि.शाखा व्यवस्थापक
महाराष्ट्र ग्रामीण बँक
रा. शिंगणापूर, ता.जि.परभणी

वरील तुकाराम महाराज यांच्या अभंगानुसार नाथ साहेबांचे वडील श्री बाबुराव जोगी (दिनकर हे त्यांचे आडनाव नाथ साहेब अभियंता झाले वर आम्हा गावकऱ्यांना समजले) महाराज म्हणून एक श्रद्धास्थान होते. ते सिंगणापुर या छोट्याशा खेडेगावात दररोज सकाळी झोळी घेऊन घरोघर अल्लख म्हणून भिक्षा मागत आणि नंतर गावातील एका पाटलाचे चक्की /गिरणीवर रात्री उशिरापर्यंत धान्य दळण्याचे काम मजुरीने करत तर त्यांची आई सौ.शांताबाई या शेतकऱ्यांच्या शेतावर निंदणी खुरपणीचे काम करायच्या. या दांपत्याचे पोटी नाथ साहेब दुसरे फळ अकरा जानेवारीला जन्मास आले. त्याआधी त्यांची बहीण सौ.शारदाबाई सोनवणे आणि बबन हा सर्वात लहान भाऊ.

नाथ साहेबांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिंगणापुर येथे झाले आणि वडीलांचे निधन झाले. पुढे अकरावी बारावी परभणी येथे होऊन इंजिनिअरिंगसाठी संभाजीनगर येथे पदवीपर्यंतचे शिक्षण अत्यंत कठीण आर्थिक परिस्थितीमध्ये झाले. तेव्हा त्यांच्या घरातील एकमेव कमावती व्यक्ती म्हणजे त्यांची शेतमजूर असणारी आई शांताबाई .

जाको राखे साईयॉ उसको मारे कौन ।

जिसपर सब दुनिया उलटी बाल न बाका होय ।।संत कबीर ।।

अशा पुण्य पवित्र आणि पापभिरू दांपत्याचे पोटचे फळ केव्हा मोठे झाले हे कळलेच नाही. ते आमचे गावातील पहिले सहायक कार्यकारी अभियंता झाले तेंव्हा गावकऱ्यांना समजले. मग आम्ही गावकरी म्हणायला लागलो,

कुळी कन्या पुत्र होती जी सात्विक ।

तयाचा हरिख वाटे देवा ।।तु.म.।।

परंतु आपला मुलगा इंजिनियर झाला हे पाहण्याचे भाग्य त्यांचे वडिल बाबुरावांना मिळाले नाही. तेव्हापासून पुढे नाथ साहेबांनी आमचे सिंगणापूर शिवारातील रोकडोबा हनुमान मंदिर येथे हनुमान जयंतीला हनुमान जन्मोत्सव मोठ्या स्वरूपात साजरा करायला सुरुवात केली. पुढे संपूर्ण गावकरी हा जन्मोत्सव सप्ताहात रूपांतरित करून भव्य स्वरूपात साजरा करत आहेत. पुढे साहेबांच्या बढत्या होऊन साहेब अधीक्षक अभियंता असताना आमचे गावातील नदीचे खोलीकरण, ,रुंदीकरण करून कोल्हापुरी बंधारे बांधून गावातील विहिरीची पाणी पातळी वाढवली. त्यामुळे साधारण ३०० ते ४०० एकर जमीन विहिरींची पाणी पातळी वाढल्यामुळे सिंचनाखाली आली आणि शेतकरी,गावकरी आनंदाने म्हणू लागले

पुत्र व्हावा ऐसा गुंडा ।

ज्याचा तिही लोकी झेंडा ।।

त्यांच्या आई शांताबाई म्हणजे एकदम सरळ व साध्या खेडूत. आपला मुलगा एवढा मोठा साहेब झाला याचा थोडासाही अभिमान, गर्व मनाला शिवला नाही. त्या या काळात आळंदी-पंढरपूर पायी वारी करीत राहिल्या. अगदी उतार वयाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत त्यांनी ही वारी चालू ठेवली होती. ही सगळी संपन्नता उपभोगून शांताबाईंनी त्यांची अत्यंत प्रसन्न चित्ताने इहलोकीची यात्रा संपवून परलोकी निघून गेल्या. साहेब अजूनही सिंगणापुर येथे त्यांची पुण्यतिथी भजन कीर्तन करून साजरी करतात. आमचे गावातील लहान-सहान कार्यक्रमाला सुद्धा साहेब उपस्थित राहतात. एवढ्या व्याप्त कामातून वेळ काढतात. आज आमचे महाराज बाबुराव आणि शांताबाई यांचा नातू पायलट होत आहे .एक दिवस तो आकाशात भरारी घेईल , तेव्हा आमच्या गावकऱ्यांची छाती ऊर भरून येईल आणि आमचा सिंगणापुर सुपुत्र आकाशाला गवसणी घालत आहे ,असे उद्गार येतील म्हणून

तुकाराम महाराज म्हणतात. तीन मुलींपैकी एक मॅनेजर , दुसरी वकिल तिसरी १० वी ला शिकते आहे. लहान भाऊ बबनचा मुलगा पायलट होत आहे .

आई शांताबाईची पुण्यतिथी हनुमान जयंतीनंतर चैत्र व. ३ ला असते. साहेब दर वर्षी पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात भजन किर्तनाने साजरी करतात .

शुद्ध बीजापोटी ।

फळे रसाळ गोमटी ।।

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

मराठवाड्याचा भूमिपूत्र -इंजि.नाथ

इंजि.अतुल चव्हाण
मुख्य अभियंता
सा.बां.प्रा.विभाग,पुणे

संभाजीनगर येथील वाल्मी या शासकीय संस्थेचे महासंचालक असलेले इंजिनीयर विश्वनाथ नाथ हे आमचे सन्मित्र आहेत. ते मराठवाड्याचे भूमिपुत्र देखील आहेत. अतिशय सामान्य परिस्थिती असलेल्या कुटुंबातून येऊन त्यांनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर इंजिनिअरींगचे शिक्षण घेतले आणि राज्याच्या जलसंपदा खात्यात वर्ग १ अधिकारी म्हणून सेवेत रुजू झाले. त्यांची सुरुवातीची बरीचशी सेवा मराठवाड्यातच झाली आहे. मराठवाड्याची भाग्यरेषा ठरलेल्या गोदावरी नदीवरील बॅरेजेस निर्मितीच्या कामात त्यांचे मोठे योगदान आहे. विशेष करून महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या दोन राज्याच्या सीमेवर असणाऱ्या बाभळी बंधाऱ्याच्या बाबतीत जी न्यायालयीन लढाई लढावी लागली. ती त्यांनी अतिशय मन लावून लढली आणि जिंकली देखील. त्यामुळे श्री नाथ यांचे त्यात मोठे योगदान आहे हे सिद्ध झाले आहे.

कोणतेही काम हाती घेतले की तक्रारी न करता ते पूर्णत्वास नेण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या शासनाने त्यांच्यावर सोपवल्या आणि त्या श्री नाथ यांनी लिलया पार पाडल्या आहेत. त्यांचे अभियांत्रिकी कर्तृत्व त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. इंजि. नाथ हे अगदी लहानपणापासूनच कष्टाळू आहेत. त्यांचे मूळ गाव परभणी जिल्ह्यातील शिंगणापूर असले तरी त्यांचे शिक्षण मानवत या ठिकाणी मामाच्या गावी झाले आहे. शिक्षण घेत असताना देखील स्वतः कमाई करून त्यांनी शिक्षण घेतले आहे. इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिकत असतानाही खाजगी शिकवण्या करून आपला खर्च त्यांनी भागवला आहे. हा त्यांचा गुण पुढील आयुष्यात त्यांना उपयोगी पडला आहे. काही काळ मंत्रालयामध्ये देखील उपसचिव म्हणून त्यांनी काम केले आहे.

प्रशासकीय कामाचाही त्यांना दांडगा अनुभव आहे.

त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांनी काम केलेले आहे. शेवटी महाराष्ट्रा शासनाचाच उपक्रम असलेल्या जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी या संस्थेमध्ये ते महासंचालक या पदावरून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, आरोग्यदायी आणि सुखाचे जावो या आमच्याकडून शुभेच्छा !

अनाथांचा नाथ विश्वनाथ

मित्र असावा तर असा...

श्री. कामाजी धडके
बालमित्र, शिंगणापूर
जि.परभणी

काही नाती अशी असतात की ती स्वर्गातच तयार होऊन खाली पाठवली जातात. तशा नात्यापैकीच आमच्या मैत्रीच्या नात्याचे आहे. आम्ही वेगवेगळ्या जातीत जन्माला आलो, वेगवेगळ्या चाली रीती संस्कारात वाढलो परंतु आम्ही सख्खे शेजारी जन्मापासूनच होतो. तेव्हापासून ते आजपर्यंत आमच्या मैत्रीच्या बनात याचे बंध इतके घट्ट बनले आहेत की आम्हाला एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणून ओळखले जाते. पूर्वी हिंदी सिनेमात दाखवले जायचे की दोन मूले जुळे भाऊ किंवा बहिणी लहानपणीच एकमेकापासून ताटातूट व्हायच. परंतु एकाला जखम झाली की त्याचे दुःख दुसऱ्याला जाणवायचे. एकाला मार दिला की दुसऱ्याच्या अंगावर त्याचे वळ दिसायचे. अशा प्रकारची आमची मैत्री आहे. एकमेकांच्या सुखदुःखाची जाणीव आम्हाला लहानपण लहानपणापासूनच होती. असे आमचे जिवलग मित्र विश्वनाथ बाबुनाथ नाथ महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सुपर क्लास वन अधिकारी झाले तरी गेली ५० वर्ष त्यांनी मैत्रीच्या जागा आम्ही कायम बांधून ठेवला आहे ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे असे मला वाटते.

मला आजही आठवते की नाथ साहेब आणि माझी मैत्री मला कळतही नव्हते तेव्हा पासूनची आहे. त्यावेळी दुष्काळी काळ होता. दिवसातून केवळ एकदाच पोटभर खायला भाकरी मिळायची. ती कुणाच्या तरी शेतातली भाजी तोडून आणायची. भाजी कसली ते तर गवतच असायचे. परंतु पोटाची आग भागवायची म्हणून ती भाजी आणायची. ती शिजवायची आणि त्यात वाटीभर बाजरीचे किंवा ज्वारीचे पीठ टाकून त्याच्या भाकरी बनवायच्या आणि त्यावरच दिवस काढायचा असे ते सुरुवातीचे दिवस होते. अर्थात सर्वांचीच परिस्थिती तशी होती. त्यावेळी नाथ साहेबांचे वडील हे गावातील एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या पिठाच्या गिरणीवर दळण दळून देण्याचे काम करीत असत. काम संपवून ते घरी परत येताना गिरणीत खाली ट्रे मध्ये पडलेले पीठ

घेऊन येत असत. त्या पिठाच्या भाकरी करून शेतातील भाज्या शिजवून त्याबरोबर खाऊन ते आपला उदरनिर्वाह करीत असत. कधीकधी साहेबांच्या वडिलांना ओंजळभर पीठ मिळायचे. कारण रोज रोज गिरणवाला पीठ नेऊ देत नसेल. ते ओंजळभर पीठ ते शेजारीपाजारी कोण उपाशी असेल त्यांना देऊन टाकत असत आणि स्वतः उपाशी राहत असत. हा परोपकारीपणा वडिलांकडूनच विश्वनाथ साहेब यांच्यात मध्ये आला असावा. कधी कधी नाथपंथी प्रथेप्रमाणे शंकराचे भक्त म्हणून गावात पीठ भिक्षा मागून आणायचे आणि त्यावर उदरनिर्वाह त्यांचा चालायचा. अशी परिस्थिती अनेकदा आली. त्यातून ते शिकून आज राज्य शासनामध्ये महासंचालक या पदापर्यंत पोहोचले आहेत. नाथ साहेब यांची शिंगणापूर तालुका जिल्हा परभणी या गावात एक झोपडी वजा घर होते. मध्ये एक रस्ता आणि रस्त्याच्या पलीकडे आमची झोपडी होती. मी त्यांच्यापेक्षा एक दोन वर्षांनी लहान होतो. परंतु आमच्यातील नाते मित्रत्वाचे असले तरी सख्ख्या भावापेक्षा घट्ट होते. आमच्या दोघांच्या आयादेखील मैत्रिणी होत्या. त्यामुळे एकाच्या घरात खायला काही नसले तरी दुसऱ्याच्या घरातील अर्धी भाकरी वाटून खायची. इतके सख्य आमच्या कुटुंबामध्ये होते. मी माझ्या शैक्षणिक जीवनाची सुरुवात नाथ साहेबांचे बोट धरून केली आहे. ते जेव्हा दुसरीच्या वर्गात शिकत होते तेव्हा एक दिवस त्यांनी माझ्या बोटाला पकडून मला शाळेत घेऊन गेले. माझे नाव शाळेत नोंदवले आणि दररोज सोबत घेऊन जाणे आणि आणणे ही मोठ्या भावाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. काही दिवसानंतर त्यांची झोपडी वादळी वाऱ्यात उध्वस्त झाली होती. त्यामुळे त्यांना काही दिवस गावातील एका शेतकऱ्याच्या गुरांच्या गोठ्यात अर्ध्या भागात राहावे लागले होते. अर्ध्या भागात जनावरे बांधली जायची आणि अर्ध्या भागात हे नाथ कुटुंब राहायचे. थोडेसे दूर असले तरी आमच्या कुटुंबात स्नेह आणि गोडवा कधीच कमी झाला नाही. साहेबांच्या

वडिलांची तब्येत सुरुवातीपासूनच सडपातळ अशीच होती. त्यात त्या पिठाच्या गिरणीत दिवसभर काम करायचे. त्यामुळे नाकात तोंडात पीठ जाऊन त्यांना कसलासा आजार झाला होता. त्यातच त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांचे दुःखद निधन झाले. साहेबांचे छायाछत्र हरपले गेले. त्यावेळी साहेब दहावीच्या वर्गात शिकत होते. परीक्षा अगदी आठ दहा दिवसांवर तोंडावर आली होती. अशावेळी आई शांताबाई यांनी खूप मोठ्या धीराने संसाराची जबाबदारी डोक्यावर घेतली आणि अक्षरशः पडेल ते काम करून आपल्या मुलांचा सांभाळ सुरू केला. त्यांची आई शांतामाय स्वभावाने थोडी कडक होती. परंतु खूप मायाळू होती. वावगे काही वागले तर तिला ते अजिबात आवडायचे नाही. ती तात्काळ रागावयाची. परंतु नंतर तीच प्रेमाने जवळही घ्यायची. त्यामुळे तिच्याबद्दल आम्हाला आदर युक्त भीती असायची. मायेचा ओलावा देखील जाणवायचा. शांतामाय अशिक्षित असली तरी आपल्या मुलांनी शिकून मोठा साहेब व्हावं असं तिला मात्र मनापासून वाटायचे. तिचे माहेर परभणी जिल्ह्यातीलच मानवत हे होते. तिथे तिचे दोन भाऊ राहत असत. त्यातील लहान भाऊ साहेबांपेक्षा दोन-चार वर्षांने लहान होता.

आपल्या मुलाने शिक्षण घेत असताना कामात गुंतून राहू नये, त्याचे शाळेकडचे लक्ष कमी होऊ नये यासाठी त्यांनी नाथ साहेबांना दुसरीच्या वर्गात शिकत असतानाच मामाकडे मानवतला पाठवले. त्या ठिकाणी त्यांची शिक्षण सुरू झाले. त्यामुळे त्यांचे तिसरी ते दहावीपर्यंतचे शिक्षण मानवतच्या नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयात झाले आहे. नाथ साहेबांशी आमच्या कुटुंबाची नाळ इतकी घट्ट जुळली होती की जेव्हा जेव्हा त्या कुठल्याही सुट्टीत शिंगणापूरला यायचे त्यावेळी आमच्याकडे आनंदाची दिवाळी साजरी व्हायची. भरपूर खेळणे, इकडच्या तिकडच्या गप्पा मारताना सुट्टीचे दिवस कसे निघून जायचे ते कळायचे देखील नाही. त्यात नाथ साहेब अतिशय मातृभक्त

आणि कुटुंब वत्सल व्यक्तिमत्व आहेत. मानवतला शाळेत असताना जेव्हा केव्हा दिवाळीच्या सुट्टीत किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीत शिंगणापूरला यायचे त्यावेळी ते आई सोबत शेतमजूर म्हणून कामाला जायचे. आलेला आठवड्याचा पगार आईच्या हातात द्यायचे. एकदा दोनदा तर त्यांनी रोजगार हमीच्या रस्त्यावर देखील कामे केली आहेत. इतक्या हालाकीत त्यांनी सुरुवातीचे दिवस काढले आहेत. परंतु आमच्या मैत्रीमध्ये कधीही दारिद्रिपणा आला नाही.

आनंद, उत्साह, प्रेम हे आमच्या मैत्रीतून निर्माण व्हायचे त्यातून मैत्री फुलत गेली. साहेब मानवतला शिकत असताना ते अधून मधून पत्र पाठवत असत. त्यावेळी मोबाईल किंवा फोनची सोय नव्हती. त्यात हटकून आमच्या कुटुंबाची खुशाली विचारलेली बघून आम्हाला खूप बरे वाटायचे. शांतामाय देखील त्यांना पत्र पाठवायची. ते पत्र लिहायची जबाबदारी देखील माझीच असायची. त्यावेळी शांतामायचे सांगून झाल्यावर माझ्या चार ओळी त्यात मी अंत:करणापासून लिहायचो. ती आमची आंतरिक भेट असायची. फार बरे वाटायचे.

कधीकधी मध्येच साहेबांना आईची आठवण व्हायची. परंतु वारंवार जाणे येणे परवडणारे नव्हते. त्यावेळी रेल्वेचे तिकीटही फारसे नव्हते. एक किंवा दीड रुपया असेल. पण तेवढे पैसे त्यांच्याकडे नसायचे. परंतु भेटण्याची इच्छा मात्र तीव्र असायची. एकदा तर ते हातातले घड्याळ विकून आईला भेटायला आल्याचे मला चांगले आठवते. माणसाला परिस्थिती सर्व काही शिकवून जाते. माणसाच्या जीवनात आलेले अनुभव बरेच काही शिकवून जातात. अनुभव हेच मोठे विद्यापीठ आहे. नाथ साहेबांनी अनेक पदव्या पदव्युत्तर पदव्या घेतल्या. परंतु आयुष्याच्या अनुभवाच्या विद्यापीठातून जे ज्ञान मिळवले त्याचा त्यांना जीवनात खूप मोठा फायदा झाला आहे. आयुष्यात अनेक संकटांनी त्यांच्यावर झडप घातली अगदी मोडून

पडते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. तरी त्यांनी स्वतःचा संयम अजिबात ढळू दिला नाही. असंख्य अडचणीवर मात करून त्यांनी यशाचे शिखर गाठले.

मानवताला असताना कष्ट करून पैसे कमवले. शाळेत असताना मधल्या सुट्टीत गोळ्या बिस्किटे विकून पैसे कमावले आणि थोडासा का होईना आईला हातभार लावला. स्वतःच्या शिक्षणाचा भार आईवर फार पडू दिला नाही. पुढे मॅट्रिकला चांगले गुण मिळाल्यानंतर त्यांना औरंगाबाद येथे पॉलिटेक्निकला ॲडमिशन मिळाले आणि ते तिथे रुजू झाले.

नाथ साहेबांचा स्वभावच मुळी कष्ट करण्याचा आहे. त्यामुळे ते औरंगाबादला असताना स्वतः शिक्षण घेत असताना इतर विद्यार्थ्यांना देखील शिकवायचे काम करीत असत. पहिल्या वर्षी पॉलिटेक्निकला प्रवेश आणि हॉस्टेल देखील प्रवेश मिळाला. परंतु दुसऱ्या वर्षी होस्टेलला प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे त्यांना इतर मुलांच्या शिकवण्या घेऊन स्वतःचे बीई चे शिक्षण पूर्ण करावे लागले.

एकदा तर असे झाले की त्यांची बदली जिंतूरला करण्यात आली. त्यावेळी शिकवणीच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागणार होते. विद्यार्थ्यांचे पण नुकसान होणार होते. शेवटी त्यांनी काही दिवस नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. शिकवणीच्या जोरावर अर्थात स्वतःच्या हिमतीवर शिक्षण पूर्ण केले. बीईनंतर ते मुंबईतील व्हीजेटीआय या इंजिनियरींग कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू झाले आणि तिथे कुठे त्यांच्या जीवनाला स्थिरता यायला सुरुवात झाली.

औरंगाबादला साहेब असताना एक घडलेला किस्सा मला चांगला आठवतो. त्यावेळी ते औरंगाबादच्या अजबनगर येथे एका इमारतीत दुसऱ्या मजल्यावर राहात होते. त्या ठिकाणी मी त्यांना भेटायला गेलो होतो. साहेबांना भेटण्यासाठी त्यांच्या रूमवर गेलो

आणि घराच्या मालकिणीला विचारले की नाथ साहेब कुठे रहातात तर तीने दुसऱ्या मजल्यावर जावा असे सांगितले. त्यामुळे मी बिनधास्तपणे पायऱ्या चढून दुसऱ्या मजल्यावर गेलो आणि दरवाजा वाजवला. आत साहेबच असणार याची खात्री असल्यामुळे मी धाडकन दरवाजा उघडला. त्यावेळी आत एक भला मोठा कुत्रा दारातच उभा होता. मी दरवाजा उघडताच त्याने पुढच्या दोन्ही पायांने झेप माझ्या छातीवर घेत भुंकायला सुरुवात केली. त्यावेळी मी इतका घाबरलो की जीवाच्या आकांताने खाली पळत आलो. त्यावेळेस साहेबांनी सांगितले की ती खोली माझी नाही. मालकाचे कुत्रे तिथे कोंडून ठेवतात. अशी गंमत त्यावेळी घडली होती.

साहेब मुंबईला व्हिजेटीआयला प्राध्यापक असताना मी तेथे गेलो होतो. एका स्पर्धा परीक्षेच्या निमित्ताने आमची ती भेट झाली होती. त्यावेळी साहेबांनी वेळात वेळ काढून संपूर्ण मुंबई फिरून दाखवली. जवळपास आठ दहा दिवस मी मुंबईत राहिलो होतो. जीवाची मुंबई केली आणि पुन्हा जुन्या आठवणी ताज्या झाल्या.

नाथ साहेबांची खाण्या पिण्याची विशेष आवड नाही. पोटभर अन्न आहे हीच त्यांची आवड. परंतु अगदीच नेमकेपणाने सांगायचे तर त्यांना पिठले भाकरी खूप आवडायचे. जिथे उपलब्ध असेल तिथे ते हमखास या पक्वानाचा लाभ घेतात. आजही ते पिठले भाकरीला प्राधान्य देतात. तीच त्यांची पसंतीची थाळी असते. बाकी त्यांना कसलाही ना छंद ना शौक! अतिशय साधी राहणीमान आणि उच्च विचार हे त्यांच्या जीवनाचे सुत्र आहे. ते कुठल्याही व्यसनाच्या आहारी गेले नाहीत आणि शाकाहार तर त्यांनी संपूर्ण आयुष्यभर अंगीकारला आहे. एक मात्र त्यांना छंद अगदी लहानपणापासून आहे तो म्हणजे चांगली माणसे जोडण्याचा आणि ती जपण्याचा. त्यांच्या संग्रही अनेक चांगली माणसे असून त्यांना ते खूप जपतात.

औरंगाबाद नांदेड पुणे मुंबई कुठेही नोकरीच्या निमित्ताने असले तरी गावाकडचा माणूस भेटला की त्यांना माहेरचे कुणीतरी भेटल्याचा आनंद होतो. आपल्या व्यस्त शेड्युलमधून वेळ काढून ते पाहूणचार करतात. साहेबांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते धार्मिक वृत्तीचे आहेत. लहानपणापासून ते देवधर्म आणि अध्यात्माची त्यांना आवड आहे. ती कायम त्यांनी जपली आहे. अनेक मंदिरांना त्यांनी सढळ हस्ते मदत केली आहे. अनेक मंदिरांचे बांधकामासाठी साहित्य स्वतःच्या खिशातील पैशाने पुरवले आहे. अनेक मंदिरांचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत सहकार्य केले आहे. खूश होऊन काही ठिकाणी त्यांच्या नावाची फरशी भिंतीवर बसवूया म्हणून लोकांनी आग्रह केला परंतु नाथ साहेबांनी अतिशय नम्रपणे नकार दिला. हे मी नावासाठी करत नाही तर मनात भाव आहे म्हणून करतो असे ते सांगायचे.

अनेक गरीब मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. अनेक अनाथांचा नाथ ते बनले आहेत. काही जणांच्या मुलींची लग्ने खर्चा पायी मोडली जात असताना हा दीनांचा नाथ त्या ठिकाणी धावला आहे. त्याचा मी स्वतः साक्षीदार आहे. एका ठिकाणी आमच्या जिल्ह्यात एका देवस्थानाला मदत केली. ते देवस्थान आसपासच्या खेड्यातील गरीब मुला-मुलींची पाच हजार रुपयात लावून देते. मुलांच्या पालकांनी फक्त पाच हजार रुपये भरायचे आणि लग्नाला यायचे. बाकी सर्व तयारी हे देवस्थान करते. अशा संस्थांच्या मागे साहेब कायम उभे राहतात.

आमच्या गावात एक हनुमानाचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या आजूबाजूला साहेबांची शेती आहे. त्या शेतीत पीक आले की ते पीक स्वतः पहिल्यांदा खात नाहीत तर त्या धान्याची पहिली पंगत हनुमान जयंतीच्या दिवशी या मंदिरात होते. त्यानंतरच अन्नधान्य घरी वापरले जाते. या पंक्तीला आसपासच्या पाच दहा गावातील लोक जमतात. परिस्थिती बिकट असताना याच लोकांनी साहेबांच्या झोळीत पीठ

टाकून त्यांचे पोषण केले होते. परंतु साहेबांनी उपकाराची परतफेड समाजाला व्हावी म्हणून गेल्या अनेक वर्षापासून ही पंगत दिली जात आहे. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. अन्नदानासारखे दुसरे कुठले दान नाही. दानधर्मात त्यांनी कधीच हात आखडता घेतला नाही. अर्थात त्याचा गैरफायदाही अनेक लोकांनी घेतला. नाथ साहेबांचा स्वभाव अगदी पैठणच्या संत एकनाथासारखा आहे. एकनाथांनी एका विंचवाला वाचवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या स्वभावाप्रमाणे विंचवाने नाथांनाच डंख केला. परंतु नाथांनी आपल्या स्वभावाप्रमाणे पुन्हा त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. विंचवाने पुन्हा डंक केला. वारंवार विंचवाने डंक केला. परंतु नाथांनी आपला परोपकाराचा स्वभाव सोडला नाही. अगदी त्याचप्रमाणे आमच्या नाथ साहेबांचा स्वभाव आहे. अनेकांना त्यांनी कुठल्याही परतफेडीची अपेक्षा न करता मदत केली. परंतु त्यातील काही जणांनी परतफेड करायची तर सोडाच उलट त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. काही लोकांनी तर पाच-सहा वेळा त्याचा अर्थ त्यांनी आपली खाजगी प्रॉपर्टी समजून समजून वारंवार मागणी करायला सुरुवात केली. पाच सहाव्या वेळी काय दिले नाही म्हणून त्यांच्याशी भांडण करण्याचा प्रसंग निर्माण केला. परंतु साहेबांनी न चिडता न रागावता यथा शक्ती मदत केली.

नाथ साहेबांच्या साध्या राहणीमानाचा सर्वत्र चांगला प्रभाव दिसतो. परंतु कधीकधी अटीतटीचे प्रसंग देखील येत असायचे. एकदा असेच झाले बाभळी बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊन उद्घाटन झाले. त्यावेळी तात्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते साहेबांचा सत्कार झाला. त्यावेळी मीही तेथे हजर होतो. कार्यक्रम झाल्यानंतर साहेबांनी मला बंधारा दाखवण्यासाठी घेऊन गेले. त्यावेळी तेथे सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने आम्हाला अडवले. साहेबांनी सांगितले की मी कार्यकारी अभियंता आहे आणि मीच हा बंधारा बांधला आहे. परंतु तो पोलीस अधिकारी काय

ऐकायला तयार होईना. शेवटी साहेबांनी आवाज मोठा करूनही पाहिला. परंतु तो अधिकारी सोडतच नव्हता. शेवटी त्या पोलिसाचा वरिष्ठ अधिकारी लांबून ही घटना बघत होता. तो जवळ आला आणि त्यांनी नाथ साहेबांना घट्ट मिठी मारून शुभेच्छा दिल्या आणि अभिनंदनही केले. त्यानंतर मात्र तो सुरक्षा अधिकारी ओशाळला खजील झाला आणि पुन्हा त्याने संपूर्ण बंधारा आम्हाला दाखवला.

असाच एक दुसरा प्रसंग लोणावळ्यात अनुभवाला आला. साहेबांची एक बैठक आंबी व्हॅली येथे होती. त्या बैठकीचे रीतसर आमंत्रण त्यांच्याकडे होते. त्यावेळी मीही त्यांच्यासोबत होतो. परंतु तेथे ज्यांच्याजवळ आमंत्रण पत्रिका आहे त्यांनाच आतमध्ये सोडत होते. अर्थातच मला त्यांच्यासोबत सोडले नाही. साहेबांनी वरिष्ठांना फोन करून पाहिला. परंतु ते काही ऐकले नाही. शेवटी मीच साहेबांना म्हणालो की मी आत येऊन तर काय करणार? तुम्ही चर्चेत असणार बैठकीत असणार आणि मी कंटाळून जाणार. त्यापेक्षा मी बाहेरच थांबतो, तुम्ही बैठक आटपून परत या. साहेब मीटिंगला निघून गेले. परंतु आपल्या मित्राला एकट्याला बाहेर ठेवून आलो हे शल्य त्यांच्या मनाला स्वस्थ बसू देत नव्हते. बैठक थोडा वेळ अटेंड केल्यानंतर ते बैठक अर्धवट सोडून बाहेर आले आणि आम्ही लागलीच परत फिरलो. आपल्या सोबत आलेल्या मित्रांना अर्ध्यावर सोडून आपण पुढे निघून जाण्याचा त्यांचा स्वभाव नाही. सर्वांना सोबतच घेऊन जाण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यांचे कुटुंब भाऊ, आई, भावाची मुले हे सर्वजण आजही एकत्र एकाच कुटुंबात राहतात. बहिणीलाही त्यांनी मोठा आधार दिला आहे. जे जे त्यांच्या संपर्कात आले त्यांना त्यांना त्यांचा स्वभाव चांगल्या प्रकारे ठाऊक आहे. त्यामुळे प्रत्येकाशी ते अशाच प्रकारे आपुलकीने वागत असतात.

मागच्या सरकारमधील मंत्री बबनराव लोणीकर यांनी मंत्री होण्यापूर्वी जलसंपदा खात्यातील अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या

संदर्भात मोहीमच उघडली होती. परंतु जेव्हा ते पत्रकारांचा ताफा घेऊन साइटवर पोहोचले आणि नाथ साहेबांच्या कामाचा दर्जा आणि कामाची पद्धत पाहिल्यानंतर पुन्हा कधीही लोणीकरांनी त्यांच्या कामाबद्दल तक्रार केली नाही. उलट असा अधिकारी दुर्मिळ असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली होती. आपले उद्दिष्ट ठरवून काम करणार काम करणारा अधिकारी नेहमी संघर्ष करीत आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचला. लहानपणी घरोघरी पीठ मागून आपली उपजीविका करणारा एक मुलगा आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शासनामध्ये आपल्या खात्यातील सर्वोच्च पदापर्यंत पोहोचला त्याचे आम्हाला खूपच अप्रूफ आहे. आपल्या सेवेत त्यांनी अनेक चढउतारांना तोंड देत आपले उद्दिष्ट साध्य केले आहे. त्यांना यापुढेही यश मिळत राहो, त्यांना आरोग्य संपदा भरपूर लाभो अशी ईश्वरचरणी मी प्रार्थना करतो.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

प्रेरणादायी मित्र

श्री. राम पांचाळ
बालमित्र, मानवत
जि.परभणी

मानवत हे गाव परभणी जिल्ह्यातील सर्वसाधारण तालुक्याचे गाव आहे. या ठिकाणी समाजातील सर्व स्तरावरील लोक एकत्र रहात असतात. त्यात शेतकरी, व्यापारी, कष्टकरी असे सर्व स्तरातील लोक या ठिकाणी गुण्या गाविंदाने रहात असत. हे गाव सद्या तालुक्याचे ठिकाण असले तरी फार मोठे गाव नाही. मोठे खेडे म्हणता येईल असे मानवत गाव. मात्र गावातील लोक सांस्कृतिक, पारंपारिक सणवार साजरे करणारे आहेत. मानवत या गावात आसपासच्या खेड्यातील लोकांसाठी उपयुक्त असणाऱ्या गरजेच्या वस्तु मिळण्यासाठी मध्यम बाजारपेठ, कपडा बाजार,(मोंढा) ही ठिकाणे अनादी काळापासून मानवतमध्ये कार्यरत आहेत. विशेषत: कपडा बाजार आणि लग्न कार्यासाठी म्हणजे बस्ता बांधण्यासाठी अतिशय योग्य भावात कपडे मिळण्यासाठी मानवत प्रसिध्द आहे. लग्नाच्याबाबतीत मानवतचे असे वैशिष्ट्य सांगितले जाते की या तालुक्यातील कोणत्याही गोरगरिबांची लग्ने बस्ता बांधण्यासाठी पैसे नाहीत म्हणून कधीही थांबले नाही. कोणीतरी दुकानदार उधारीवर बस्ता बांधून द्यायला तयार होतो आणि लग्न पार पडतेच. त्यामुळे मानवत मधील व्यापारी आणि तालुक्यातील लोक यांच्यामध्ये वर्षानुवर्षे एक प्रकारचे नाते तयार झाले आहे.

या मानवत गावात वेगवेगळ्या प्रकारचा व्यावसाय करणारे लोक रहात आहेत. जुन्या काळात तर मानवतला कपडा विणकाम करणारे हातमाग देखील होते असे सांगतात. त्याच प्रमाणे अन्य व्यावसायिक देखील मोठ्या प्रमाणावर रहात होते. यामध्ये मारवाडी, कोमटी, चनवार, रंगारी, कारागिर, तेल काढणारे, घाणी चालणिारे असे जवळपास पंधरा ते वीस वेगवेगळ्या प्रकारचे व्यावसाय करणारे लोक या ठिकाणी रहात होते. या सर्वांचे व्यावसाय एकमेकांवर अवलंबून असल्याने ते आपापसात अतिशय आनंदाने आणि गुण्यागोविंदाने रहात आहेत. मानवत गाव मोठे असले तरी सुरुवातीला ते तालुक्याचे ठिकाण नव्हते. हे गाव पूर्वी पाथरी तालुक्यात होते. पाथरी गाव मानवतपासून सात ते आठ किमी अंतरावर आहे. परंतु आजच्या घडीला मानवत

किंवा कधी कधी पसाभर धान्यदेखील मिळत असे. तेवढाच संसाराला हातभार लागत असे. मामा आणि विश्वनाथ यांच्या जेवणाची जबाबदारी आजीच स्वीकारत असे.

विश्वनाथ इयत्ता दुसरीच्या वर्गापासून मानवतला मामाकडे शिकायला आले. त्यावेळी त्याच शाळेत इयत्ता पहिलीच्या वर्गात शिकत होतो. आमच्या शाळेचे नाव नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय असे होते. गावात जिल्हा परिषदेची पण शाळा होती आणि एक केंद्रीय शाळादेखील होती.परंतु त्यामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस या शाळेची ख्याती आसपासच्या परिसरात चांगली होती. त्यामुळे आसपासच्या परिसरातील बहूतांशी मुले नेताजी सुभाषचंद्र बोस या शाळेतच प्रवेश घेत असत. त्यामुळे या शाळेत तालुक्याबाहेरचे विद्यार्थी शिकत असत. विश्वनाथ जेव्हा दुसरीच्या वर्गात शिकण्यासाठी मानवतला आला त्यावेळी त्याची घरची परिस्थिती गरिब होती. तशी त्यांच्या मामाच्या घरची परिस्थितीदेखील गरिबीचीच होती. परंतु गरिबीतही लोक खाऊन पिऊन सुखी होते. विश्वनाथला एक भाऊ त्याचे नाव काशिनाथ तर त्यांना शारदा नावाची एक बहिणदेखील आहे. आई शांताबाई या एक शेतमजूर होत्या. दिवसभर दुसऱ्याच्या शेतात भांगलणी आणि खुरपणी करायच्या आणि संध्याकाळी घरी परत येताना शेतातील भाजीपाला आणून कधी कधी नुसता तोच खाऊन झोपायची वेळ यायची. त्यावेळी दुष्काळ असल्यामुळे सर्वांचीच परिस्थिती तसी होती. गरिबी ही फक्त अनुभवता येते ती व्यक्त करता येत नाही. दोन दिवस केवळ शेतातील भाजीचा खाल्ल्यानंतर जेव्हा कडाक्याची भूक लागते तेव्हा त्याची जी आग असते ती शब्दात व्यक्त करता येत नाही. ज्यांनी ते भोगले आहे त्यालाच ती कळते.

१९७२ च्या दुष्काळात कोणालाच पोटभर अन्न मिळत नव्हते. परंतु कोणी उपासी असेल तर आपल्या भाकरीतील चतकोर भाकरी उपासी असलेल्यांना देण्याची दानत मात्र त्यावेळच्या लोकांमध्ये होती. एकमेकांसाठी जीवाला जीव देणारी माणसे त्यावेळी अवतीभोवती होती.

तालुका आहे. आजचे वाल्मीचे महासंचालक विश्वनाथ बाबूनाथ नाथ यांचे संपूर्ण बालपण याच परिसरात गेले. वास्तविक त्यांचे मुळ गाव परभणीजवळचे शिंगणापूर हे होय. परंतु शिक्षणासाठी आपल्या मामाकडे मानवत येथे रहात असत. मानवत गावातल्या लाड गल्लीत रहात असत. त्या भागाला परकोट मोहल्ला असेही म्हटले जात असे. या गल्लीत साधारण गरीब लोक रहात असत. या गल्लीत रहाणाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त होते. परंतु या गल्लीतील मुळ लोक लाड समाजाचे असल्याने या गल्लीचे नाव लाड गल्ली असे पडले होते. या गल्लीत राम आणि महादेवाचे मंदिर आहे. तसेच जुन्या काळातील एक तलावही आहे.

विश्वनाथ नाथ हे माझे शालेय जीवनातील अतिशय जवळचे मित्र. त्यांचे पुर्ण नाव विश्वनाथ बाबूनाथ नाथ असे आहे. विश्वनाथ यांच्या मातोश्री शांताबाई यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांना मानवत येथे त्यांच्या मामाकडे ठेवले होते. त्यांना दोन मामा होते . त्यापैकी मोठे आदिनाथ तर छोटे मामा गोपीनाथ. मामांसोबत त्यांची आजीदेखील रहात असे. मामा नाथपंथी समाजातील असल्यामुळे त्यांचा पारंपारिक व्यावसाय सकाळी झोळी घेऊन भिक्षा मागणे आणि दिवसभर कपडे शिलाईचे काम करणे. मामाचे या व्यावसायातून भागत नसे. परंतु कसातरी संसार रेटायचे काम होत असे. परंतु त्यातही ते कुटुंब समाधानी होते. त्यांची आजी अशिक्षित असली तरी त्यांना घरगुती औषधांचे ज्ञान होते. त्यामुळे गावातील किरकोळ काही इजा झाली की लोक दवाखान्याची पायरी चढत नसत. किंबहूना त्याकाळी दवाखान्याची संख्या फारच कमी होती. छोट्या मोठ्या आजारासाठी लोक दवाखान्याची पायरी चढत नसत. मग ते विश्वनाथ यांच्या आजीकडे येत असत. त्यावेळी आजी पोट चोळून देणे, झाडपाल्याची किंवा घरातील औषधी पदार्थांचा वापर करुन उपचार करीत रुग्णांची सेवा करीत असे. त्यातून कधी चार पैसे तर कधी घरातील गरजेच्या वस्तू त्यांना मिळत असत. जसे की भाजीपाला, कांदे लसून

जगण्यासाठी तेवढी गोष्ट आशादायक होती. विश्वनाथ यांच्या वडीलांची तब्येत सुरुवातीपासूनच अशक्त अशीच होती. ते आजारीही असत. मात्र विश्वनाथ यांना आईचा खूप मोठा आधार होता.

विश्वनाथ यांना आपल्या परिस्थितीची जाणीव कायम असे. त्यामुळे बालवयापासूनच त्यांनी कष्टाची सवय लावून घेतली होती. शिवाय कोणत्याही कामाची लाज त्यांनी बाळगली नाही. पारंपारिक पध्दतीने सकाळी दारोदार फिरुन भिक्षा मागणे असो की शाळेत शिकत असताना मधल्या सुटीत लिमलेटच्या गोळ्या विकणे असो याबाबत त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. परंतु वयोमानानुसार त्यांच्या मधला स्वाभिमान वाढत गेला आणि भिक्षा मागून जगण्यापेक्षा कष्ट करुन जगण्यावर त्यांनी जास्त भर दिला.त्यामुळे शाळेत जायला सुरुवात केल्यानंतर शाळेत मधल्या सुटीत गोळ्या विकायला सुरुवात केली.पाच पैशाला एक लिमलेटची गोळी असायची. लिमलेटच्या गोळ्यांचा एक पुडा विकत घ्यायचा आणि तो शाळेत मधल्या सुटीत किंवा शाळेत काही कार्यक्रम असेल तर त्या ठिकाणी मुख्याध्यापकाची परवानगी घेऊन ते गोळ्या विकायचे. अशा प्रकारे कष्टाची सवय त्यांना अगदी बालवयातच लागली होती. स्वत:चे बालपण विसरुन जबाबदारपणाची वृत्ती त्यांनी जोपासली होती. कधी कधी त्यांनी सिनेमाच्या थिएटरमध्ये देखील गोळ्या विकल्या आहेत. तेवढेचा चार पैसे जास्त मिळतील ही अपेक्षा. परंतु त्याच टॉकीजमध्ये एकादा सिनेमा पहावा असे कधी वाटले नाही.अनेकदा•दिवाळीच्य किंवा उन्हाळ्याच्या सुटीत गावी आईकडे जात असत तेव्हा ते आईसोबत दुसऱ्यांच्या शेतात शेतमजूर म्हणूनही कामाला जात असत. रोजगार हमीच्या कामावर देखील त्यांनी काम केलेले आहे.

त्यांच्या मामाकडे एक गाय होती. त्या गायलादेखील चारायला नेण्याची जबाबदारीदेखील विश्वनाथ पार पाडत असत. उन्हाळ्याच्या दिवसात कुल्फीचा व्यावसाय जोमात चालत असे. तो व्यावसायदेखील त्यांनी बालपणी केला आहे. एकंदरीत जेवढे म्हणून कष्ट करुन पैसे

कमविण्याचे मार्ग होते तेवढे त्यांनी धुंडाळले आहेत. त्यामुळे कष्टाची किंमत काय असते हे त्यांना चांगले माहित आहे. हे करीत असताना शाळेतील अभ्यासाकडे त्यांचे कधी दुर्लक्ष झाले नाही. प्रत्येक वर्गात त्यांचा पहिला क्रमांक ठरलेला असायचा. एवढेच नव्हे तर शाळेतील प्रत्येक ॲक्टीव्हिटीमध्ये त्यांचा सहभाग अग्रक्रमाने असायचा. मग त्या शाळेतील क्रीडा स्पर्धा असो की शाळेतील गॅदरींग असो. प्रत्येक गोष्टीत अव्वल रहाणे हा त्यांचा स्वभावच राहिला आहे. लहानपणी त्यांना खो खो खेळाची विशेष आवड होती. शाळेतमध्ये दरवर्षी विविध खेळांच्या स्पर्धा असायच्या. त्यात खो खो, कबड्डी, व्हॉलीबॉल अशा खेळांचा समावेश असायचा. त्या सर्वांमध्ये विश्वनाथ यांचा सहभाग असायचा. त्यामुळे त्यांच्यात खिलाडू वृत्तीही विकसित झाली आहे. कुठल्याही गोष्टीत अपमान झाला किंवा वेदना देणारे कोणी काही बोलले तर ते खिलाडू वृतीने सोडून देतात. मात्र जास्तच अन्यायकारक असेल तर मात्र सहन करीत नाहीत. आपल्यावरील अन्यायाला ते वाचा फोडतात.

दिवसभर शाळा आणि स्वकमाई करण्यात त्यांचा वेळ जात असे. त्यामुळे त्यांना दिवसा मित्रांमध्ये खेळायला वेळ मिळत नसे. परंतु रात्री आम्ही मित्र मंडळी एकत्र येऊन खेळत असू. त्यामध्ये धप्पाकुटी, कुरघोडी असे मराठवाडी खेळ त्यात असत. विशेष करुन लपंडाव हा खेळ जवळपास दररोज खेळला जात असे. जुनेवाडे, बैलगाड्या, गुरांचे गोठे अशा लपायच्या गाड्या मोठ्या प्रमाणावर आम्ही रहात असू त्या भागात असायच्या. त्यामुळे तो खेळ रंगात यायचा. तसे खेळ आजकालची मुले खेळत नाहीत किंबहूना या खेळांची नावे देखील आजच्या मुलांना माहित नाहीत. खेळामुळे मनाचा आनंद इतका द्विगुणीत व्हायचा की आपण गरिब आहोत याची जाणीवदेखील कोणाला होत नसे. ब्रम्हानंद कशाला म्हणतात ते माहित नाही परंतु मनसोक्त खेळून तो आम्ही अनुभवला होता.

विश्वनाथ लहापणापासूनच बुध्दीमान होता. तो आमच्याच वयाचा असला तरी तो बुध्दीने आमच्यापेक्षा फार मोठा होता.

आमच्यापेक्षा त्याचे ज्ञान कितीतरी पटीने जास्त होते. कधी कधी रात्री आम्ही खेळ खेळून झाल्यानंतर गल्लीतील मोक़ळ्या जागेवर जागेवर काही मित्र मंडळी गप्पा मारत बसत असू. त्यावेळी विश्वनाथ आम्हाला गोष्टी सांगत असे. शूरवीरांच्या गोष्टी तो आदी स्वत: वाचत असे आणि नंतर आम्हाला सांगत असे. अनेकदा तो परिसरातील चालू घडामोडीवरही बोलत असे. त्यावेळी त्याच्या ज्ञानाचे आम्हाला कौतुक वाटत असे. शाळेत तर दर वर्षी वर्गात पहिला क्रमांक ठरलेला असायचा. परंतु त्याचा गवगवा त्यांनी कधी केला नाही. फुशारकी मारली नाही. कायम नम्र आणि मितभाषी स्वभाव कधी बदलला नाही. अतिशय कमी वयामध्ये भरपूर समजूतदारपणा त्यांनी संपादन केला होता. त्यावेळी आम्हा मित्रांचा जो ग्रुप होता त्यामध्ये बालाजी सोरेकर, बळीराम लाड, सुरेश दहे, सुरेश जैन, राम पांचाळ म्हणजे मी यांचा समावेश होता. आम्ही सगळे एका वर्गात नसलो तरी एकदोन वर्षे मागे पुढे होतो. परंतु रात्री खेळाच्या वेळी एकत्र येत असू. थोडक्यात आम्ही गल्लीतील लंगोटीयार होतो.

लहानपणी आम्हा मित्रांचा ग्रुप खूप चांगल्या पध्दतीने खेळ खेळत असायचे. आमच्या सर्व मित्रांकडे चकाऱ्या असायच्या. त्या चकाऱ्या घेऊन आम्ही काही मैलोमैल अंतर पळत जात असू. त्यामुळे शरिराचा चांगला व्यायाम होत असे. आमच्या गावापासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर अंधारवड नावाचे मारुतीचे ग्रामदैवत होते. तेथे दर शनिवारी आम्ही दर्शनासाठी जात असू. एवढ्या लांब जात असताना आम्हा सर्व मित्रांकडे चकाऱ्या हमखास असायच्या. नाहीतर एवढे अंतर आम्ही चालूच शकलो नसतो. गावचे श्रध्दास्थान असणारे दिव्यानंद पुरीजी त्या ठिकाणी रहात असत. त्यांच्या दर्शनालाही आम्ही जात असू. त्यावेळीदेखील चकाऱ्या आमच्यासोबतच असत. विश्वनाथ यांचे मामा आदिनाथ अतिशय धार्मिक वृत्तीचे असल्याने ते या ठिकाणी ग्रंथ पारायण किंवा हरीनाम सप्ताहासारख्या कार्यक्रमामध्ये सहभागी होत असत.

लाड गल्लीमध्ये त्यावेळी घराजवळ एक ज्ञानोबा कच्छवे यांचा मोठा वाडा होता. त्या ठिकाणी वारंवार धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. तेथे एक आध्यात्मिक व्यक्तिमत्व श्री मुरलीधरदादा बोरबने हे सतत पोथी वाचनाचे कार्यक्रम करत असत. त्यांच्या विचारांचाही प्रभाव आमच्यावर होता. त्याचप्रमाणे शाळेतील शिक्षकवृंद जी.एस.सिखवाल सर, श्री नेवरेकर सर, श्री येलमटे सर, श्री मुंडे सर, श्री मोगरे सर, पांचाळ सर,सोरेकर सर, लोखंडे सर या शिक्षकांनी आमच्या फार प्रेम केले. मायेची कुपादृष्टी सतत आमच्यावर असायची. विशेष करुन विश्वनाथ वर्गात हुशार असल्याने सर्वच शिक्षकांची त्याच्यावर कृपादृष्टी होती. त्याच्या सद्‌गुणांकडे पाहून सर्वजण त्याच्याकडे सहानुभूतिने पहात असत. त्याचा त्याला अत्यंत हालाकीच्या परिस्थितीमध्ये शिक्षण घ्यायला चांगला उपयोग झाला. त्यानेही जिद्दीने आणि चिकाटीने शिक्षणाची कास सोडली नाही. मॅट्रकच्या वेळी तर त्याने फार चिकाटीने अभ्यास केला. त्यावेळी त्याच्या बालमनावर आघात करणारी एक दु:खद घटना घडली. दहावीची परीक्षा अगउी दहा दिवसांवर आली असताना त्याचे वडील बाबूनाथ यांना देवाज्ञा झाली. वडीलांचे छायाछत्र हरपले. परिस्थितीचे भांडवल करत त्यांनी हार मानली नाही किंवा कच खाल्ली नाही. जिद्दीने अभ्यास केला आणि दहावीला चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाला. शिक्षणाच्या बाबतीत त्यांनी कधीही गरिबीचे भांडवल केले नाही. मला अमुक वस्तू मिळाली नाही म्हणून मला अभ्यास करता आला नाही असा बहाणा त्यांनी कधीच केला नाही. अगदी वडील वारले तरी अभ्यासावरचे लक्ष विचलीत न होऊ देता. चांगल्या गुणाने तो उत्तीर्ण झाला आणि त्यानंतर त्याचा शासकीय पॉलीटेक्निकला नंबरही लागला.

विश्वनाथ यांचा स्वभाव फार गोड आणि मितभाषी आहे. त्यामुळे सर्वांशीच त्याचे संबंध जिव्हाळ्याचे राहिले आहेत. मग ते शाळेतील मित्र असोत, शिक्षक असोत की शेजारीपाजारी असोत. त्यांचे आजूबाजूचे शेजारी आजही त्यांचे कौतुक करतात. त्यांचे शेजारी

कौसल्याबाई व केशवदादा लाड, बाबाराव ज्ञानोबा दहे, अनिता डांगे व डांगे सर आजही त्यांच्याबद्दल कौतुक करतात. दहावीनंतर त्यांचा शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद येथे नंबर लागला आणि ते तिकडे रवाना झाले. त्या ठिकाणी देखील त्यांनी अशा काही प्रसंगाला तोंड दिले की ते ऐकले की आपोआप डोळ्याला धारा लागतात. स्वत: शिकत असताना तेथे रहाण्याखाण्याचा खर्च भागवताना त्यांचे प्रचंड हाल झाले परंतु ते रडत बसले नाहीत. त्यावर मार्ग शोधित राहिले. इतर मुलांच्या शिकवण्या घेऊन त्यांनी चार पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आमच्या भेटी काही वारंवार होत नव्हत्या परंतु जीवलग मित्र असल्याने कुठूनतरी माहिती मिळत रहायची. शिक्षण मिळविण्यासाठी तो संकटांच्या वादळात तग धरुन रहाण्यासाठी काय काय दिव्यातून त्याला जावे लागले याचे किस्से एकायला मिळायचे. परंतु त्याची जिद्द आम्हाला माहिती होती. तशा वादळातही तो आपला मार्ग स्वत: शोधत राहिला आणि पुढे जात राहिला.

जसजसे यश मिळत राहिले तसतसा तो पुढे चालत राहिला. वाटेत अनेक संकटे आली त्यावर मात करीत राहिला. कधीही मुंबईचे तोंड पाहिलेले नसताना कुठलाही आधार नसताना मुंबईत नोकरी शोधली. तेथेच स्थिरावत असताना शासनाच्या एमपीएससी परीक्षेचा अभ्यास करुन त्यात यश मिळवले आणि वर्ग एकचा अधिकारी झाला. त्याच ठिकाणी कार्यरत असताना दोनाचे चार हात देखील झाले आणि त्याचे काहीसे बरे दिवस आले. एवढे झाले तरी त्याची कुटुंबाशी नाळ कायम जोडलेली होती. वडीलांच्या निधनानंतर ज्या आईने काबाडकष्ट उचलून त्याच्या शिक्षणाची वाट चालू ठेवली तिला ते अजिबात विसरले नाहीत. सतत ते आईसोबतच राहिले. एवढेच नव्हे तर भाऊ काशिनाथचे कुटुंबही त्यांच्यासोबतच रहाते. त्यांचे स्वत:चे कुटूंब, भावाची मुले आणि आई असे एकत्र कुटुंब आजही बघायला मिळते. एवढेच नव्हे तर जवळचे मित्र, शिक्षक, वर्गमित्र यांच्या संकटाच्यावेळी धावून जाण्यास तो विसरला नाही. अनेकांना मदतीचा हात देऊन आपले ऋणानुबंध

कायम ठेवले आहेत. हे सर्व करीत असताना मी कोणी मोठा अधिकारी आहे आणि मी पैसेवाला आहे हा अहंकार कधीही त्यांच्या बोलण्यातून आणि वागण्यातून दिसून आला नाही. तो सतत पुढे पुढे चालत राहिला. कधीही साहेबी थाट त्यांनी कुठेही दाखवला नाही. अगदी नोकरी करताना नाही.असा हा आमचा सरळ साधा मित्र विश्वनाथ शासकीय सेवेत सर्वोच्च पदावर पोहचला परंतु गर्वाचा वाराही त्याला शिवला नाही.

विश्वनाथ हा असा माझा बालपणीचा मित्र. जसा मी त्याला पाहिले, जाणले त्याप्रमाणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्या त्या परिस्थितीनुसार वागत गेलो. गरिबी असताना आणि श्रीमंती आल्यानंतरही आमच्या कुणाच्याच वागण्यात काहीही बदल झाला नाही.तेच आपुलकीचे बोलणे, वागणे आजही कायम आहे. एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होणे एकमेकांसाठी धावून जाणे आजही या वयातही चालूच आहे. असा हा आमचा मित्र विश्वनाथ खरोखरच नावाप्रमाणे विश्वनाथ आहे. आयुष्यात त्याने कधीही कुणाचे वाईट चिंतले नाही आणि वाईट केलेही नाही. सतत सत्याची कास धरत राहिला त्यामुळे अनेकवेळा संकटातही सापडला. परंतु संकटाला डगमगून थांबणारा हा माणूस नव्हे. शासकीय नोकरीतदेखील अनेक संकटाला तोंड देत तो सर्वोच्च पदापर्यंत पोहचला. सर्वांशी माणुसकीने वागला.सचोटीचे जीवन जगला. आता तो सेवानिवृत्त होत आहे. ही त्याची सेवानिवृती नव्हे तर आयुष्याची दुसरी आवृत्ती आहे. या दुसऱ्या इनिंगमध्ये काम करतानाही त्यांना उत्तम आरोग्य लाभो आणि यश मिळो ही शुभकामना सतत त्याच्या पाठिशी राहील.

अनाथांचा नाथ
विश्वनाथ

माझे विश्व

सौ. स्वप्नजा विश्वनाथ नाथ
श्री. नाथ यांच्या धर्मपत्नी

स्वप्न पाहणं सोपं असतं परंतु त्या स्वप्नांना सत्यात उतरवणं अवघड असतं. त्यासाठी मोठ्या कष्टाची, त्यागाची आणि धैर्यांची गरज असते. जी माणसं या बिकट मार्गाने जाण्याचा निर्णय घेतात किंवा त्यांना त्या मार्गाने जावे लागते. ती माणसं यशाच्या शिखरावर पोहचतात आणि त्या यशाला एक प्रकारची लखाकी येते. जसे की सोन्याला प्रत्येक वेळी आपली बहूमोलता सिध्द करण्यासाठी प्रत्येकवेळी कसोटीला सामोरे जावे लागते. प्रत्येकवेळी मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागते तसे माणसालादेखील अनेक अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडल्यानंतर कुठे देवपण मिळते याचा ठायी ठायी प्रत्यय आम्ही अनुभवला आहे. कारण आम्ही देखील त्या मार्गावर चालण्याचा अनुभव घेतला आहे. आमचाही जीवन प्रवास त्याच मार्गावरुन झाला आहे. गरिबीच्या अंधारातून प्रकाशाकडे जाणाऱ्या जिद्दीची, संघर्षातून घडलेल्या यशाची आणि निष्ठेच्या बळावर उभ्या राहिलेल्या एका प्रमाणिक अधिकाऱ्याची सहचारिणी असण्याचा मला खूप अभिमान आहे.

आमच्या सहजीवनाचा प्रवास सुरु झाला तो दिवस आहे ५ मे १०९९! कारण त्या दिवसी माझे पती परमेश्वर आणि माझी पहिली भेट झाली. ते मला पहायला आले होते. म्हणतात ना की आयुष्याच्या जोड्या स्वर्गातच बांधलेल्या असतात. अगदी तसेच झाले. पाहताक्षणीच त्यांना जाणिव झाली की आमची जोडी आधीच निश्चित झाली असावी. कारण पाहता क्षणिच त्यांनी मुलगी पसंत असल्याचे सांगितले. परंतु पहाण्यासाठी सोबत आलेले लोक मराठवाड्यातील होते आणि प्रस्तापित कुटुंबातील होते. त्यामुळे गुलगा प्राध्यापक आहे म्हटल्यावर त्यांनी हुंड्यासाठी आग्रह धरला. परंतु आम्ही पश्चिम महाराष्ट्रातील. हुंड्याची प्रथा आमच्याकडे नव्हती. परंतु यांची स्वत:ची काही मते ठाम होती. त्यानुसार त्यांनीहुंड्याचा आग्रह फार काही लावून धरला नाही. त्यानंतर लगेच त्याच दिवसी म्हणजे ५ मे

१९९९ रोजी साखरपुडाही उरकला. लग्नाची बोलणी आणि निश्चितीही त्याच दिवसी ठरली. सर्व काही स्वप्नवत घडले. योग जुळून आले आणि १८ जून १९९९ रोजी परभणी जिल्ह्यातील पोखर्णा या गावी श्री नरसिंहा देवाच्या आशीवार्दाने लग्न बंधनात अडकलो आणि एकमेकांच्या जीवनात सहप्रवासी झालो.

आमच्या जीवनाची सुरुवात तशी साधी आणि कठीणच होती. कारण सुरुवातीची नोकरी प्राध्यापकाची असली तरी खाजगीच होती. परंतु माझे पती जिद्दी आणि ध्येयवेडे असल्याने त्यांनी राज्य शासनाची स्पर्धा परीक्षा देऊन मोठा अधिकारी बनण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले होते आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी वाटेल तितके कष्ट करण्याची तयारी त्यांनी ठेवली होती. सहजीवनात मीही माझ्या परिने त्यांचा आधार बनण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या जीवनात गरिबी ही केवळ परिस्थिती नव्हती तर त्यांच्या प्रत्येक श्वासाचा भाग होती. शिक्षण घेणे सोपे नव्हते. कधी पुस्तकांची कमतरता तर कधी अभ्यासाठी पुरेसा उजेडही नसायचा. रस्त्याखालच्या दिव्याखाली बसून त्यांनी अभ्यास केला आहे. परंतु मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या जीवावर सर्व संकटंवर मात करुन त्यांनी यशाच्या शिखरावर पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. परभणी जिल्ह्यातील शिंगणापूरसारख्या एका खेड्यातून सुरु झालेला प्रवास ते मुंबईतील एका नामांकित इंजिनियरींगचा प्राध्यापक हा तितका सोपा नव्हता. अनेक खाचखळग्यांनी वाट तुडवत ते तिथे पोहचले होते. त्यावेळी मी त्यांच्या जीवनप्रवासात प्रवेश केला. परंतु त्यांचे ध्येय आणखी पुढे होते. राज्य शासनाची स्पर्धा परीक्षा देऊन त्यांना मोठा अधिकारी व्हायचे होते आणि त्यासाठी त्यानी जीवाचे रान केले. अखेर त्यांना यश आले आणि पहिल्या प्रयत्नातच त्यानी राज्य लोकसेवा आयोगची परीक्षा पास केली आणि ते क्लास वन अधिकारी झाले.जवळपास दोनशे विद्याथ्यांमधून त्यांची निवड झाली. राज्याच्या जलसंपदा

विभागात सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची नेमणूक झाली. तो दिवस आयुष्याला वेगळी कलाटणी ठरला. माणसाकडे जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी असेल तर यशाचे शिखर गाठता येते याचे जीवंत उदाहरण माझ्या घरात होते.

सासरी आले तेव्हा मी, माझे पती, सासूबाई आणि एक दीर असे चौकोनी छोटेखानी कुटुंब होते. सासूबाई कडक शिस्तिच्या पण प्रेमळ होत्या. त्यांचा स्वभाव कोकणातील फणसासारखा होता. बाहेरुन काटेरी वाटत असला तरी आतून गोड रसाळ! त्यांनी सुरुवातीच्या दिवसात मला फार संभाळून घेतले. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र असा एकदम बदल झाल्यामुळे थोड्या फार चुका माझ्याकडून व्हायच्या. परंतु सासूबाईंनी सांभाळून घेतले. काही गोष्टी समजावून सांगितल्या, शिकवल्या. पुढे तर त्या माझी ढाल बनल्या.मोठ्या नणंदबाईचे आधीच लग्न झाल्याने त्या त्यांच्या सासरी होत्या. परंतु सासूबाई माझ्यासाठी प्रेरणास्थान ठरल्या. पतीच्या निधनानंतर त्यांनी खचून न जाता आई आणि वडील अशा दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी स्वत:च्या खांद्यावर घेतल्या आणि न डगमगता कष्ट करुन आपल्या मुलांना केवळ सांभाळलेच नाही तर उच्च शिक्षण देऊन उच्च अधिकारी बनविले. स्वत: अशिक्षित असतानाही काबाड कष्ट करुन मुलाला क्लासवन अधिकारी बनलिे. मुलीचे लग्न स्वत:च्या हिमतीवर केले. अनेक प्रसंग जीवनाची परीक्षा घेणारे आले पण त्या डगमगल्या नाहीत. जिद्दीने लढत राहिल्या. तीच जिद्द मुलामध्येदेखील निर्माण केली. त्यामुळे पुढे चांगले दिवस बघायला मिळाले.

सुरुवातीला आम्ही काही दिवस गावी राहिलो. त्यानंतर मुंबईला नोकरीच्या ठिकाणी गेलो.ते दिवसभर मुंबईतील माटुंग्याला कॉलेजवर शिकवायला जायचे आणि रात्री घरी आले की मुलांचे ट्युशनही घ्यायचे. खूप ओढाताण व्हायची त्यांची! परंतु सतत जबाबदारीची जाणिव व्हायची. त्यामुळे न थकता ते मेहनत करीत

असत.सतत कामात असत. तरीदेखील माझ्या मनाचादेखील विचार ते करायचे. पहिल्यांदाच आम्ही दोघे गोव्याला फिरायला गेलो होतो. तिथे एका उच्च दर्जाच्या हॉटेलमध्ये थांबलो होतो. माहेरी असताना बाहेर फिरणे नसायचे. घर आणि शाळा या व्यतिरिक्त कुठे जाणे येणे नसायचे. पहिल्यांदाच एवढ्या लांब फिरायला आले होते. त्यामुळे थोडे घाबरल्यासारखे झाले होते. परंतु यांनी मला खूप आत्मविश्वास दिला, सांभाळून घेतले.समुद्र किनाऱ्यावर दूरवर फिरायला गेलो. त्या अथांग समुद्र किनाऱ्यावरुन चालताना एकमेकांच्या अधिक जवळ येत गेलो. एकमेकांना समजून घेण्यासाठी तो एकांत खूप फायद्याचा ठरला. एकमेकांना जवळून ओळखण्यासाठी ती ट्रीप फार महत्वाची ठरली. माझ्यातला आत्मविश्वास त्यांनी जागा केला आणि मी धीट बनत गेले.पुऐ जसजसे दिवस जातील तसे आम्ही सहजीवनात एकमेकांना सपोर्ट करत गेलो आणि जीवनाचा आनंद घेत गेलो. त्यानंतर पुढे सन २००० मध्ये आम्हाला कन्या रत्नाची प्राप्ती झाली. पहिली बेटी आणि धनाची पेटी म्हणत सासूबाईंनी मुलीचे स्वागत केले. आम्हा दोघांच्या तर आनंदाला पारावार उरला नाही.ते दिवस खूपच आनंदाचे ठरले.कौतुकाने मुलीचे नाव नेहा ठेवले. नेहाचा जन्म आमच्यासाठी खूप आनंदाची गोष्ट होती.

नेहाच्या कौतुकात सुरुवातीचे कसे निघून गेले ते कळलेच नाही. पहिली बेटी आणि धनाची पेटी अशी एक ग्रामिण भागातील म्हण आहे. माझ्या सासुबाईनीदेखील त्याचा उल्लेख केला आणि खरोखरच तसे घडले कारण तिच्या जन्मानंतर काही दिवसातच साहेबांना राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत यश मिळाले आणि त्यांना नागपूर मधील गोसीखुर्द प्रकल्पावर सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून पहिली पोस्टींग मिळाली. गोसीखुर्द उजवा कालवा प्रकल्प ब्रम्हपुरी येथे ते रुजू झाले. नवीन नियुक्ति, नवा उत्साह आणि नवे सहकारी यांच्यासमवेत त्यांनी कामाचा झपाटाच लावला.

आपल्या कार्यकर्तृत्वाची, प्रामाणिकपणाची आणि बुध्दीमतेची चुणूक दाखवून त्यांनी तेथे सर्वांनाच आलेसे केले. आयुष्यातील पहिल्या सरकारी नोकरीतील संधीचे त्यांनी सोने केले. त्यानंतर साहेबांची पदोन्नतीवर बदली नांदेड येथे विष्णुपुरी प्रकल्पावर झाली. तेव्हा आम्ही नांदेडला रहायला आलो. नांदेडला आल्यानंतर दुसरी कन्या निकिताचा जन्म झाला. दिवस आनंदात जात होते. मात्र साहेबांचा कामाचा व्याप वाढत होता. नांदेडला आल्यानंतर कार्यकारी अभियंता म्हणून त्यांच्यावर अनेक कामाची जबाबदारी येऊन पडल्या होत्या. त्यातलीच एक जबाबदारी म्हणजे महाराष्ट्र आंध्र प्रदेशच्या सयीमेवर असणाऱ्या बाभळी बंधाऱ्याची कार्यकारी अभियंता म्हणून त्यांच्यावर येऊन पडली होती. त्या बंधाऱ्याच्यावेळी दोन्ही राज्यामध्ये वाद होऊन प्रचंड तणाव निर्माण झाला होता. वाद अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला होता. त्यामुळे साहेबांची प्रचंड धावपळ होत असे. सतत औरंगाबाद, मुंबई आणि नवी दिल्लीला फेऱ्या माराव्या लागत असत. प्रवासामुळे जेवण वेळेवर मिळत नसायचे, पुरेशी झोप मिळायची नाही. त्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर होत होता. परंतु साहेबांचे त्याकडे लक्ष नसायचे. त्यांचा सर्व फोकस कामावर होता. अतिशय शिस्तबध्द नियोजन करुन ते प्रत्येक काम अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडायचे. त्यामुळे अनेकदा वरिष्ठांकडून त्यांचे कौतुक होत असे. अतिशय मेहनत घेऊन त्यांनी बाभळी बंधाऱ्याचे काम मार्गी लावले. त्यावेळी त्यांची जी धावपळ व्हायची त्याचे साक्षीदार आम्ही कुटुंबिय आहोत. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही हे आम्ही अनुभवातून शिकलो. परंतु साहेबांनी कुटुंबाकडे आणि आपल्या मुलींकडे अजिबात दुर्लक्ष होऊ दिले नाही. मुलींच्या शिक्षणासाठी कुटुंब नांदेडला ठेवून नंतर जिकडे बदली होईल तिकडे एकटे जायला सुरुवात केली.

नांदेडनंतर त्यांची बदली परभणीला झाली. काही दिवस तेथे

काम केल्यानंतर पुन्हा मुंबईला बदली झाली. मुंबईमध्ये मंत्रालयात ते अवर सचिव या पदावर पाच वर्षे कार्यरत होते. घार हिंडते आकाशी परि चित्त तिचे पिलापाशी असे म्हणतात. त्याप्रमाणे ते मुंबईत रहात असले तरी तरी दररोज आमच्याशी अनेकदा फोनवर बोलल्यानंतर त्यांना चैन पडत नसे. आठवड्यानंतर ते घरी यायचे. त्यावेळी आमच्याकडे दिवाळी असल्यासारखे आनंदाचे वातावरण असायचे. विशेष करुन मुलींचा आनंद गगनात मावेनासा होत असे. कामातील व्यस्तता वाढत गेली परंतु त्यांनी कुटुंबाकडे कधी दुर्लक्ष केले नाही. संपुर्ण कुटुंबाला घेऊन वर्षातून एकदा तरी लॉग – ट्रीपला जात असू. कधी गोवा, कधी काश्मिर तर कधी राज्यातील तीर्थक्षेत्रांना भेट देणे वारंवार होत असे. साहेबांच्या कामाच्या नियोजनाचे आम्हाला नेहमीच कौतुक ते मुंबईवरुन घरी आले की जास्तीत जास्त वेळ मुलींना देत असत. सर्वांना सोबत घेऊन सिनेमा बघायला जाणे, बाहेर हॉटेलमध्ये जेवायला जाणे, मुलींच्या पॅरेंट मिटींगसाठी आवर्जून जाणे, त्यांच्या अभ्यासाची चौकशी करणे अशा अनेक गोष्टी न सांगता कमी वेळात पार पाडत असत. मुलींना सतत मोटीवेट करणे तर नित्याचेच होते. त्यामुळे आमच्या मुली हुशार, अभ्यासू आणि शिस्तप्रिय आहेत. याचे क्रेडीट साहेबांना जाते. लग्नाच्यावेळी माझे शिक्षण अर्धवट राहिले होते. परंतु साहेबांनी मला प्रोत्साहन देऊन पुढचे शिक्षण पूर्ण करायला लावले. उच्च शिक्षण देखील मी घ्यावे अशी साहेबांची इच्छा होती. परंतु संसारातील जबाबदाऱ्या मुलांचे शिक्षण यामुळे तो विषय मागेच राहिला. परंतु शिक्षणाची आवड मुलींच्या रुपाने पूर्ण झाल्याचे समाधान आहे.

सन २०१० मध्ये तिसरे कन्यारत्न आम्हाला प्राप्त झाले आणि आमच्या संसाराचा परिघ पुर्ण झाला. माझे दीर आणि त्यांचे कुटुंब सुरुवातीपासूनच आमच्या सोबत आहेत. आजही आम्ही एकत्र कुटुंबात रहात आहोत. परंतू साहेबांनी सर्वांना एकसमान वागणूक

देऊन मुलांचे शिक्षण, भविष्य घडविले आहे. तिसरीही मुलगीच झाल्याने साहेबांना वाईट वाटते की काय अशी भीतिची पाल मनात चुकचुकली. परंतु उलट साहेबांनीच माझी समजूत काढली. तिसरी मुलगी झाली याचा अर्थ पूर्वजन्मी आपले काही पुण्य कर्म णाले असावे म्हणून अशा गुणी मुलींना आपल्या पोटी जन्म मिळाला. साहेबांचे विचारच उच्च कोटीतले आहेत. काळाच्या दहा वर्षे पुढे जाऊन ते विचार करतात. तिसऱ्या मुलीचे नाव तेजस्वीनी ठेवले. खरोखरच ती तेजस्वी आहे. आम्हाला मुलगा नाही याची थोडीदेखील सल आमच्या मनाला टोचली नाही. मुलांच्याबाबतीत आम्ही अत्यंत समाधानी आहोत. दिराची दोन मुले आणि आमच्या तीन मुली आपसात अगदी जीवाभावाने रहातात. एकमेकां विषयी अत्यंत जिव्हाळा आहे. या सर्वांनाच साहेब प्रोत्साहन देत असतात. करिअर करण्यासाठी सर्वांना त्यांच्या मनाप्रमाणे समान संधी दिली. नेहाला १० वीनंतर पुढील शिक्षणासाठी राजस्थानमधील कोटा येथे जायचे होते. इतक्या लांब पप्पा पाठवतील की नाही अशी शंका तिच्या मनात होती. परंतु जेव्हा तिने विषय काढला तेव्हा तर त्यांना आनंदच झाला. त्यांनी अतिशय प्रेमाने तिला सपोर्ट केला. कोटा येथील शिक्षण पुर्ण झाल्यानंतर ती पुढील शिक्षणासाठी पंजाबमध्ये पटियाला येथे गेली. तेथील विद्यापीठातील शिक्षण पुर्ण होत असतानाच परदेशात जाण्याची संधी तिला मिळाली. एक बाप म्हणून ते नेहाच्या प्रत्येक वाटचालीत खंभीरपणे तिच्या पाठीशी उभे राहिले आहेत. आता नेहा आयर्लंडमधील डब्लिन येथे आपले शिक्षण पुर्ण करुन तिथेच जॉब जॉईन केला आहे. निकीता दिल्लीमध्ये आपले लॉ चे शिक्षण पुर्ण करीत आहे तर लहान तेजस्वीनी सद्या दहावीला आहे. दीराच्या मोठ्या मुलाने बारामती येथे पायलटचे प्रशिक्षण पुर्ण केले आहे तर दुसरा मुलगा अकरावीला औरंगाबाद येथे शिकत आहे. आमच्या समाजात फारसे कोणी उच्च शिक्षणाकडे वळत नाही. परंतु साहेबांच्या

मार्गदर्शनामुळे सर्व मुलांनी उच्च शिक्षण घेण्याकडे कल आहे. केवळ स्वत:च्या मुलांनाच नव्हे तर समाजातील अनेक मुलांना त्यांनी उच्च शिक्षणाचा मार्ग दाखविला. प्रसंगी आर्थिक मदत केली आणि शिक्षणाचा मार्ग दाखविला.

साहेब आपल्या प्रशासकीय सेवेमध्ये जसे स्वत:ला झोकून देऊन काम करीत होते तसे कुटुंब आणि समाजातील मुलांनी देखील आपले करिअर घडविण्यासाठी झटावे यासाठी सतत प्रयत्नशील असत. या संपुर्ण धावपळीच्या कालखंडात त्यांनी स्वत:कडे म्हणावे तितके लक्ष दिले नाही. सतत कामाचा व्यापख धावपळ, जेवण खाणे वेळेवर न होणे याचा व्हायचा तो परिणाम झाला. कधी शुगरच्या आजाराने गाठले हे लक्षातच आले नाही. औरंगाबादच्या बजाज हॉस्पीटलमध्ये त्यांना दाखल केले गेले. परंतु त्यावेळी कामाचा व्याप इतका होता की हॉस्पीटलमध्ये ॲडमिट असतानाही कामाच्या फाईल्स दवाखान्यात ॲडमिट असताना बघाव्या लागत होत्या. कारण आपल्या जबाबदारीपासून दूर पळणारे हे व्यक्तिमत्व नाही. पहिले प्राधान्य शासकीय कर्तव्याला आणि नंतर तब्येतीला. त्याचा परिणाम असा झाली की त्यांच्या आजाराने घर केले. सन २०१९- २० ला तो आजार लिव्हरपर्यंत पोहचला. उपचार करायला सुरुवात केली तेव्हा आजार बराच पुढे गेला होता. शेवटी लिव्हर ट्रान्सप्लांटचा निर्णय घ्यावा लागला. त्यासाठी स्वत:च्या मुलीने आपल्या पित्याच्या जीवासाठी स्वत:च्या लिव्हरचा तुकडा दिला. अनेक दिवस घरापासून दूर रुग्णालयात काढावे लागले. परंतु त्यांचे पुण्य कर्म जास्त म्हणून अशा आजारातून ते बाहेर आले. आमच्या कसोटीचा प्रसंग आला होता. परंतु आम्ही कुटुंबातील सर्व सदस्य साहेबांच्याच प्रेरणेने धीट झालेलो होतो. वाटेल ते झाले तरी डगमगून जायचे नाही. सर्व संकटांचा सामना करायचे ठरवून साहेबांच्या मागे ठाम उभे राहिलो. सर्व कुटुंब निडर होऊन संकटांचा सामना करु लागल्याने शेवटी

संकटांनीच काढता पाय घेतला. त्यांचा मुंबईतील हॉस्पीटलमधील कार्यकाल आमच्यासाठी अत्यंत खडतर होता. कारण साहेबांवर जे उपचार सुरु होते ते अत्यंत उच्च दर्जाचे होते. परंतु साहेबांचे खाणे पिणे अत्यंत कमी झाले होते. त्यामुळे औषध गोळ्यांचा.गंभीर परिणाम झाले. साहेबांना चीडचीड होऊ लागली. ते एकटेच अंथरुणावर खिळून आणि आम्ही सगळे दवाखान्याच्या बाहेर असे चित्र होते. त्यामुळे अवघे कुटुंब अस्वस्थ होते. तो काळ आमच्यासाठी अत्यंत दु:खाचा गेला. आयसीयुमध्ये असल्यामुळे ठराविक वेळेत केवळ एका माणसाला भेटता येत होते. त्यामुळे एकटेपणा जानवत होता. परंतु साहेबांचा संयम आणि धीर इतका की या सर्व परिस्थितीवर मात करुन त्यातून बाहेर आले. तेव्हा कुठे आमच्या जीवात जीव आला. या संकटांनी एक मात्र चांगला धडा दिला की संकटाच्यावेळी सर्व कुटुंब एक असेल तर कितीही मोठ्या संकटाचा सामना करता येतो. या संकटाच्या मालिकेतून आम्ही सर्व कुटुंबियच तावून सुलाक्षून निघालो आहोत. मुलेही धीट झाली आहेत. संकटांचा सामाना कसा करावा याचे जणू बाळकडूच मिळाले आहे.

दिनांक ५ नोव्हेबर २०२३ हा दिवस आमच्या आयुष्यातला सर्वात खतरनाक दिवस समजतो. कारण याच दिवसी साहेबांवर तब्बल २० तासांची शस्त्रक्रिया होऊन लिव्हर ट्रान्सप्लांट करण्यात आले. फार मोठी शस्त्रक्रिया झाली. आमचे सर्वांचे जीव टांगणीला लागले होते. परंतु आयुष्यातील केलेली चांगली कामे, इतरांना मदतीचा दिलेला हात आणि त्यांचे आशीर्वाद कामी आले. साहेबांना अक्षरश: पुनर्जन्म मिळाला. फार मोठ्या शारीरिक संकटातून बाहेर आले. लिव्हर ट्रान्सप्लांटनंतर साहेबांना आणि मुलीला होणारा त्रास बघून ज्या वेदना मनाला होतहोत्या त्या व्यक्त करायला श्बद्च नाहीत. परंतु आम्ही सर्व भाग्यशाली आहोत की आम्ही या संकटातून बाहेर पडलो आहोत. माणूस गरिब असावा परंतु तो आजारी नसावा या म्हणीचा प्रत्यय

आणि प्रत्यक्षपणे अनुभवला आहे.

आमचे जीवन म्हणजे एकाद्या चित्रपटाचे कथानक असावे असेच आहे. कधी दु:ख तर कधी सुख अशा तरंगावर जीवन जगत आलो आहोत. परंतु खरे सांगायचे तर आयुष्यात संकटे आली म्हणून सुखाची किंमत कळली. परोपकार, सुखदु:खाची देवाण घेवाण या मानव जातीतील संकल्पना कळल्या. जीवन म्हणजे तरी काय असते? माझी ईश्वर चरणी एकच प्रार्थना आहे की सर्वांनाच दु:खाची दरी ओलांडल्यानंतर सुखाची हिरवळ नक्की दिसू दे. सर्वांना उत्तम आरोग्य लाभू दे. लाख मेले तरी चालतील परंतु लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे. त्याला उत्तम आरोग्य लाभले पाहिजे. साहेबांनी अनेकांना आयुष्यात उभे रहाण्यास मदत केली. त्यांचे आशीर्वाद आम्हाला पुन्हा नव्याने उभे रहाण्यास मदत करतील असा आशावाद व्यक्त करते. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांच्या आयुष्यातील आठवणींना उजाळा देण्यासाठी या ग्रंथात आपले मनोगत व्यक्त केले त्या सर्वांचे आभार व्यक्म करुन माझा शब्द प्रपंच येथे थांबविते.धन्यवाद!